




# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, बुधवार ५ नोव्हेंबर २०२५ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०







# निवडणुकीचा बिगुल वाजला; आचारसंहिता लागू

## 288 नगरपरिषदा व नगरपंचायतींसाठी 2 डिसेंबर 2025 रोजी मतदान; 3 डिसेंबरला मतमोजणी

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील २४६ नगरपरिषदा व ४२ नगरपंचायतींच्या (एकूण २८८) सदस्यपदासाठी आणि थेट अध्यक्षपदाच्या सार्वत्रिक निवडणुकांकरिता २ डिसेंबर २०२५ रोजी मतदान; तर ३ डिसेंबर २०२५ रोजी मतमोजणी होणार आहेत. या सर्व नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या कार्यक्षेत्रात आजपासून आचारसंहिता लागू झाल्याची घोषणा राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी पत्रकार परिषदेत केली.



सचिवालय जिमखान्यात झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. आयोगाचे सचिव सुरेश काकाणी यावेळी उपस्थित होते. दिनेश वाघमारे यांनी सांगितले की, या निवडणुकांसाठी नामनिर्देशनपत्र दाखल करण्यास १० नोव्हेंबर २०२५ पासून सुरुवात होईल. नामनिर्देशपत्र दाखल करण्याची अंतिम तारीख १७ नोव्हेंबर २०२५ असेल. नामनिर्देशनपत्रांची छाननी १८ नोव्हेंबर २०२५ रोजी होईल. निवडणूक निर्णय अधिका-यांच्या निर्णयाविरुद्ध अपील नसलेल्या ठिकाणी २१ नोव्हेंबर २०२५ पर्यंत; तर अपील असलेल्या ठिकाणी २५ नोव्हेंबर २०२५ पर्यंत नामनिर्देशनपत्रे मागे घेता येतील. २ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० पर्यंत मतदानाची वेळ असेल. मतमोजणी सर्व संबंधित ठिकाणी ३ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजल्यापासून सुरु होईल. निकाल जाहीर झाल्यानंतर नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या क्षेत्रापुरती आचारसंहिता संपुष्टात येईल.

राज्यातील एकूण २४७ पैकी २४६ नगरपरिषदांसाठी ही निवडणूक होत आहे. निवडणूक होत असलेल्यांपैकी १० नवनिर्मित नगरपरिषदा आहेत. उर्वरित सर्व २३६ नगरपरिषदांची मुदत संपली आहे. न्यायालयीन प्रकरणामुळे पातूर (जि. अकोला) नगरपरिषदेची निवडणूक प्रक्रिया प्रलंबित आहे. त्याचबरोबर एकूण १४७ पैकी ४२ नगरपंचायतींसाठी निवडणूक होत आहे. निवडणूक होत असलेल्यांपैकी १५ नवनिर्मित; तर उर्वरित सर्व २७ नगरपंचायतींची मुदत यापूर्वीच संपली आहे. १०५ नगरपंचायतींची मुदत अद्याप संपलेली नाही. निवडणुकांच्या तयारीच्या अनुषंगाने राजकीय पक्षांच्याही प्रतिनिधींशीही संवाद साधण्यात आला असल्याचे वाघमारे यांनी सांगितले.

### जिल्हानिहाय नगरपरिषदा आणि नगरपंचाती (न.पं.)

**पालघर-** डहाणू, जव्हार, पालघर आणि वाडा (न.पं). **रायगड-** अलिबाग, कर्जत, खोपोली, महाड, माथेरान, मुरुड-जंजिरा, पेण, रोहा, श्रीवर्धन आणि उरण (न.पं.). **रत्नागिरी-** चिपळूण, देवरुख (न.पं.), गुहागर, खेड, लांजा (न.पं.), राजापूर आणि रत्नागिरी. **सिंधुदुर्ग-** कणकवली (न.पं.), मालवण, सावंतवाडी आणि वेंगुर्ला. **ठाणे-** अंबरनाथ आणि कुळगाव- बदलापूर. **अहिल्यानगर-** देवळाली- प्रवरा, जामखेड, कोपरगाव, नेवासा (न.पं.) (न.पं.), पाथर्डी, राहता, राहुरी, संगमनेर, शेवगाव, शिर्डी, श्रीगोंदा आणि श्रीरामपूर. **धुळे-** दोंडाईचा-वरवाडे, पिंपळनेर, शिंदखेडा (न.पं.) आणि शिरपूर-वरवाडे. **जळगाव-** जामनेर, अमळनेर, भडगाव, भुसावळ, चाळीसगाव, चोपडा, धरणगाव, एरंडोल, फैजपूर, मुक्ताईनगर (न.पं.), नशिराबाद, पाचोरा, पारोळा, रावेर, सावदा, शेंदुर्णी (न.पं.), वरणगाव आणि यावल. **नंदुरबार-** शहादा, नंदुरबार, नवापूर आणि तळोदा. **नाशिक-** भगूर, मनमाड, नांदगाव, सटाणा, सिन्नर, येवला, चांदवड, इगतपुरी, ओझर, पिंपळगाव- बसवंत आणि त्र्यंबक. **कोल्हापूर-** आजरा (न.पं.), चंदगड (न.पं.), गडहिंग्लज, हातकणंगले, हुपरी, जयसिंगपूर, कागल, कुरुंदवाड, मलकापूर, मुरगूड, पन्हाळा, शिरोळ आणि वडगाव. **पुणे-** आळंदी, बारामती, भोर, चाकण, दौंड, फुरसुंगी-उरुळी देवाची, इंदापूर, जेजूरी, जुन्नर, लोणावळा, मालेगाव बु. (न.पं.), मंचर (न.पं.), राजगुरु नगर, सासवड, शिरूर, तळेगाव- दाभाडे आणि वडगाव (न.पं.). **सांगली-** आष्टा, आटपाडी (न.पं.), इस्लामपूर, जत, पळूस, शिराळा (न.पं.), तासगाव आणि विटा. **सातारा-** कराड, महाबळेश्वर, मलकापूर, मेढा (न.पं.), म्हसवड, पाचगणी, फलटण, रहिमतपूर, सातारा आणि वाई. **सोलापूर-** अक्कलकोट, अकलूज, अनगर (न.पं.), बार्शी, दुधनी, करमाळा, कुर्डूवाडी, मैंदर्गी, मंगळवेढा, मोहोळ, पंढरपूर आणि सांगोला. **बीड-** अंबेजोगाई, बीड, धारुर, गेवराई, माजलगाव आणि परळी-वैजनाथ. **छत्रपती संभाजीनगर-** फुलंब्री (न.पं.), गंगापूर, कन्नड, खुलताबाद, पैठण, सिल्लोड आणि वैजापूर. **धाराशिव-** भूम, कळंब, मुरुम, नळदुर्ग, धाराशिव, परंडा, तुळजापूर आणि उमरगा. **हिंगोली-** बसमतनगर, हिंगोली आणि कळमनुरी. **जालना-** अंबड, भोकरदन आणि परतूर. **लातूर-** अहमदपूर, औसा, निलंगा, रेणापूर (न.पं.) आणि उदगीर. **नांदेड-** बिलोली, देगलूर, धर्माबाद, हदगाव, हिमायतनगर (न.पं.), कंधार, कुंडलवाडी, मुदखेड, मुखेड, उमरी, भोकर, किनवट आणि लोहा. **परभणी-** गंगाखेड, जिंतूर, मानवत, पाथरी, पूर्णा, सेलू आणि सोनपेठ. **अकोला-** अकोट, बाळापूर, बार्शी- टाकळी, हिवरखेडा, मूर्तिजापूर आणि तेल्हारा. **अमरावती-** अचलपूर, अंजनगाव सुर्जी, चांदुरबाजार, चांदुर रेल्वे, चिखलदरा, दर्यापूर, धामणगाव रेल्वे, धारणी (न.पं.), मोर्शी, नांदगाव खंडेश्वर (न.पं.), शेंदूरजनाघाट आणि वरुड. **बुलढाणा-** बुलढाणा, चिखली, देऊळगाव राजा, जळगाव जामोद, खामगाव, लोणार, मलकापूर, मेहकर, नांदुरा, शेगाव आणि सिंदखेडराजा. **वाशीम-** कारंजा, मालेगाव (न.पं.), मंगरुळपीर, रिसोड आणि वाशीम. **यवतमाळ-** आर्णी, दारव्हा, दिग्रस, घाटंजी, पुसद, उमरखेड, वणी, यवतमाळ, ढाणकी (न.पं.), नेर- नवाबपूर आणि पांढरकवडा. **भंडारा-** पवनी, साकोली शेंदूरवाफा, तुमसर आणि भंडारा. **चंद्रपूर-** बल्लारपूर, भद्रावती, भिसी (न.पं.), ब्रह्मपूरी, चिमूर, गडचांदूर, घुग्घुस, मूल, नागभीड, राजूरा आणि वरोरा. **गडचिरोली-** आरमोरी, देसाईगंज आणि गडचिरोली. **गोंदिया-** गोंदिया, गोरेगाव (न.पं.), सालेकसा (न.पं.) आणि तिरोडा. **नागपूर-** बहादुरा (न.पं.), बुटीबोरी, पिपळा (न.पं.), भिवापूर (न.पं.), बुटीबोरी, डिगडोह, कळमेश्वर- ब्राह्मणी, कामठी, कांद्री-कन्हान (न.पं.), काटोल, खापा, कोंढाळी (न.पं.), महादुला (न.पं.), मोहपा, मौदा (न.पं.), नरखेड, निलडोह (न.पं.), पारशिवणी (न.पं.), रामटेक, सावनेर, उमरेड, वानाडोंगरी, बिडगाव-तरोडी (खु) पांढुर्णा (न.पं.), गोधणी रेल्वे (न.पं.), कन्हान- पिपरी, मोवाड, वाडी आणि येरखेडा (न.पं.). **वर्धा-** आर्वी, देवळी, हिंगणघाट, पुलगाव, सिंदी रेल्वे आणि वर्धा.

### नगरपालिका, नगरपंचायत निवडणूक कार्यक्रम

- १० नोव्हेंबर : उमेदवारी अर्ज दाखल करण्यास सुरु वात
- १७ नोव्हेंबर : उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम मुदत
- १८ नोव्हेंबर : उमेदवारी अर्जाची छाननी
- २१ नोव्हेंबर : अपील नसलेल्या ठिकाणी उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम मुदत
- २५ नोव्हेंबर : अपील असलेल्या ठिकाणी उमेदवारी अर्ज माघारीची शेवटची मुदत
- २ डिसेंबर : मतदान ( सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत)
- ३ डिसेंबर : मतमोजणी (सकाळी १० वाजल्यापासून )



निवडणूक कार्यक्रम जाहीर झाल्यापासून संबंधित नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या क्षेत्रात आचारसंहिता लागू झाली आहे. नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या कार्यक्षेत्रात ही आचारसंहिता लागू असली तरी अन्य ठिकाणीदेखील नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या मतदारांवर प्रभाव पाडणारी घोषणा किंवा कृती करता येणार नाही. आचारसंहिता लागू झाल्यामुळे शासनाला नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या कार्यक्षेत्राशी संबंधित धोरणात्मक निर्णय घेता येणार नाहीत.नैसर्गिक आपत्तीबाबत करावयाच्या उपाययोजना किंवा मदतीसंदर्भात आचारसंहितेची आडकाठी असणार नाही. आचारसंहिता आणि कायदा व सुव्यवस्थेसंदर्भात राज्य निवडणूक आयोगाने ४ नोव्हेंबर २०२५ दोन स्वतंत्र आदेश निर्गमित केले आहेत.

### 5 वर्षांपासून रखडल्या होत्या निवडणुका, अखेर मुहूर्त मिळाला

५ वर्षांपासून निवडणुका रखडल्या होत्या आज अखेर मुहूर्त मिळाला आहे. पहिल्या टप्प्यात नगरपरिषदा व नगरपंचायतीं दुसऱ्या टप्प्यात ३३ जिल्हा परिषदा व पंचायत समितीच्या निवडणुका डिसेंबर अखेर होतील तर जानेवारीत २९ पर्यंत महापालिका निवडणुका होणे अपेक्षित आहे. पहिल्या टप्प्यात नगरपरिषद व नगरपंचायतीसाठी निवडणूक होईल. दोन्ही ठिकाणी नगराध्यक्षपदाची थेट निवडणूक होईल. नगरपंचायतीमध्ये एक सदस्यीय, तर नगर परिषदांमध्ये २ किंवा तीन सदस्यांचे प्रभाग असतील. २३६ नगर परिषदांची मुदत संपली आहे. तसेच ४२ नगरपंचायतींची निवडणूक होणार आहे. यात १५ नव्या नगरपंचायतींचा समावेश आहे. नगरपरिषद व नगरपंचायतीच्या निवडणुकांसाठी एकूण १ कोटी ७ लाख ३ हजार ५७६ मतदार असून त्यासाठी सुमारे १३ हजार ३५५ मतदान केंद्रांची व्यवस्था करण्यात आली आहे. या निवडणुकांसाठी पुरेशा इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांची (ईव्हीएम) व्यवस्था करण्यात आली आहे. त्यात १५ हजार ७२६ कंट्रोल युनिट आणि २७ हजार ४५२ बॅलेट युनिटची व्यवस्था करण्यात आली आहे. राज्य निवडणूक आयोगाने आज जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार २ डिसेंबर रोजी नगरपरिषदा व नगरपंचायतींसाठी मतदान होणार असून ३ डिसेंबर रोजी मतमोजणी होईल. या निवडणुकांसाठी १० नोव्हेंबर २०२५ पासून उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरु होणार आहे तर अर्ज दाखल करण्याची अंतिम मुदत १७ नोव्हेंबर अशी राहील.राज्यात एकाचवेळी इतक्या मोठ्या संख्येने नगरपालिका आणि नगरपंचायतींच्या निवडणुका होण्याची ही पहिलीच वेळ आहे. या निवडणुकीत एकूण १ कोटी ७ लाख ३ हजार ५७६ पात्र मतदार ६ हजार ८५९ जागांसाठी मतदान करतील, असे वाघमारे यांनी सांगितले.

### उमेदवारांसाठी खर्च मर्यादा

- **अ वर्ग नगरपालिका :** थेट नगराध्यक्ष : १५ लाख रुपये, सदस्य : ५ लाख रुपये
- **ब वर्ग नगरपालिका :** थेट नगराध्यक्ष : ११ लाख २५ हजार रुपये, सदस्य : ३ लाख ५० हजार
- **क वर्ग नगरपालिका :** थेट नगराध्यक्ष : ७ लाख ५० हजार रुपये, सदस्य : २ लाख ५० हजार
- **नगरपंचायत :** थेट नगराध्यक्ष : ६ लाख रुपये, सदस्य : २ लाख २५ हजार रुपये



### निवडणुकीसाठी पात्र मतदार

- पुरुष : ५३ लाख ७९ हजार ९३१
- महिला : ५३ लाख २२ हजार ८७०
- इतर : ७७५
- एकूण मतदार : १ कोटी ७ लाख ३ हजार ५७६
- मतदान केंद्रांची संख्या : १३ हजार ३५५

### एकूण आरक्षित जागा

- एकूण प्रभाग : ३ हजार ८२०
- एकूण जागा : ६ हजार ८५९
- महिलांसाठी जागा : ३ हजार ४९२
- अनुसूचित जागांसाठी जागा : ८९५
- अनुसूचित जमातींसाठी जागा : ३३८
- नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गासाठी जागा : १ हजार ८२१






## बिलासपूरजवळ भीषण रेल्वे अपघातात १० जणांचा मृत्यू

### ● जखमींच्या किंकाळ्यांनी परिसर थरारला ● महाराष्ट्रातील प्रवासी

**नागपूर/प्रतिनिधी :** रायगडून वेगात येणारी रेल्वे पॅसेंजर मालगाडीवर आदळली. त्यामुळे झालेल्या भीषण अपघातात १० जणांचा मृत्यू झाल्याची माहिती असून, दोन डझनहून अधिक प्रवासी जखमी झाल्याचे सांगितले जाते. मृतांमध्ये महिला आणि लहान मुले यांचा समावेश अधिक असल्याचे संबंधित अधिका-यांनी सांगितले आहे. अधिका-यांच्या माहितीनुसार, मंगळवारी दुपारी ४ च्या सुमारास बिलासपूर (छत्तीसगड)जवळ लाल खदान परिसरात हा भयावह अपघात घडला. अपघात इतका भीषण आहे की मालगाडीला धडकल्यानंतर कोरबा-पॅसेंजर ट्रेनचे अनेक डबे पूर्णपणे क्षतिग्रस्त झाले. अनेक डबे रुळावरुन उतरले. अपघातानंतर ट्रेनमधील



हादरलेल्या प्रवाशांनी एकच कल्लोळ केला. नातेवाईक तसेच सोबतच्या प्रवाशांना झालेल्या गंभीर जखमा बघून अनेकजण थरारले. दरम्यान, माहिती कळताच बिलासपूरचे जिल्हाधिकारी, जिल्हा पोलीस अधीक्षक, बिलासपूर झोनचे रेल्वेचे शिर्षस्थ अधिकारी, आरपीएफ, जीआरपीचा ताफा आणि मोठ्या संख्येतील रेल्वेचे कर्मचारी बचाव कार्यासाठी घटनास्थळी धावले. तोपर्यंत प्रवाशांच्या किंकाळ्यांनी परिसर हादरून गेला होता.

मृत आणि जखमींचा आकडा-अपघातानंतर डब्यात अडकलेल्या प्रवाशांना बाहेर काढण्यासाठी गॅस कटरच्या साहाय्याने डबे फोडण्याचे काम सुरू आहे. बचाव कार्य युद्धपातळीवर सुरू आहे. मात्र, अंधार पडल्यामुळे बचाव कार्यात अडथळे येत असल्याचे संबंधितांनी सांगितले. लोको पायलट केबिनमध्येच अडकलेले असून मृत आणि जखमींची अचूक संख्या जाहीर करणे तूर्त शक्य नसल्याचे रेल्वे अधिकारी म्हणाले.

**महाराष्ट्रातील प्रवाशांचा समावेश** -अपघात छत्तीसगडमध्ये झाला असला तरी या ट्रेनमध्ये विदर्भ, महाराष्ट्रातील प्रवाशीही मोठ्या संख्येत असण्याची शक्यता आहे. मात्र, त्यासंबंधाने अधिकृत माहिती वृत्तलिहिस्तोवर मिळालेली नाही. आम्ही संबंधित अधिका-यांच्या ⮊(पान २ वर)

## दहा वर्षांच्या सेवेतच जमवली शेकडो कोटींची माया

**कानपूर :** प्रशासकीय सेवेतील अधिकारी कशा पद्धतीने लोकांकडून पैसे उकळून संपत्ती जमवत आहेत, याची प्रचिती देणा-या घटना समोर येत आहेत. असेच एक प्रकरण उत्तर प्रदेशातील कानपूर जिल्ह्यात समोर आले आहे. एका पोलिस उपअधीक्षकाला उत्पन्नापेक्षा जास्त संपत्ती कमावल्याचा प्रकरणात निलंबित करण्यात आले आहे. या अधिकाऱ्याचे नाव ऋषिकांत शुक्ला आणि आतापर्यंत केलेल्या तपासातून समोर आलेली संपत्ती आहे, १०० कोटी रुपये आणि ही संपत्ती जमवली फक्त दहा वर्षांत! ही माहिती समोर आल्यानंतर उत्तर प्रदेशच्या पोलिस दलात खळबळ माजली. गृह विभागाने हे प्रकरण दक्षता विभागाकडे चौकशीसाठी सोपवले असून, अधिका-यांनी सांगितले की अजूनही याचा तपास सुरू च असून या अधिका-याने २०० ते ३०० कोटी रुपये संपत्ती ⮊(पान २ वर)



### 12 भूखंड, 11 दुकाने व बरेच काही

## कॅनडाने भारतीय विद्यार्थ्यांचे व्हिसा फेटाळले

**टोरंटो :** उच्च शिक्षणासाठी परदेशात जाण्याची कित्येक भारतीय विद्यार्थ्यांना इच्छा असते. अमेरिका आणि कॅनडा यांसारख्या देशांत दरवर्षी मोठ्या संख्येने विद्यार्थी शिक्षणासाठी जातात. यादरम्यान कॅनडाने असंख्य भारतीयांचे व्हिसा (परवाने) अर्ज नाकारल्याची माहिती समोर आली आहे. मागील वर्षाच्या तुलनेत ऑगस्ट २०२५ मध्ये जवळपास चारपैकी तीन भारतीय विद्यार्थ्यांचे व्हिसा अर्ज रद्द केल्याचे इमिग्रेशनच्या आकडेवारीतून समोर आले आहे.कॅनडाने भारतीय विद्यार्थ्यांचे व्हिसा अर्ज नाकारण्याचे प्रमाण तब्बल ७४ टक्के इतके आहे. ऑगस्ट २०२३ मध्ये हा दर ३२ टक्क्यांच्या आसपास होता. गेल्या दोन वर्षांत जागतिक स्तरावर जवळपास ४० टक्के भारतीय विद्यार्थ्यांचे पारपत्र अर्ज नाकारल्याची माहिती आकडेवारीतून समोर आली आहे. विशेष बाब म्हणजे, चिनी विद्यार्थ्यांचे पारपत्र अर्ज नाकारण्याचा दर केवळ २४३ इतका आहे. व्हिसा अर्ज वारंवार फेटाळले जात असल्याने अर्जदारांच्या संख्येतेही मोठी घट दिसून आली आहे. कॅनडातील अनेक विद्यापीठांमध्ये भारतीय विद्यार्थ्यांच्या प्रवेशाच्या संख्येत मोठे ⮊(पान २ वर)



## बिहारमध्ये पुन्हा 'NDA राज'

### सर्व्हेत छप्परफाड जागा मिळण्याचा अंदाज

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** बिहार विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर IANS-MATRIZE च्या आलेल्या नव्या ओपिनियन पोलने पुन्हा एकदा एनडीए सरकारचा अंदाज व्यक्त केला आहे. सर्वेक्षणानुसार एनडीएला या निवडणुकीत स्पष्ट बहुमत मिळताना दिसत आहे. महत्वाचे म्हणजे, या सर्वेक्षणानुसार भाजप सर्वात मोठा पक्ष म्हणून समोर येत आहे. तर जेडीयूलाही मोठ्या प्रमाणावर जागा मिळण्याचा अंदाज आहे.या सर्व्हेच्या आकडेवारीनुसार भाजपला ८३ ते ८७ एवढ्या जागा मिळण्याचा अंदाज आहे. याचबरोबर नीतीशकुमार यांच्या जनता दल (युनायटेड)ला ६१ ते ६५ जागा मिळण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. अशा पद्धतीने एनडीएला एकूण १५३ ते १६४ एवढ्या जागा मिळू शकतात. तर मतांचा टक्का जवळपास ४९ टक्क्यांपर्यंत पोहोचेल. दुसरीकडे महागठबंधनाला मोठा झटका ⮊(पान २ वर)



## एकनाथ शिंदे हे महिलांच्या मनातले मुख्यमंत्री

### नीलम गो-हेंचे भुवया उंचावणारे वक्तव्य

**मुंबई/प्रतिनिधी :** शिवसेना शिंदे गटाच्या नेत्या नीलम गो-हे यांनी केलेलं विधान चर्चेत आलं आहे.एकनाथ शिंदे हे महिलांच्या मनातील मुख्यमंत्री असल्याचं त्या म्हणाल्या. त्यांच्या या विधानानंतर आता राजकीय वर्तुळात आता चर्चा सुरु झाल्या आहेत. नीलम गो-हे यांच्या पुस्तकाचं प्रकाशन झालं, या कार्यक्रमात त्या बोलत होत्या. या कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची देखील उपस्थिती होती. त्यांच्या या वक्तव्यानंतर राजकीय वर्तुळात अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. नीलम गो-हे यांच्या दाही दिशा या पुस्तकाचं प्रकाशन मुंबईत पार पडलं त्यावेळी नीलम गो-हे यांनी हे वक्तव्य केलं आहे. नीलम गो-हे म्हणाल्या, मी आज केलेल्या प्रयत्नांचे राणीसाहेब ताराबाई, जिजाऊ माता यांना अभिवादन करते. हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे, धर्मवीर आनंद दिघे यांना वंदन करते आणि आजच्या कार्यक्रमाला वेळात वेळ काढून आलेले मी तर असं म्हणेन की लाखो बहिणींचे भाऊ आणि महाराष्ट्राचे ख-या अर्थाने डेडिकेटेड मिनिस्टर, कामन मॅन असे एकनाथ शिंदे. इथे त्या काही क्षण थांबल्या आणि लगेच म्हणाल्या, साहेब एक शब्द म्हणणार होते पण तो थांबवला आहे, महिलांच्या मनातले मुख्यमंत्री. अर्थात देवेंद्र फडणवीस यांच्याबद्दल आम्हाला आदर आहेच. पण माननीय ⮊(पान २ वर)



## 'तळपायाची आग मस्तकात गेली आणि आता १०० टक्के खात्री पटली'

### राज ठाकरेंचा निवडणूक जाहीर करताच पारा चढला



**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्रातील नगरपरिषद आणि नगरपंचायतींच्या निवडणूक जाहीर झाल्यानंतर निवडणूक आयोगाला अनेक प्रश्न विचारण्यात आले. अनेक प्रश्नांवर निवडणूक आयोगाने समाधानकारक उत्तर देता आली नाही. या पत्रकार परिषदेनंतर राज ठाकरेंनी आयोगाला सुनावले. 'आता १०० टक्के खात्री पटली की, निवडणूक आयोग स्वायत्त आहे हे फक्त संविधानात आहे. हे सत्ताधा-यांच्या हातचं बाहुलं आहे', अशी संताप महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी नगरपरिषद आणि नगरपंचायतींच्या निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर व्यक्त केला. बोगसमतदारांच्या प्रश्नांवर निरुत्तर राहिलेल्या निवडणूक आयुक्तांकडे बोट दाखवत राज ठाकरे यांनी निवडणूक आयोगाच्या भूमिकेवरच शंका उपस्थित केली. राज्यातील २४६ नगरपरिषदा आणि ४२ नगरपंचायतींच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला आहे. राज्याचे निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी निवडणूक कार्यक्रम जाहीर केला. त्यानंतर राज ठाकरे यांनी पत्रकार परिषदेतील आयुक्त्यांच्या ⮊(पान २ वर)




# अहिल्यादेवी होळकर महाविद्यालयात बारावीचे परीक्षा केंद्र सुरू करा

## विद्यार्थी व पालकांनी दिला रास्ता रोकोचा इशारा

**अमरावती/प्रतिनिधीः-** चांदूरबाजार तालुक्यातील आसेगाव येथील अहिल्यादेवी होळकर कनिष्ठ महाविद्यालय येथील वर्ग बारावीचे परीक्षा केंद्र बोर्डाने रद्द केले.हे परीक्षा केंद्र पुन्हा बहाल करावे म्हणून विद्यार्थी, पालक व ग्रामस्थांनी १५ नोव्हेंबरला आसेगाव बस स्थानकावर रास्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा दिला.




आज मंगळवार ४ नोव्हेंबर रोजी जिल्हाधिकाऱ्यांना यासंदर्भात निवेदन देण्यात आले आहे.विद्यार्थ्यांनी सांगितले की राजकीय दबावापोटी सामाजिक व्देषातून होळकर कनिष्ठ महाविद्यालयातील परीक्षा केंद्राचा खेळ खंडोबा केला आहे. मार्च १९९८ पासून अत्यंत शिस्तीत कॉपीमुक्त अभियान राबवित सदर परीक्षा केंद्र सुरू होते. बोर्डाचे सर्व निकष पूर्ण होत, असताना काही त्रुटी दाखवून पहिले परीक्षा केंद्र बदलविण्यात आले. बोर्डाला चूक लक्षात आली असता त्यांनी परीक्षा केंद्र पुन्हा कनिष्ठ महाविद्यालय दिले आणि फक्त सहा दिवसानंतर हे परीक्षा केंद्र रद्द करण्यात आले. सदर परीक्षा केंद्र पुन्हा दुसऱ्या शाळेला देण्यात आले. तेथे कुठल्याही सुविधा नाहीत. संरक्षक भिंत, जनरेटर, प्रसाधन गृह नसताना शिक्षकही तेथे कॉपी पुरवण्यात सहभागी असतात. या परीक्षा केंद्राचे दोन परीक्षा केंद्र करण्यात आले आहे. इतका तुघलकी कारभार सुरू आहे. गेल्या बारा वर्षाचे अहिल्यादेवी होळकर कनिष्ठ महाविद्यालयाचे अत्यंत दर्जेदार परीक्षा केंद्र बंद करण्यात आले आहे. १४ नोव्हेंबर पर्यंत होळकर परीक्षा केंद्र बहाल केले नाही, तर १५ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता आसेगाव पूर्णा बस स्थानकावर रास्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. निवेदन सोपवताना चैताली पारिसे, रेणुका पारिसे, अनुष्का वानखेडे, राधा काळे ,प्रांजली वानखडे, वेदिका सदाफळे ,पुनम जामतकर ,दिव्या मातकर, वैष्णवी नांदे, मोनिका बनसोड, शिवानी सरोदे, सोनाली भटकर, रोहिणी वैद्य ,सुजल डहाके, भक्ती राऊत ,वंशिका कैथवास, जागृती वानखेडे, ईश्वरी येवकार, श्रद्धा नांदणे, सुजल गवई सह शेकडो विद्यार्थी व ग्रामस्थ उपस्थित होते.

## १ व १० वरिल उर्वरित

### बिलासपूरजवळ भीषण रेल्वे

संपर्कात असल्याचे स्थानिक वरिष्ठ अधिका-यांनीसांगितले.

**बिलासपूर-कटनी रेल्वे मार्ग ठप्प-** या अपघातानंतर बिलासपूर-कटनी रेल्वे मार्गावरील वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली आहे. त्यामुळे काही एक्सप्रेस आणि प्रवासी गाड्या रद्द, तर काहींचे मार्ग बदलण्यात आले आहेत. काही गाड्या नागपूर मार्गे वळविण्यात येणार असल्याचे वृत्त आहे.

**रेल्वेची हेल्पलाइन-** या अपघातानंतर रेल्वेने प्रवाशांच्या नातेवाईकांसाठी हेल्पलाइन नंबर जारी केले. त्यानुसार, ७७७७८५७३३५ (बिलासपूर स्टेशन), ८२९४७३०१६२ (पेंड्रा रोड) तसेच दुर्घटनास्थळी तात्काळ मदतीसाठी ९७५२४८५४९९ आणि ८६०२००७२०२ हे दोन विशेष क्रमांक उपलब्ध आहेत.

### दहा वर्षांच्या सेवेतच

जमवली असण्याचा अंदाज आहे. सध्या निलंबित करण्यात आलेल्या पोलिस उपअधीक्षक ऋषिकांत शुक्लांना सेवेतून कायमचे बडतर्फ करण्याची करण्यात आली आहे.

### एकनाथ शिंदे हे महिलांच्या

शिंदेसाहेब तुमचं वैशिष्ट्य म्हणजे तुम्ही लाडक्या बहिणींना कधीही विसरत नाही. पुढे बोलताना नीलम गो-हे म्हणाल्या की, मी दरवर्षी एक पुस्तक लिहिते, महिला धोरण, स्त्री सशक्तीकरण यावर आधारीत हे विषय असतात. दारू विरोधात महिलांनी आंदोलनं केली, त्या प्रकरणात महिलांवर दाखल असलेले ३२ हजार गुन्हे आमच्या सरकारच्या काळात मागे घेण्यात आले. महिलांना येणा-या अडचणी यावर मी मुंबई सकाळमध्ये एक सदर लिहित होते, त्या सर्व लेखांवर आधारीत हे पुस्तक आहे. टक्केवारी फक्त कामात नसते तर भाषणातही असते. त्यामुळे तुम्ही सविस्तर बोला, असंही यावेळी नीलम गो-हे यांनी म्हटलं आहे. दरम्यान या कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची देखील उपस्थिती होती, त्यांनी यावेळी बोलताना नीलम गो-हे यांचं कौतुक केलं.

**एकनाथ शिंदे यांच्याकडूनही नीलम गो-हेंचं कौतुक-** आपल्या सगळ्याची लाडकी बहीण नीलम गो-हे यांचं मी मनापासून अभिनंदन करतो. नीलम गो-हे यांच्या पुस्तकाचं प्रकाशन करण्यात आलं आहे. ज्ञानाचं खोरे म्हणजे निलम ताई गो-हे. राजकारणात काही जणं दिशाहीन झालेले असताना, नीलमताईंनी बाळासाहेबांच्या विचारांची दिशा पकडली. नीलमताईंना मी सांगितलं एक पुस्तक लिहा. आमचा उठाव हे खूप कठीण काम होतं. सगळ्यांना माहितीये त्यावेळेची परिस्थितीत काय होती. एकही माणूस असा नव्हता, त्यांच्या चेह-यावर आनंद नव्हता. आपण घेतलेली भूमिका महाराष्ट्राच्या हितासाठी घेतली आहे, असं एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे.

### 'तळपायाची आग मस्तकात गेली

उत्तराचा व्हिडिओ पोस्ट केला. 'आजच्या निवडणुका आयोगाच्या पत्रकार परिषदेची क्लिप मला कोणीतरी पाठवली. ती पाहून तळपायाची आग मस्तकात गेली! आणि आता १०० टक्के खात्री पटली की निवडणूक आयोग स्वायत्त आहे, हे फक्त संविधानात आहे. हे सत्ताधा-यांच्या हातचं बाहुलं आहे', अशा शब्दात राज ठाकरेंनी आयोगावर निशाणा साधला.

### कॅनडाने भारतीय विद्यार्थ्यांचे

घसरण नोंदवली गेली आहे. देशातील सर्वात मोठे अभियांत्रिकी महाविद्यालय असलेल्या युनिव्हर्सिटी ऑफ व ?टरलूमध्ये पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणा-या भारतीय विद्यार्थ्यांची संख्या गेल्या चार वर्षांत सुमारे दोन-तृतीयांशने कमी झाल्याचे वृत्त र ?यटर्सने दिले आहे. युनिव्हर्सिटी ऑफ व ?टरलूच्या प्रवेश व्यवस्थापन विभागाचे सहयोगी उपाध्यक्ष इयान वँडरबर्ग यांनी या घटीसाठी कॅनडियन सरकारला कारणीभूत धरले आहे. दरवर्षी लाखो विद्यार्थी कॅनडाचे शैक्षणिक पारपत्र मिळण्यासाठी अर्ज करतात, पण सरकारने त्यासंदर्भातील नियम कठोर केल्यामुळेच त्यांचे अर्ज नाकारले जात असून त्याचा मोठा फटका विद्यापीठांना बसत आहे असे वँडरबर्ग यांनी म्हटले आहे. युनिव्हर्सिटी ऑफ रेजिना आणि युनिव्हर्सिटी ऑफ सॅस्काचेवान यांसारख्या इतर कॅनेडियन विद्यापीठांमध्येही भारतीय विद्यार्थ्यांच्या संख्येत घट दिसून आली आहे.

कॅनडात शिक्षण घेण्यासाठी उत्सुक असलेल्या भारतीय विद्यार्थ्यांना वारंवार पारपत्र नाकारले जाणे हे खूपच गंभीर आहे. आम्ही या घटनेची गांभीर्याने दखल घेतली आहे. जगभरातील विद्यापीठांमध्ये शिक्षण घेणारे अनेक उत्कृष्ट विद्यार्थी भारतातूनच येतात. कॅनेडियन विद्यापीठांना भारतीय विद्यार्थ्यांच्या प्रतिभा आणि शैक्षणिक उत्कृष्टतेचा दीर्घकाळ फायदा झाला आहे असे दूतावासाने निवेदनात नमूद केले आहे. कॅनडाच्या परराष्ट्र व्यवहार मंत्री अनिता आनंद यांनी ऑक्टोबरमध्ये भारत दौ-यादरम्यान र ?यटर्सला सांगितले की, कॅनडा भारतीय विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यास कटिबद्ध आहे, परंतु इमिग्रेशन प्रणालीची प्रामाणिकता जपणेही आवश्यक आहे.

### बिहारमध्ये पुन्हा 'NDA राज'

बसण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. लालूप्रसाद यादव यांच्या राष्ट्रीय जनता दलाला ६२ ते ६६ जागा मिळण्याचा अंदाज आहे, तर संपूर्ण आघाडीला केवळ ७६ ते ८७ जागाच मिळण्याची शक्यता आहे. यांपैकी काँग्रेसला तर केवळ ७ ते ९ जागा आणि सीपीआय-एमएलला ६ ते ८ जागा मिळण्याचा अंदाज आहे. याशिवया मुकेश सहनी यांच्या व्हीआयपी पक्षाला १ ते २ जागा मिळण्याचा अंदाज आहे. विश्लेषकांच्या मते, हा अंदाज खरा ठरला तर, ती मुख्यमंत्री नीतीशकुमार यांच्या २० वर्षांच्या कामावरही मोहर असेल. मतांच्या टक्केवारीत आरजेडीला २२ टक्के, तर भाजपला २१ टक्के मते मिळण्याचा अंदाज आहे. मात्र, भाजपला जागांच्या बाबतीत आघाडीवर राहील. कारण जेडीयू आणि लोजपासारख्या सहकारी पक्षांच्या मतांचा फायदा भाजपला मिळला आहे.ऽ

### दोन दुचाकींचा अपघात, दोघे ठार

दोन्ही दुचाकी चालकांना डोक्याला जबर मार लागल्याने दोघांचाही जागीच मृत्यू झाला. अपघात हा दोन दुचाकीत झाला अथवा दोघांनाही अज्ञात वाहनाने धडक दिली हे वृत्तलिहेस्तोवर समजू शकले नाही. अपघाताची माहिती मिळताच दर्यापूर पोलिस स्टेशनचे अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी पोहोचले. घटनेचा पंचनामा करून दोघांचेही मृतदेह शवविच्छेदनाकरिता उपजिल्हा रुग्णालय दर्यापूर येथे पाठविण्यात आले. नेमका अपघात कसा झाला याचा अधिक तपास दर्यापूर पोलिस करीत आहेत.

### उमेदवारांना प्रचारासाठी मिळणार

निवडणुक चिन्ह वितरित करण्यात येणार आहे. २ डिसेंबर रोजी निवडणूक होणार आहे. अशात उमेदवारांना फक्त ५ दिवस मतदारापर्यंत आणि घराघरापर्यंत पोहोचण्यासाठी मिळणार आहे. या पाच दिवसात मोठी कसरत उमेदवारांना करावी लागणार आहे. नगराध्यक्षची निवड जनतेमधून होणार आहे, म्हणजे आमदार निवडणुकी प्रमाणे ही निवडणूक आहे. निवडणूक आयोगाने घोषित केल्यानुसार ७ नोव्हेंबर रोजी मतदार यादी घोषित होणार आहे. १० नोव्हेंबर रोजी अधिसूचना जारी होऊन नामांकन प्रक्रिया सुरू होणार आहे. विभागातील ४५ नगरपालिका व नगरपंचायतसाठी ही निवडणूक होणार आहे.तसेच जिल्ह्यातील अचलपूर, अंजनगाव सुर्जी, चांदुर बाजार, चांदुर रेल्वे ,चिखलदरा, दर्यापूर धामणगाव रेल्वे , मोर्शी, शेदुरजनाघाट, वरुड नगरपालिका व धारणी, नांदगाव खंडेश्वर नगरपंचायतीमध्ये निवडणुकीची रणधुमाळी जोरात आहे. निवडणूक आयोगाने २८ दिवसात या निवडणुकीची पूर्ण प्रक्रिया संपुष्टात आणली आहे. पाच दिवसात उमेदवारांना प्रचार करावा लागणार आहे. निवडणुकीची घोषणा झाल्यामुळे आता इच्छुक जोमात आहे. राष्ट्रीय पक्षातून निवडणूक लढविण्याचे इच्छुक वरिष्ठांकडे फील्डिंग लावत आहे. गावागावात आता निवडणुकीचा परिणाम दिसणार आहे.

### अपहरण केलेल्या तीन अल्पवयीन

यापूर्वी आदिलाबाद (तेलंगणा) व अंबाझरी (नागपूर) पोलिस ठाण्यातही विविध गुन्हे दाखल असल्याचे निष्पन्न झाले आहे. या कारवाईत पथकाने कोणताही दृश्य पुरावा नसतानाही काटेकोर तपास करून आरोपीकडून तीनही अल्पवयीन बालकांची सुखरूप सुटका केली व त्यांना त्यांच्या पालकांच्या ताब्यात देण्यात आले.

ही कारवाई अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, उपविभागीय पोलीस अधिकारी सुरेश दळवे (वणी), यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सतीश चवरे (स्थानीय गुन्हे शाखा, यवतमाळ) यांच्या नेतृत्वात करण्यात आली. या पथकात सपोनि. दत्ता पेंडकर, पो.उ.नि. धनराज हाके, पोहवा सुनील खंडागळे, सुधीर पांडे, निलेश निमकर, पोका सलमान शेख, रजनीकांत मडावी आणि चालक नरेश राऊत यांनी मोलाची भूमिका बजावली. आरोपीला पुढील कारवाईसाठी मारेगाव पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले असून, पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक प्रविण सुळे करीत आहेत.

या कारवाईमुळे यवतमाळ पोलिसांनी पुन्हा एकदा आपल्या तत्परतेचा आणि कार्यक्षमतेचा प्रत्यय जनतेसमोर आणला आहे.

### सिंधी समाजाचा जिल्हाधिकारी

वक्तव्यामुळे केवळ एका व्यक्तीचा नव्हे, तर संपूर्ण हिंदू सिंधी समाजाचा सन्मान आणि श्रद्धास्थानांचा अपमान झाला आहे. यावेळी शिष्टमंडळाने जिल्हा प्रशासनाला दिलेल्या निवेदनात बघेल यांच्या विरोधात भारतीय दंड संहिता कलम १५३(अ) (धर्मांमध्ये वैर निर्माण करणे), कलम २९५(अ) (धार्मिक भावना दुखावणे) आणि कलम ५०५(२) (सार्वजनिक द्वेष पसरविणे) अंतर्गत कठोर कारवाईची मागणी केली आहे. तसेच अमित बघेल यांनी आपल्या वक्तव्याबद्दल बिनशर्त सार्वजनिक माफी मागावी, अशीही मागणी यावेळी करण्यात आली.अमित बघेल यांनी केलेल्या वक्तव्यांमुळे समाजातील बंधुत्व आणि एकोपा धोक्यात येण्याची शक्यता आहे. या अनुषंगाने आम्ही या प्रकाराचा तीव्र निषेध करतो आणि सरकारने तत्काळ कारवाई करून दोषींना शिक्षा द्यावी अशी मागणी केली आहे.भविष्यात अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून स्पष्ट धोरण आखावे आणि सिंधी समाजाच्या सुरक्षेसाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात.धार्मिक सौहार्द अबाधित ठेवण्यासाठी आणि समाजातील शांतता टिकवण्यासाठी त्वरित कारवाई करण्यात यावी. या प्रकरणाचा गांभीर्याने विचार करून न्याय मिळवून देणे आवश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

निषेध मोर्चा काढणाऱ्यांमध्ये साईं राजेशलाल, संत डॉ. श्री संतोष महाराज, रामपुरी पंचायत अध्यक्ष डॉ .इन्द्रलाल गेमनानी, कवर नगर पंचायत अध्यक्ष संतोष सबलानी, अनुप नगर पंचायतचे अध्यक्ष इन्द्रलाल पुरसानी, बडनेरा पंचायत अध्यक्ष चंदूमल बिल्दानी, किशनचंद कोटवानी, नंदलाल खत्री, सुनील मेहता,बंटी पारवानी, राजकुमार दुर्गेइ,मुकेश हरवानी, सुनील पमनानी, वासुदेव कृष्णानी, अनिल पमनानी ,पूरनलाल हबलानी, महेश पिंजनी, अशोक गेमनानी, तुलसी साधवानी, दिलीप संभवानी, जीतू थदानी, मोतीराम दलवानी, रामचंद्र आहूजा, पवन पासवानी, कैलाश दलवानी, नरेश सिरवानी, मनोहर धामेचा, मयूर मोटा ,वैभव बजाज, राजेश बजाज, कालू नोटानी, जितु मोटवानी, विनय मोटव मोहनलाल मधान, राजा नानवानी, राजेश शादी, जगदीश शतवानी, एड अनिल आडवाणी, विशाल राजानी, राजेश नानवानी, सुनील शादी, अनूप हरवानी, इन्द्रलाल दीपवानी, मुकेश बख्तर, मोहित भोजवानी,मनिष बजाज, श्रीचंद तेजवानी, भूषण बनसोड, किशोरचंद पुरसवानी, मुकेश लालवाणी, मोरंदमला बुधलानी, गुलशन दुर्गाई, अभिषेक पंजाबी, वैभव बजाज, आकाश रायाखंडानी, विक्की खत्री, दिनेश मीरानी, अवी नेभानी, गणेश नेभानी, विक्की नावानी, राजेंद्र तेजवानी, हर्ष खत्री, दीपक जेठाणी, महेश खत्री, सुरज आहुजा, पवन आहुजा, चंदन नागवाणी, गिरीश बोधानी, अनिल कमनानी, मुकेश पिंजानी, सुनील सोनी, विक्की आहुजा, लखन वाधवानी, जय शर्मा, अनिल गंगवाणी, सतीश साधवानी, अनिल जेठाणी, अशोक नागवाणी, विक्की देवानी, सुनील हासानी, सुरज हासानी, ललित राघानी, हरिश सुंदरानी, सूरज आहूजा, हर्ष खत्री, अनिल जेठानी, प्रेम पुरस्वानी, राकेश जेठानी, राजेश मोटवानी, संतोष चंदवानी, आकाश रायखानदानी, मोहन खत्री, लखन मीरानी, कमलेश बुधवानी, अनिल कमरानी, गणेश नेमानी, विक्की देवानी, सतीश साधवानी, चंदन नागवानी, मुकेश लालवाणी, मोरंदमला बुधलानी, रामचंद पिंजानी, दयाराम पिंजानी, सुरेशकुमार गंगवाणी, सुरेशकुमार खत्री, जगदीश गंगवाणी, अजय नावानी, आंनद जेठानी, तुलसीदास बजाज, राकेश जयसिंघानी, अजय बजाज, अजय सोभानी, विजय थधानी, आकाश जयसिंघानी, मनीष बिशनानी, आकाश तनवाणी, राजकुमार गंगवाणी, सुरेश देवानी, प्रकाश देवानी, महेश धनकानी, अनिल जवहाराणी, अनिल मुडवानी, हरीश सुंदरानी, महेश नन्दवाणी, नरेश नंदवाणी, सतराम सुखेजा, बलराज आनंदानी, अन्नू तेजवानी, अरुण पिंजानी, अशोक दोडाई, किशनचंद धामेचा, अशोक मीरानी, गुलाब उदासी, श्रीचंद भोजवानी, सुनील उदासी, अशोक राजपाल, बलराम गंगवाणी, राजकुमार बतरा, प्रकाश नावानी, रघुवीर भोजवानी, संतोष पारवानी, ठाकुरदास भागवाणी, ओमप्रकाश पुंशी, दीपक भोजवानी, नरेश चैनानी, लालचंद धामेचा, जॉनी पिंजानी, सुरेश पिंजानी, हरीश दलवानी, श्याम धनकानी सह समाज बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

### महापालिका क्षेत्रात मालमत्तेच्या

मालमत्ता कर हा किती व कसा लावावा, याबाबत महापालिकेला अधिकार असले तरी कर आकारणी करतांना कुणावर आर्थिक बोजा वाढेल व त्याचा परिणाम शहराचा विकास व गुंतवणुकीवर होणार नाही, याबाबत सुद्धा सुयोग्य नियोजन करणेही,महत्वाचे आहे. घर -इमारती अथवा जागा अशा मालमत्ता स्वतः वापरा किंवा भाड्याने दिल्या असल्यास त्यांचा मालमत्ताकर सारखाच असला पाहिजे. याबाबत आमदार खोडके यांनी आग्रही भूमिका घेतली आहे.

दरम्यान आ. खोडके यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री ना. अजित पवार यांना पत्र देऊन अमरावती महानगर पालिकेतील कमर्शियल टॅक्सधारकांना आकारण्यात येत असलेले सुपर टॅक्स संदर्भात आवश्यक सुधारणा करण्याबाबतची मागणी केली होती. सोलापूर, नाशिक महानगर पालिका, छत्रपती संभाजीनगर आणि नागपूर मध्ये सुद्धा सारखाच कर आकाराला जात असल्याचे आमदार महोदयांनी पत्रातून ना. पवार यांना अवगत केले. त्यानुसार अमरावती महानगर पालिकेला सुद्धा सर्व कायदेशीर बाजू तपासून भाडेधारकासंदर्भातील कर आकारणी संदर्भात निर्णय घेऊन शहरातील मालमत्तांधारकांना सारखाच टॅक्स आकारण्याबाबत ना.अजित पवार यांनी देखील निर्देशित केले होते.

अशातच मागील २६ सप्टेंबर २०२५ रोजी जिल्ह्याचे पालकमंत्री ना. चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली मनपात आढावा बैठक संपन्न झाली असता कमर्शियल टॅक्स वसुलीस संदर्भात आ. सुलभा खोडके यांनी मुद्दा उपस्थित करून गांभीर्याने चर्चा केली. अमरावती महानगरपालिकेचा मालमत्ता कर हा उत्पन्नाचा मुख्य स्त्रोत आहे. महापालिकेने अनेक मालमत्ता या कराच्या कक्षेमध्ये आणाल्या ही चांगली बाब असली तरीही मालमत्ता कर आकारणी व वसुली प्रणाली अधिक सुलभ करणे महत्वाचे आहे. अमरावती शहरांमध्ये भाडे कराराने दिलेल्या इमारतींना महानगरपालिकेतर्फे प्रत्यक्ष भाड्यावर कर आकारणी करण्यात येत असून त्यांना सुमारे ५० टक्के उत्पन्न मालमत्ता करापोटी महानगरपालिकेस जमा करावे लागत आहे. याचा परिमाण शहराच्या गुंतवणुकीवर झाल्याने यामध्ये सुधारणा करणे आवश्यक असल्याचे आमदार महोदयांनी सांगितले होते. यावर पालकमंत्री बावनकुळे व यांनी मनपा आयुक्तांना त्याबाबत कार्यवाहीच्या सूचना देखील केल्यात.

तदनंतर आ. सुलभा खोडके यांनी मागील १० ऑक्टोबर २०२५ रोजी मनपा आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्यासोबत झालेल्या बैठकीतही मुद्दा मांडून शहरातील कमर्शियल टॅक्सधारकांना दिलासा देण्यासंदर्भात कार्यवाही करण्याची सूचना केली.

त्यानुसार आता अमरावती महानगर पालिका आयुक्त तथा प्रशासक सौम्या शर्मा चांडक यांनी कर मूल्य निर्धारण संदर्भातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांची बैठक घेऊन महापालिकेच्या अधिनियम व तरतुदीनुसार तसेच सर्व कायदेशीर बाबी तपासून कर आकारणी प्रणाली सुलभ करण्याबाबत निर्णय घेतला. त्यानुसार कर आकारणी पद्धतीमध्ये सुधारणा करण्यात आली असून मालमत्तेच्या क्षेत्रफळ आधारित कर आकारणी करण्यात येणार आहे. यामुळे शहरातील मालमत्ता धारकांना मोठा दिलासा मिळणार आहे. याबद्दल आ. सुलभा खोडके यांनी पालकमंत्री ना.चंद्रशेखर बावनकुळे व मनपा आयुक्त सौम्या शर्मा यांचे आभार मानले.

### शेअर मार्केटमध्ये गुंतवणुकीच्या

मेसेजच्या माध्यमातून योगेशला जास्त नफ्याचे आमिष दिले. त्यांना क्रिप्टो मध्ये मोठी रक्कम ट्रान्सफर करण्यासाठी सांगीतले. यानंतर योगेश ने त्यांच्या बँक ऑफ बडोदा खात्यातून आरोपींच्या विविध खात्यामध्ये पैसे पाठवले. या खात्यामधून योगेश ने काही रक्कम विड्रॉल करण्यासाठी म्हटले तर आरोपींनी त्यांना उडवा उडवी चे उत्तर दिले. त्यांच्या खात्यामध्ये पैसे जमा झाले नाही. त्यांना सांगण्यात आले की तुमचे पैसे विड्रॉल झाले आहे. जखोटिया यांना फेक विड्रॉल पावती सुद्धा पाठविण्यात आली. सर्व प्रकारानंतर जाखोटिया यांना आपली फवणुक झाल्याचे लक्षात आले. मात्र तोपर्यंत त्यांनी २३ लाख २५ हजार ९२४ इन्वेस्ट केले होते. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच जाखोटियांनी सायबर पोलिस ठाण्यात तक्रार दिली.पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

### बस स्थानक चौकशीचा

ये-जा करतात. अशा वेळी चौकशीसाठी असलेला एकमेव संपर्क क्रमांक कार्यरत नसणे ही गंभीर बाब आहे.

महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी या बाबीकडे तातडीने लक्ष देऊन चौकशी फोन पुन्हा सुरु करावा, अशी प्रवाशांकडून मागणी होत आहे. तांत्रिक कारणामुळे फोन बंद असेल तर त्याची त्वरित दुरुस्ती करून सुविधा पूर्ववत करावी, अन्यथा प्रवाशांच्या अडचणी वाढतील, असा इशारा नागरिकांनी दिला आहे.

### अळणगाव घरफोडी प्रकरणाचा

दोन आरोपींना शिताफीने अटक केली. यामध्ये ईजानोमुद्दीन हकीमोद्दीन पठाण (वय २० वर्षे, रा. ईनला, ता.जि. अमरावती) सोहेल उर्फ सोनू खान शमी खान (वय २४ वर्षे, रा. लालखडी, अमरावती) या दोन्ही आरोपींना अटक करून त्यांच्या ताब्यातून गुन्ह्यात वापरलेली साधने तसेच मुद्देमाल हस्तगत करण्यात आला.

प्राथमिक चौकशीत आरोपींचा इतर काही चोरीच्या घटनांमध्येही सहभाग असल्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली असून, पुढील तपास सुरू आहे.ही यशस्वी कारवाई पोलीस आयुक्त अरविंद चावरिया, पोलीस उपायुक्त (परिमंडळ-१) गणेश शिंदे आणि सहाय्यक पोलीस आयुक्त कैलास पुंडकर यांच्या मार्गदर्शनाखाली नांदगाव पेठ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक दिनेश दहातोंडे, पोहेकॉ राजाभाऊ राऊत, पोकों वैभव तिखिले, राजीक खान, शोएबुद्दीन सैयद आणि निलेश साविकार यांनी केली.या उत्कृष्ट कामगिरीबद्दल नागरिकांनी नांदगाव पेठ पोलिसांचे अभिनंदन केले आहे.

### शहरातील अवैध दारू विक्रीविरोधात

प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने असंख्य महिला व कार्यकर्त्यांनी धडक देत पोलिस आयुक्तांकडे निवेदन सादर केले.

निवेदनात म्हटले आहे की, वडाळी, फ्रेजरपुरा, वडरपुरा, संजय गांधी नगर, बेनोडा, दस्तुर नगर, चवरे नगर अशा अनेक भागांमध्ये खुलेआम अवैध दारू विक्री सुरू असून त्यावर पोलिस प्रशासनाकडून ठोस कारवाई होत नाही. यामुळे परिसरात गुन्हेगारी, बेरोजगारी आणि कौटुंबिक कलह वाढले आहेत. महिलांना त्रास होत असून तरुणाई या व्यसनाच्या आहारी जात आहे तर या वाढत्या व्यसनाधिनतेमुळे असंख्य कुटुंबाची राखरांगोळी झाली आहे.

स्थानिक रहिवासी याबाबत पोलिसांना तक्रारी करतात. मात्र पोलीस प्रशासन ठोस कार्यवाही न करता थातुरमातुर कारवाई करून अवैध दारू विक्री करणाऱ्यांना प्रोत्साहन देत असल्याचा आरोप महिलांनी केला आहे. त्यामुळे प्रहार जनशक्ती पक्षाने मागणी केली की, एम.डी. ड्रग्ज प्रकरणाप्रमाणेच विशेष पथक नेमून या अवैध दारू विक्रेत्यांविरुद्ध विशेष मोहीम हाती घेण्यात यावी. आगामी मनपा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर दारूचा गैरवापर होण्याची शक्यता असल्याने तातडीने कारवाई करावी अन्यथा संतप्त महिला रस्त्यावर उतरून आंदोलन करेल असा इशारा यावेळी प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने देण्यात आला आहे.

यावेळी निवेदन देतांना बंटी रामटेके यांच्यासह संपर्क प्रमुख गोलू पाटील, जिल्हा महासचिव शेख अकबर, संघटक प्रमुख शाम इंगळे व सामाजिक कार्यकर्ते प्रशांत देशमुख यांच्या सह कविता भुसम,अलका तेलमोरे,रंजना सरोदे,वैष्णवी बावणकर,वंदना गवई,प्रिती गवई,उषा गायकवाड,रुकसाना बानो, लता मिसळे,हिना परवीन शेख, उज्वला तायडे,वनिता जवंजाळ,शोभा वासनिक,माया मेश्राम, रक्षना गुजर,ज्योती इंगळे,ज्योत्स्ना गवई,कमला धुळे,वर्षा खडसे,सायरा हुसैन,शारदा बढिये,राजकन्या मेश्राम,बाली इंगळे,नितु गवई,साधना गवळी, पूषा तेलगोटे,शोभा वासनिक,चंदा उमेकर, निर्जला वानखडे,विशाखा नगराडे आदी शेकडो महिला उपस्थित होत्या.

**समाजात असुरक्षिततेचे वातावरण-** शहरातील अवैध दारू विक्रीमुळे समाजात गुन्हेगारी वाढली असून नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. अनेक गरीब कुटुंबांचे संसार उद्ध्वस्त होत आहेत. पोलिस प्रशासनाने या गंभीर समस्येकडे तातडीने लक्ष देऊन अवैध दारू विक्रेत्यांवर धडक कारवाई करावी.

-बंटी रामटेके, महानगर प्रमुख- प्रहार जनशक्ती पक्ष, अमरावती

### अग्निशमन विभागातील कंत्राटी

आयुक्तांना निवेदन दिले असता त्यांनी संबंधित कर्मचाऱ्यांची बदली तात्काळ थांबवली. या घटनेच्या तीन दिवसानंतर अग्निशमन विभागातील कर्मचाऱ्यांनी आजाद समाज पार्टीचे नेते मनीष साठे, सनी चव्हाण ,मंगेश वानखेडे यांचा सत्कार केला. त्यांनी कुठलाही पक्षात प्रवेश केला नव्हता, परंतु एका संघटनेचे निवेदनावरून सहा कर्मचाऱ्यांना तात्काळ कुठलीही चौकशी न करता कामावरून काढून टाकण्यात आले. त्यामुळे त्यांच्या कुटुंबावर उपासमारीची पाळी आली आहे. कर्मचाऱ्यांना पुन्हा कामावर घ्यावे आणि अग्निशमन विभागाचे भ्रष्ट कर्मचारी संतोष केंद्रे, लक्ष्मण पावडे यांच्यावर कारवाई करावी म्हणून उपोषण करण्यात येत आहे. उपोषण करणाऱ्यांमध्ये जावेद खान, राजू शेंडे ,आकाश राऊत, मोहम्मद जुबेर, अब्दुल रशीद, अब्दुल इमरान, शेख अमीन यांचा समावेश आहे.आजाद समाज पार्टीचा उपोषणकर्त्यांना पूर्ण पाठिंबा आहे.

### जिल्हा परिषद शाळा व शिक्षक

करण्यात आले आहे. या अभियानाच्या माध्यमातून व्यवस्थापन समिती आपल्या मागण्या शासनापर्यंत पोहोचवीत आहे. या मागण्या पूर्ण नाही झाल्या तर हिवाळी अधिवेशनात उपोषण करण्याचा इशारा आज मंगळवार ४ नोव्हेंबर रोजी झालेल्या पत्रकार परिषद मध्ये देण्यात आला.

संविधानानुसार ० ते १४ वर्षपर्यंत सक्तीचे व मोफत शिक्षण सर्व सोयीयुक्त करून शिकवावे ही शासनाची जबाबदारी आहे. सरकारच्या उत्पन्नातून सहा टक्के खर्च जिल्हा परिषद शाळे करिता करावा, परंतु आजच्या माहितीप्रमाणे सहा टक्के खर्च शासन करीत नाही. फक्त अडीच टक्के खर्च करीत आहे. यामुळे जिप प्रायमरी शाळा सध्या क्रमाक्रमाने बंद होत आहे. भविष्यात जि प शाळा पूर्णपणे बंद होण्याच्या मार्गावर आहे. यामुळे गाव तिथे शाळा संविधान व २००९ प्रमाणे शिक्षण मानव मूलभूत हक्का नुसार जिल्हा परिषदेची कोणतीही शाळा बंद करू नये. ० ते १४ वयोगटात सक्तीचे व मोफत शिक्षणाने ते आधुनिक शैक्षणिक भौतिक व सर्व सुधारणा करून शाळेचा शैक्षणिक दर्जा वाढवावा. जि प शाळेतील शिक्षकांचे सर्व अशैक्षणिक कामे बंद करून शैक्षणिक कामाची जबाबदारी वाढवावी. अंगणवाडी केंद्रामध्ये केजी वन केजी टू ची व्यवस्था करावी. शाळेत मानधन नियुक्ती केलेल्या शिक्षकांना कायमस्वरूपी करावे. या मागण्यांवर हिवाळी अधिवेशनापूर्वी निर्णय न घेतल्यास हिवाळी अधिवेशनात उपोषण करण्याचा इशारा पत्रकार परिषद मध्ये देण्यात आला आहे. पत्रकार परिषदेमध्ये मुरलीधर डहाणे व इतर उपस्थित होते.

### तंबाखू नियंत्रण कार्यक्रमाला यश!

जिल्हा रुग्णालय आणि तालुका स्तरावर एकूण १४ समुपदेशन केंद्र कार्यरत आहेत, जिथे सन २०१७ पासून आजपावेतो ९० हजार ३२८ लोकांना समुपदेशन करण्यात आले.

यासोबतच, कोटपा कायदा २००३ ची कठोर अंमलबजावणी करण्यात येत आहे . सन २०१७ पासून सार्वजनिक ठिकाणी धूम्रपान आणि कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या ३ हजार ६६४ लोकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. या कारवाईतून ५ लाख ८४ हजार ४१६ रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. अन्न व औषध विभागाने २०१८ पासून अवैध तंबाखूवर २१२ कारवाया करत ५ कोटी ५१ लाख रुपयांहून अधिक किमतीचा माल जप्त केला आहे.

या यशासाठी जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य, पोलीस, शिक्षण व अन्न व औषध विभागाच्या समन्वयाची भूमिका महत्त्वाची ठरली आहे.

## जाहीर नोटीस

अचलपूर स्थित तदर्थ जिल्हा व सत्र न्यायाधीश-२ इनके न्यायालयमें स्थान,
अचलपूर जिला अमरावती (महाराष्ट्र)

Regular Civil Appeal No.31/2018 F.F. 24.12.2025

**पिटीशनर - विक्रम कृष्णराव राजुरकर व ईतर**

**-विरुध्द-**

**रिस्पांडंट - अजय विजयसिंग राजुरकर व ईतर**

**बनाम -**
7(A) Vijayrao Raghunath Sangle,
7(B) Abhishek Vijayrao Sangle
Both R/o Sanglae Ka Wada, Dhaba Road, Ujjain (M.P.)
7(C) Pooja Bharat Perlekar,
R/o Vasudev Nagar, Manik Baug Road, Indore (M.P.)
8. Neena Uttamsingh Kadam
R/o 89, Gopal Baug, Manik Baug Road, Indore (M.P.)

**APPEAL U/SEC 96 OF CODE OF CIVIL PROCEDURE**

**गैरअर्जदार-** **निरंक**

युंकी उपरोक्त नाम के पिटीशनर **विक्रम कृष्णराव राजुरकर**, वय ४४ वर्षे, व्यवसाय - शेती, रा.दामले रोड, रामदास पेठ, अकोला, ता.जि.अकोला, इन्होने वि.तदर्थ जिल्हा व सत्र न्यायाधीश-२, अचलपूर, जि.अमरावती इनके न्यायालय मे अपील दाखील किया है.

इसलिए रिस्पांडंट नं.7(A) Vijay Raghunath Sangle, Age 70 Yrs. Occu.: Agri., 7(B) Abhishek Vijayrao Sangle, Age 39 Yrs. Occu.: Trading, Both R/o Sangale ka Wada, Dhaba Road, Ujjain (M.P.) 7(C) Pooja Bharat Perlekar, Age 42 Yrs. Occu.: Housewife, R/o Vasudev Nagar, Manik Baug Road, Indore (M.P.), 8. Neena Uttamsingh Kadam, Age 63 Yrs. Occu.: Housewife, R/o. 89, Gopal Baug, Manik Baug Road, Indore (M.P.) इनको जाहीर नोटीस दी जाती है की वे तारीख २४.१२.२०२५ को सुबह ११.०० बजे वि.तदर्थ जिल्हा व सत्र न्यायाधीश-२, अचलपूर, जि.अमरावती इनके न्यायालयमे स्वयं अथवा निर्दिष्ट किए गये वकील के मार्फत उपस्थित होवे. उपरोक्त निर्दिष्ट तारीख पर किसी के न उपस्थित होने पर कथीत आवेदन की एकतरफा सुनवाई करके एकतरफा निर्णय दिया जाएगा.

आज तारीख २५ जून २०२५ को मेरे हस्ताक्षर एवं न्यायालय की मुहर के साथ प्रकाशन के लिए दिया गया.

अचलपूर
तारीख २५ जून २०२५

शिक्का

आदेशानुसार,
**प्र.अधीक्षक**
जिल्हा व सत्र न्यायालय-१, अचलपूर

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ बुधवार, ५ नोव्हेंबर २०२५ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# सुक्ष्म नियोजनातून निवडणूक कामकाज यशस्वी पार पाडावे – जिल्हाधिकारी

## कारंजा व मानोरा तालुक्यातील निवडणूक तयारीचा घेतला सविस्तर आढावा

■ प्रतिनिधी | वाशिम ■

**स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी जबाबदारीने तसेच गांभीर्याने काम करावे. विधानसभा आणि लोकसभा निवडणुकीपेक्षा या निवडणुकीचे स्वरूप अधिक व्यापक आहे. त्यामुळे निवडणूक आयोगाचे परिपत्रक आणि हँडबुक नीट वाचावे. आतापासूनच सुक्ष्म नियोजन करून निवडणूक यशस्वीपणे पार पाडावी, असे निर्देश जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी दिले.**



आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि नगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी कुंभेजकर यांनी आज कारंजा आणि मानोरा तालुक्यातील निवडणूक तयारीचा सविस्तर आज त्यांनी आढावा घेतला.यावेळी ते बोलत होते.

कारंजा येथे झालेल्या बैठकीस उपविभागीय अधिकारी कैलास देवरे, उपजिल्हाधिकारी विरेंद्र जाधव, उपविभागीय पोलिस अधिकारी प्रदीप पाडवी,नगर प्रशासन सह आयुक्त बी.डी. बिक्कड, तहसीलदार कुणाल झाल्टे, अपर मुख्य कार्यकारी अधिकारी किरण कोवे, मुख्याधिकारी महेंद्र वाघमोडे तसेच संबंधित नोडल आणि झोनल अधिकारी उपस्थित होते. मानोरा येथील बैठकीस उपविभागीय अधिकारी कैलास देवरे, उपजिल्हाधिकारी विरेंद्र जाधव, तहसीलदार डॉ. संतोष येवलीकर, गटविकास अधिकारी डॉ. प्रफुल्ल भोरकाडे उपस्थित होते.

जिल्हाधिकारी कुंभेजकर म्हणाले की, कार्यविभाजनाप्रमाणे प्रत्येक अधिकाऱ्याने आपापल्या जबाबदाऱ्या समजून घेतल्या पाहिजेत. झोननिहाय ईव्हीएम सिलींगचे कामकाज करावे लागणार असून वर्कलोड मोठा असणार आहे. त्यामुळे नोडल अधिकाऱ्यांनी अधिनस्त कर्मचाऱ्यांकडून जबाबदारीने आणि प्रामाणिकपणे काम करून घ्यावे. निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता, शिस्तबद्धता आणि अचूकता राखण्यासाठी नियोजनावर भर द्यावा, असे त्यांनी स्पष्ट केले.

मतदान केंद्रांवर पायाभूत सुविधा उपलब्ध असाव्यात, जेणेकरून मतदारांची गैरसोय होणार नाही. प्रशिक्षण अधिकारी यांनीच प्रशिक्षण घ्यावे. नोडल अधिकाऱ्यांकडून चोख कामगिरी अपेक्षित आहे. मतदान केंद्रांवर मोबाईल डिपॉझिटची सोय व सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत. वार्डनिहाय मतदार जनजागृती मोठ्या प्रमाणात करावी. मतदारांना बीयू व सीयू बाबत माहिती व्हावी यासाठी गणनिहाय जनजागृती करावी. दिव्यांग मतदारांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, असेही त्यांनी सांगितले.

आचारसंहिता कक्षाने अनुषंगिक अहवालांचे फॉरमॅट्स आधीच तयार ठेवावेत. खर्च निरीक्षण पथकांनी उमेदवारांच्या खर्चाची माहिती वेळेत गोळा करून वरिष्ठ कार्यालयास सादर करावी. ईव्हीएम मशिन हाताळणीबाबत प्रशिक्षण घ्यावे आणि आरओ हँडबुक मॅन्युअलचे वाचन करून उजळणी करावी, अशा सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या. निवडणूक निरीक्षकांसाठी निवासाची व्यवस्था सुस्थितीत करून ठेवावी, असेही त्यांनी नमूद केले.(जिल्हाधिकारी पुढे म्हणाले की, वाहतूक व्यवस्था आधीच आरक्षित करून ठेवावी. पोलिस विभागाने संवेदनशील मतदान केंद्रांची ओळख करून घ्यावी आणि प्रत्येक केंद्रावर चोख बंदोबस्त ठेवावा. मतदान केंद्रांवर गर्दी नियंत्रणासाठी प्रतिबंधात्मक आदेश लागू करावेत, याकरिता पोलिस विभागाने सजग राहावे, असेही त्यांनी निर्देश दिले.बैठकीदरम्यान उपविभागीय अधिकारी कैलास देवरे आणि तहसीलदार कुणाल झाल्टे यांनी निवडणूक नियोजनाचे सादरीकरण केले. तहसीलदार झाल्टे यांनी सांगितले की, कारंजा तालुक्यात एकूण ११० इमारतींमध्ये १४५ मतदान केंद्रे असून १ लाख १९ हजार ४६४ मतदार आहेत. निवडणूक सुरळीत पार पाडण्यासाठी ३ एसएसटी, ४ एफएसटी, ३ व्हीएसटी आणि १ व्हीव्हीटी पथक स्थापन करण्यात येणार असून ६५६ मनुष्यबळ उपलब्ध करण्यात आले आहे.

उपविभागीय अधिकारी देवरे यांनी निवडणूक तयारीचा आढावा, साहित्य साठवण, मनुष्यबळ नियोजन आणि मतदान केंद्रांवरील उपाययोजनांची माहिती दिली. त्यांनी सांगितले की, या कामकाजासाठी नियुक्त प्रत्येक अधिकारी आणि कर्मचारी उत्कृष्टपणे कार्य करतील. मानोरा येथील सादरीकरण तहसीलदार डॉ. येवलीकर यांनी केले. त्यांनी सांगितले की, तालुक्यात एकूण १४९ मतदान केंद्रे असून १ लाख २३ हजार ११५ मतदार आहेत. निवडणुकीच्या सुरळीत पार पाडण्यासाठी ४ एसएसटी, ३ एफएसटी, ३ व्हीएसटी आणि १ व्हीव्हीटी पथक स्थापन करण्यात आले असून ८२५ कर्मचाऱ्यांचे मनुष्यबळ नियोजित केले आहे. ईव्हीएम नोडल अधिकारी विरेंद्र जाधव यांनी ईव्हीएम व्यवस्थापन, मतपत्रिका, टपाली मतदान आणि मतदान केंद्रनिहाय बीयू-सियू सुनिश्चित करणे याबाबत सविस्तर माहिती दिली. बैठकीला जिल्हास्तरीय नोडल अधिकारी, विविध विभागांचे अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते. जिल्हाधिकारी कुंभेजकर यांच्या सुक्ष्म नियोजनात्मक मार्गदर्शनामुळे निवडणूक कामकाज शिस्तबद्ध, पारदर्शक आणि यशस्वी पार पडेल, असा विश्वास अधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

## एक विद्यार्थी, एक वही' उपक्रमाने उभा केला संवेदनशीलतेचा आदर्श



**अकोला :** मराठवाड्यातील अतिवृष्टीमुळे हजारो विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाले असताना, अकोल्यातील विद्यार्थ्यांनी संवेदनशीलतेचा सुंदर दाखला दिला आहे. विद्या भारती विदर्भ अकोला जिल्हा तर्फे राबविण्यात आलेल्या 'एक विद्यार्थी – एक वही' या उपक्रमाला अकोला महानगरातील विविध शाळांच्या विद्यार्थाकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या उपक्रमात प्रत्येक विद्यार्थ्याने किमान एक वही तसेच पेन, पेन्सिल, पट्टी, इरेजर, दप्तर यांसारखे शैक्षणिक साहित्य दान केले. विद्यार्थ्यांच्या छोट्या-छोट्या योगदानातून एक मोठा सामाजिक उपक्रम उभा राहिला. जमा झालेले पंधरा पोते साहित्य विद्या भारतीच्या कार्यकर्त्यांनी प्रशांत बढे यांच्या सहकार्याने आज धाराशीवकडे रवाना केले असून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या सेवा विभागामार्फत पूरग्रस्त विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविले जाणार आहे. विद्या भारतीचे माजी जिल्हा मंत्री शरद वाघ व महानगर मंत्री योगेश मल्लेकर यांच्या संकल्पनेतून साकार झालेल्या या उपक्रमात शिक्षक व विद्यार्थ्यांचा उत्साही सहभाग दिसून आला. विद्या भारतीचे महानगर अध्यक्ष मंगेश वानखडे यांनी विद्यार्थ्यांच्या दानशूर वृत्तीचे कौतुक करत पूरग्रस्त गरजू विद्यार्थ्यांना मदतीचा हात देत असताना आपल्या मुलांमध्ये सामाजिक जाणीवेची बीजे रोवली जात आहेत, अशा सामाजिक जाणिवा समाजातील सकारात्मक बदलाची बीजे ठरतात, हीच खरी या उपक्रमाची यशोगाथा असल्याचे मत व्यक्त केले. या प्रसंगी नवनियुक्त जिल्हा मंत्री गिरीश कानडे, गिरीजा कानडे, जय राणे, महेंद्र किटूकुले, पूजेश बिडकर उपस्थित होते.

## शेतकऱ्यांचे संरक्षण कवच प्रधानमंत्री पीक विमा योजना!

■ प्रतिनिधी | वाशिम ■

पिकांच्या नुकसानीच्या कठीण परिस्थितीत शेतकऱ्यांचे आर्थिक स्थैर्य अबाधित ठेवण्यासाठी महाराष्ट्र शासनाने प्रधानमंत्री पीक विमा योजना रब्बी हंगाम २०२५-२६ साठी राबविण्याचा निर्णय घेतला आहे. या योजनेंतर्गत अधिसूचित महसूल मंडळातील अधिसूचित पिकांसाठी उत्पादनावर आधारित सुधारित विमा सुविधा उपलब्ध आहे. या हंगामात गहू (बागायत), रब्बी ज्वारी (बागायत व जिरायत), हरभरा, उन्हाळी भात, उन्हाळी भुईमुग आणि रब्बी कांदा ही सहा पिके अधिसूचित करण्यात आली आहेत. शेतकऱ्यांना या पिकांसाठी योजनेत सहभाग घेता येईल. सहभागासाठीची अंतिम मुदत पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात आली आहे.

## मालेगांव नगरपंचायत मतदार यादीत घोळाचा भडका!

■ अक्षय सावले ■

मालेगांव : मालेगांव नगरपंचायत सार्वत्रिक निवडणुकीच्या तोंडावर मतदार याद्यांतील गोंधळाने चांगलाच भडका उडाला आहे. काही मतदारांची नावे एक-दोन नव्हे तर तब्बल चारवेळा नोंदवली गेली असून, काहींची नावे दोन-दोन प्रभागांत झळकत आहेत! यामुळे मतदार आणि प्रशासन दोघेही गोंधळाच्या भोवऱ्यात सापडले आहेत.

एक एक मत महत्वाचं ! असा नारा देणाऱ्या निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर आता मोठं प्रश्नचिन्ह उभं राहिलं आहे. नागरिकांकडून अनेक तक्रारी दाखल होऊनही योग्य पडताळणी न केल्याचा आरोप स्थानिक नागरिक आणि सामाजिक संघटनांकडून होत आहे.

यावेळी झालेल्या सुनावणीत एउअ देवकर मॅडम यांनी स्पष्ट आश्वासन दिलं होतं की, जे मतदार ज्या प्रभागात राहतात त्यांची




नावे त्याच प्रभागात दाखल केली जातील.मात्र प्रत्यक्षात काहींची नावे आली, तर काहींची अद्यापही गायब आहेत! परिणामी, अनेक मतदारांना मतदानाच्या अधिकारापासून वंचित राहावं लागलं आहे.

यामुळे संतप्त मतदारांमध्ये प्रचंड नाराजी निर्माण झाली असून, काहींनी मतदान बहिष्काराचा इशारा दिला आहे. या सुनावणीत उपस्थित असलेल्या पाच पंचांनीही मतदारांची नावे योग्य प्रभागात दाखल करण्याचे आदेश दिले होते. तरीसुद्धा परिस्थितीत काहीच फरक न पडल्याचे दिसत आहे हा प्रकार निवडणुकीच्या पारदर्शकतेवर गदा आणणारा आहे असा आरोप नागरिकांकडून होत आहे.

**अजून एक धक्कादायक बाब म्हणजे** — नगरपंचायत कर्मचाऱ्यांचीच नावे चुकीच्या प्रभागात नोंद झाल्याचे समोर आले आहे! यामुळे प्रशासनाच्या निष्काळजीपणाचा आणि यंत्रणेत चाललेल्या गोंधळाचा पुन्हा एकदा पर्दाफाश झाला आहे.

**जनतेच्या मनात आता फक्त एकच सवाल :** हा मतदार यादीचा खेळ कोण खेळतोय ? जबाबदार कोण आणि कारवाई कधी ? मतदारांच्या रोषामुळे आता या प्रकरणाची चर्चा शहरात सर्वत्र रंगली आहे, आणि प्रशासनावर कठोर कारवाईची मागणी जोर धरू लागली आहे. मालेगांवकरांचा आवाज एकच — मतदारांचा अपमान सहन नाही !

## धोकादायक इसम मितेश अमर गिरी एक वर्षासाठी स्थानबद्ध

■ प्रतिनिधी | अकोला ■

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी याकरिता अकोला जिल्हा प्रशासन व पोलिस दलाने मोठी कारवाई केली आहे. अकोला शहरातील मलकापूर, खदान परिसरातील कुख्यात गुंड मितेश अमर गिरी (वय २१ वर्षे) यास एम.पी.डी.ए. कायद्यान्वये एक वर्षाकरिता अकोला जिल्हा कारागृहात स्थानबद्ध करण्यात आले आहे.

मितेश गिरी हा शहरातील धोकादायक इसम म्हणून ओळखला जातो. त्याच्यावर चोरी, घरफोडी, घातक हत्यारांनी हल्ला, स्त्रीचा विनयभंग, लैंगिक छळ, अश्लील कृती, शांतताभंग, बेकायदेशीर शस्त्र बाळगणे



तसेच हद्दपार आदेशाचे उल्लंघन अशा अनेक गंभीर गुन्ह्यांची नोंद अकोला शहरातील विविध पोलीस ठाण्यांत आहे.

पूर्वी त्याच्यावर अनेकदा प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली होती, मात्र त्या कारवाईंचा त्याच्यावर काहीच परिणाम झाला नव्हता. त्यामुळे त्याच्या वाढत्या गुन्हेगारी प्रवृत्तीवर आळा घालण्यासाठी पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी स्थानबद्धतेचा प्रस्ताव जिल्हादंडाधिकारी श्रीमती वर्षा मीना यांच्याकडे सादर केला होता.

सर्व कायदेशीर बाबींची पडताळणी करून आणि स्वतंत्र स्रोतांकडून माहिती मिळवून मा. जिल्हादंडाधिकारी वर्षा मीना यांनी दिनांक ०४ नोव्हेंबर २०२५ रोजी मितेश गिरी यास एक वर्षाकरिता स्थानबद्ध ठेवण्याचा आदेश जारी केला.

या आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करून स्थानिक गुन्हे शाखा व खदान पोलीस ठाण्याच्या पथकाने मितेश गिरीला ताब्यात घेऊन त्यास अकोला जिल्हा कारागृहात दाखल केले.

या संपूर्ण कारवाईत अपर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी, उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन पाटील, पोलीस निरीक्षक शंकर शेळके, पोउपनि माजीद पठाण, तसेच पोहेकॉ. ज्ञानेश्वर सैरिसे, पोकॉ. उदय शुक्ला, पोनि. मनोज केदारे, सपोनि निलेश करंदीकर आदी अधिकारी व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.'अकोला जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी आणि आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका व सण-उत्सव काळात शांतता अबाधित ठेवण्यासाठी अशा सराईत गुन्हेगारांवर एम.पी.डी.ए. व इतर कायद्यांन्वये कठोर कारवाई सुरूच राहील,' असा इशारा जिल्हा पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी दिला आहे.

## कधीही न दिसणाऱ्या उमेदवाराला लागले निवडणुकीचे डोहाळे

■ प्रतिनिधी | पातूर ■

राज्यात नगरपरिषद - नगरपालिका निवडणुकीची घोषणा नुकतीच राज्य निवडणूक आयोगाने पत्रकार परिषद घेत मंगळवारी दुपारी केली. निवडणुकीचे वारे वाहू लागताच पातुर तालुक्यातही राजकीय हालचालींना वेग आला आहे. निवडणूक जवळ आली की पाच वर्षे गायब राहणारे, गावकऱ्यांच्या सुखदुःखात न दिसणारे, जनतेच्या प्रश्नांपासून दूर राहणारे तथाकथित लोकनेते आता अचानक 'सेवेचा जाज्वल्य भाव' घेऊन बाहेर पडले आहेत.

गेल्या पाच वर्षांत गावकऱ्यांच्या दारात पाय न ठेवणारे हेच नेते आता दहावी,

### पातूर शहरात चर्चांना उधाण

तेरावी, कार्यक्रम, गावसभा, कीर्तन-भजन इथपर्यंत पोचले आहेत. निवडणुकीचा वास लागला की जसे पावसाळ्यात बेडूक बाहेर येतात तसे हे 'राजकीय बेडूक'ही बाहेर पडल्याची चर्चा तालुक्यात रंगली आहे.

रस्ते, गटार, स्वच्छता, धूळ, विद्यार्थी, शेतकरी, कामगार यांचे प्रश्न दुर्लक्षित करणारे हेच लोक आता अचानक गावागावात विकासाच्या नावाने भाषणबाजी करताना दिसत आहेत. दर महिन्याला सभा, मोर्चे, जनसंवाद, आंदोलन असे प्रकार सुरू होत आहेत.

जनतेत मात्र वेगळ्याच चर्चा — 'बहती है गंगा, धो लो हात!' — म्हणजे निवडणूक आली की सगळ्यांनी आपापले स्वार्थ साधून घ्यायचे, अशीच स्थिती झाली आहे. गावोगावी लोक आता म्हणत आहेत, 'पाच वर्षे दिसले नाहीत, आता मत मागायला आले!' त्यामुळे तालुक्यातील नागरिक सजग होत असून या वेळी जनतेनेच अशा दिखाऊ, स्वार्थी उमेदवारांना धडा शिकवावा, अशी चर्चा चहाच्या टपरीपासून शेताच्या बांधापर्यंत रंगताना दिसत आहे.

## कोणत्याही राजकीय पक्षांनी मातंग समाजाला गृहीत धरू नये -भाई जगदीश इंगळे



■ प्रतिनिधी | वाशिम ■

स्थानिक विश्राम भवन वाशिम येथे दि. २ नोव्हेंबर रोजी दुपारी ३ वाजता मातंग समाजातील विविध सामाजिक संघटनेचे वतीने राजकीय अस्तित्वाच्या लढाईसाठी महत्त्वपूर्ण बैठकीचे आयोजन करण्यात आले. बैठकीला अध्यक्षस्थानी दादासाहेब क्षीरसागर मानवी हक्क अभियान राष्ट्रीय कार्याध्यक्ष तर प्रमुख उपस्थिती भाई जगदीश इंगळे संस्थापक अध्यक्ष बिगर सातबारा शेतकरी संघटना, संजय वैरागड राज्य कार्याध्यक्ष अखिल भारतीय मातंग संघ, विनोद जोगदंड माजी पंचायत समिती सदस्य, डॉक्टर रमेश चंदनशिव कारंजा, विजय लोंढे जिल्हाध्यक्ष कोर कमिटी लहुजी शक्ती सेना, जगदीश मानवतकर ब्लू टायगर सेना, माणिकराव बांगर विदर्भ अध्यक्ष अखिल भारतीय मातंग संघ, आत्माराम सुतार ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते, रवी कांबळे राष्ट्रीय लहू शक्तीसंग्राम परिषद, मालती गायकवाड समाजसेविका, अनिल कांबळे माझी जि प सदस्य, के के डाखोरे माजि जी प सदस्य, रामेश्वर पाटोळे सर, मेजर गोपाल आवारे, डॉ रामकृष्ण डोंगरे अकोला आदींची उपस्थिती होती. या महत्वपूर्ण बैठकीमध्ये अनेक मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी जि प सदस्य अनिल कांबळे यांनी मातंग समाजातील दाइन च्या माध्यमातून अनेक समाजावर खूप उपकार केले. तर विनोद जोगदंड यांनी आपल्या राजकीय अनुभवाने समाजाला मार्गदर्शन करून प्रतिनिधित्व मिळवून देण्याचा प्रयत्न करणार असल्याचे मनोगत व्यक्त केले केले. रवी कांबळे जिल्हाध्यक्ष लहुजी शक्ती संग्राम परिषद, यांनी समाजाला राजकीय सक्षम बनवण्याकरिता अनेक उपाय योजना बद्दल सविस्तर मनोगत व्यक्त केले.भाई जगदीश इंगळे बिगर सातबारा शेतकरी संघटना संस्थापक अध्यक्ष यांनी गर्भित इशारा दिला की मातंग समाजाला सन्मानाने सत्तेत सहभागी करून न घेतल्यास कोणत्याही राजकीय पक्षाने मातंग समाजाला गृहीत धरू नये. संजय वैरागड राज्य कार्याध्यक्ष अखिल भारतीय मातंग संघ यांनी आपले मनोगत व्यक्त करताना वाशिम जिल्ह्यातील मातंग समाजाला लोकसंख्येच्या प्रमाणात राजकीय प्रतिनिधित्व न मिळाल्यास मातंग समाज राजकीय अस्मिता समितीच्या माध्यमातून बंडाचा झेंडा हाती घेऊन समाजाला न्याय मिळवून देण्याचा संकल्प करणार असल्याचे मनोगत व्यक्त केले.

## सकल मराठा समाजाच्या एकत्रिकरणासाठी पाटील समाजाचा पुढाकार

**अकोला : सकल मराठा समाजाच्या एकत्रिकरणासाठी पाटील समाजाने पुढाकार घेतला असून, त्याकरिता सभा व बैठकींचे आयोजन सुरू करण्यात आले आहे. महाराष्ट्रात लोकप्रिय झालेल्या 'एक मराठा, लाख मराठा' या घोषवाक्याला वास्तवात उतरविण्याच्या उद्देशाने ही मोहीम राबविण्यात येत आहे.**

मराठा समाजात विविध आडनावे, गट-तट निर्माण झाल्यामुळे एकजुटीचा अभाव जाणवत आहे. पाटील, देशमुख या पदव्या असून जाती नव्हेत, तर त्या पूर्वजांना मिळालेल्या सन्मानचिन्हे आहेत. या पदव्या पुढे आडनावे म्हणून प्रचलित झाल्या. पूर्वजांचा मूलभूत व्यवसाय शेतीचाच होता. मातीचा 'कण' आणि त्यात पेरले जाणारे 'बी' या दोघांच्या एकीने 'कणबी' तयार झाले आणि त्यातून 'कुणबी' उदयास आले. पुढे दख्खन प्रदेशातील 'दख्खनी', घाटावरच्या भागातील 'घाटोळे' असे विभाग झाले. तरीसुद्धा या सर्वांचा उगम एकच — मराठा समाज.

मात्र, या एकात्मतेचा विसर पडल्याने समाजात विभाग निर्माण झाले आहेत. परिणामी राजकीय आणि सामाजिक शक्ती कमजोर होण्याचा धोका निर्माण झाला आहे. हीच बाब लक्षात घेऊन अकोला जिल्हा पाटील समाजाचे अध्यक्ष अशोकराव अमानकर यांच्या नेतृत्वाखाली समाज एकत्र आणण्याची मोहीम सुरू




करण्यात आली आहे.

या अनुषंगाने हॉटेल हर्षवर्धन येथे अलीकडेच एक महत्त्वपूर्ण सभा संपन्न झाली. सभेच्या प्रारंभी पाटील समाजाचे सचिव प्रदीप खाडे यांनी मोहिमेचा आराखडा सविस्तर मांडला. दरवर्षी होणाऱ्या वधू-वर परिचय मेळाव्यांच्या निमित्ताने प्रकाशित होणाऱ्या विविध परिचय पुस्तिकांचे एकत्रीकरण करून एकच सर्वसमावेशक पुस्तक प्रकाशित करण्याचाही प्रस्ताव सभेत मांडण्यात आला.

या सभेला पाटील समाजाचे अध्यक्ष अशोकराव अमानकर, सचिव प्रदीप खाडे, कार्याध्यक्ष सुनील जानोरकर, कोषाध्यक्ष राजेंद्र मोहोकार यांच्यासह विजय मालोकार, सुभाषराव म्हैसणे, नारायणराव बारड, सहदेव शिंदे, सौ. वैशाली बाहाकर, विनायकराव शेळके, रवी पाटील अरबट, अविनाश पाटील, विजय बोरकर, दिनकरराव सरप, संदीप महल्ले पाटील, गजाननराव इंगळे, सुरेश महल्ले, योगेश थोरात, डॉ. दयानंद पावशे, अ‍ॅड. डॉ. बबन कदम, प्रा. गणपत सुरळकर आदींसह मोठ्या संख्येने समाजबांधव उपस्थित होते.

सभेत उपस्थित अनेक मान्यवरांनी आपल्या मनोगतातून समाज एकजुटीसाठी या मोहिमेला समर्थन दर्शविले. सभेचे संचालन प्रदीप खाडे यांनी केले तर आभार प्रदर्शन विजय बोरकर यांनी केले.

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १३ ■ अंक ३३६ ■ बुधवार, ५ नोव्हेंबर २०२५ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


# अखेर...रामनगरची लीज फ्री होल्डः पालकमंत्री भोयर यांच्या दशकभराच्या पाठपुराव्याला यश

## -राज्य मंत्रिमंडळाचा ऐतिहासिक निर्णय; शेकडो भूखंडधारकांना दिलासा

**वर्धा जनमाध्यम :** रामनगरवासियांचा गेल्या अनेक दशकांपासून प्रलंबित असलेला लीज प्रश्न अखेर सुटला आहे. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंगळवारी रामनगर येथील लीज जमीन फ्री होल्ड करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला. पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे हा प्रश्न निकाली निघाला असून परिसरातील १४२० भूखंडधारकांना मोठा दिलासा मिळाला आहे.१९३१ पासून रामनगर परिसरातील जमिनी भाडेपट्ट्याने देण्यात आल्या होत्या. १९६१ आणि १९९१ या दोन टप्प्यांत लीज नूतनीकरण झाले, मात्र त्यानंतर पुन्हा नूतनीकरण झाले नाही. त्यामुळे नागरिकांना मालकीहक्क मिळविण्यासाठी अडचणी उभ्या राहिल्या. हा ज्वलंत विषय लक्षात घेऊन २०१४ मध्ये आमदार झाल्यानंतर डॉ. भोयर यांनी शासन दरबारी सातत्याने पाठपुरावा सुरू केला. त्यांच्या प्रयत्नांमुळे राज्य सरकारने १९९१ पासून प्रलंबित असलेल्या लीजला २०२१ पर्यंत मुदतवाढ दिली.यानंतर शासनातील बदलांमुळे फ्री होल्ड प्रक्रियेला विलंब झाला. मात्र भाजप युतीचे सरकार सत्तेवर आल्यानंतर डॉ. भोयर यांनी विषय पुन्हा गतीमान केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे त्यांनी निवेदन देऊन प्रश्न सोडविण्याची मागणी केली. महसूल मंत्री बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली ११ जून २०२५ रोजी मंत्रालयात झालेल्या बैठकीत लीज जमीन फ्री होल्ड करण्यावर तत्त्वतः सहमती दर्शविण्यात आली. त्यानंतर १८ जूनला मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत निर्णयाचा मार्ग मोकळा झाला.



अखेर मंगळवारी राज्य मंत्रिमंडळाने या निर्णयाला अधिकृत मंजुरी दिली आहे.फ्री होल्डच्या निर्णयामुळे शेकडो भूखंडधारकांना त्यांच्या मालकीचा हक्क मिळणार आहे. यामुळे दीर्घकाळापासून अनिश्चिततेत असलेल्या नागरिकांनी सुटकेचा निश्वास टाकला आहे.

रामनगर परिसरातील विकासकामांना देखील आता गती मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.या निर्णयाबद्दल पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी मुख्यमंत्री फडणवीस, उपमुख्यमंत्री शिंदे, महसूल मंत्री बावनकुळे आणि मंत्रालयातील अधिकाऱ्यांचे आभार व्यक्त केले. रामनगर वासीयांना त्यांचा हक्क मिळवून देणे हे माझ्या दशकभराच्या लढ्याचे फळ आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले.

# सोयाबीन काढणीला पाच हजार खर्च; बाजारात भाव साडेतीन हजार

## -हमीभावापेक्षा कमी दर; शेतकऱ्यांची आर्थिक कोंडी

**सेलू जनमाध्यम :** यावर्षी सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांवर दुहेरी आघात झाला आहे. एकीकडे रोगराई, अतिवृष्टी आणि नैसर्गिक आपत्तीने पिकांचे नुकसान केले, तर दुसरीकडे बाजारात हमीभावापेक्षा अनेक पटींनी कमी दर मिळत असल्याने शेतकऱ्यांची आर्थिक कोंडी झाली आहे.कापणी आणि संवगणीचा एकराला पाच हजारांचा खर्च येत आहे. शेतमजुरांना साडेतीन हजार तर यंत्राद्वारे काढणीसाठी दोन हजार रुपये खर्च होत आहेत. अशा परिस्थितीत हार्वेस्टरचा वापर करून शेतकऱ्यांनी काढणी पूर्ण केली, पण व्यापाऱ्यांनी ओलसरपणा व कचरा असल्याचे कारण देत दर पाडले आहेत. सध्या बाजार समित्यांमध्ये व्यापारी केवळ अडीच ते साडेतीन हजार रुपये प्रतिक्विंटल दराने सोयाबीनची खरेदी करत आहेत.सरकारने जाहीर केलेला पाच हजार रुपयांचा हमीभाव केवळ कागदावरच राहिला आहे. बाजार समितीच्या माध्यमातून होणाऱ्या खरेदीवर नियंत्रण नसल्याने व्यापारी मनमानी करत आहेत. या दरकपातीमुळे उत्पादन खर्चही वसूल न होताच शेतकऱ्यांना तोटा सहन करावा लागत आहे.काही वर्षांपूर्वी सात हजार रुपयांच्या घरात असलेला सोयाबीन दर आता अर्ध्यावर आला आहे. कापसाच्याही दरात मोठी घसरण झाली असून शेतीतून मिळकत कमी होत चालली आहे. मजुरी आणि उत्पादन खर्च वाढल्याने शेतीतून मिळणारा नफा शून्याच्या घरात गेला आहे.राज्य शासनाने जाहीर केलेली मदत शेतकऱ्यांच्या अपेक्षेच्या तुलनेत अपुरी असल्याची नाराजी व्यक्त होत आहे. हमीभावावर किमान खरेदी सुरू करा आणि शेतकऱ्यांना दिलासा द्या, अशी मागणी गावोगावच्या शेतकरी संघटनांनी केली आहे. परिस्थिती हाताबाहेर जाण्यापूर्वी शासनाने ठोस निर्णय घ्यावा, असा सूर शेतकऱ्यांत उमटत आहे.



# उद्या हिंदी विश्वविद्यालयात राष्ट्रीय एकतेची वर्तमान आव्हाने या विषयावर विशेष व्याख्यान

**वर्धा जनमाध्यम :** महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालयात लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५०व्या जयंती वर्षानिमित्त राष्ट्रीय एकतेची वर्तमान आव्हाने या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन उद्या गुरुवार, ६ नोव्हेंबर रोजी दुपारी ३ वाजता गालिब सभागृहात करण्यात आले आहे. व्याख्यान कार्यक्रमात भारतीय पोलिस सेवेतील नागपूर परिक्षेत्राचे विशेष पोलिस महानिरीक्षक संदीप पाटील प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन करतील. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रो. कुमुद शर्मा असतील. कार्यक्रमाचे संचालन दर्शन व संस्कृती विभागाचे असोशिएट प्रोफेसर डॉ. जयंत उपाध्याय करतील तर गांधी व शांती अध्ययन विभागाचे अध्यक्ष डॉ. राकेश मिश्र आभार मानतील. प्रदर्शनकारी कला विभागाचे अध्यक्ष डॉ. ओमप्रकाश भारती स्वागत भाषण देतील.



कार्यक्रमात उपस्थित राहण्याचे आवाहन सांस्कृतिक कार्यक्रम आणि समन्वयन समितीचे अध्यक्ष प्रो. अवधेश कुमार यांनी केले आहे.

# जिल्ह्यातील नगर परिषदा निवडणुकीचा बिगुल वाजला

## -आज पासून आचारसंहिता लागू : २ डिसेंबरला मतदान तर ३ डिसेंबरला मतमोजणी

**वर्धा जनमाध्यम :** नगर परिषद निवडणुकीचे बिगुल वाजल्यामुळे गत काही वर्षापासून नगर परिषद अध्यक्षपदासाठी इच्छुक असलेल्या उमेदवारामध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे. वर्धा नगर परिषदमध्ये गेल्या चार वर्षापासून प्रशासक राज होता. आता तो संपून लोकनियुक्त अध्यक्षाच्या हाती सत्ता जाईल. वर्धा जिल्ह्यातील सहा नगर परिषदासाठी निवडणूक होणार असल्यामुळे इच्छुकामध्ये उत्साह दिसून आला. तसेच राजकीय पक्षाकडूनही हालचाली वाढल्या आहेत.



गत काही वर्षापासून प्रलंबित असणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीची घोषणा निवडणुक आयोगाने केली आहे. वर्धा जिल्ह्यातील वर्धा, सिंदी (रेल्वे), देवळी, हिंगणघाट,आर्वी, पुलगाव,नगर पालिकेमध्ये निवडणूक होणार आहे. यासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया १० नोव्हेंबर पासून सुरु होणार आहे. १७ नोव्हेंबर पर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करता येणार आहेत. १७ नोव्हेंबर रोजी उमेदवारी अर्जाची पडतमाळणी होणार आहे. अपील नसलेल्या ठिकाणी अर्ज मागे घेण्याची मुदत २१ नोव्हेंबर असेल तर अपील असलेल्या ठिकाणी अर्ज मागे घेण्याची शेवटची तारीख ही २५ नोव्हेंबर आहे. २६ नोव्हेंबर रोजी उमेदवारांची अंतीम यादी जाहीर होणार असून, त्याच दिवशी निवडणूक चिन्हाचे वाटप होणार आहे. २ डिसेंबर रोजी मतदान तर ३ डिसेंबर रोजी मतमोजणी होईल, भाजपा पक्षाकडून सर्वाधिक इच्छुक उमेदवार असले तरी पक्षश्रेष्ठी कोणावर विश्वास दाखविते हे लवकरच कळणार आहे.वर्धा नगर परिषदेचे अध्यक्षपद हे ओबीसी सर्वसाधारण गटासाठी राखीव असून, त्यासाठी डझनभर इच्छुक कामाला लागले आहेत. त्यात भाजपा पक्षाचे सर्वाधिक अध्यक्षपदासाठी इच्छुक उमेदवार आहेत. याशिवाय उबाठा शिवसेना गट, कॉंग्रेस व राष्ट्रवादी पक्षाचे दोन्ही गट, शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार देखील रिंगणात उतरणार असल्याचे चित्र आहे. पण, युती, महाविकास आघाडी कायम राहील्यास या दोन्ही गटा शिवाय अपक्षांचा देखील भरणा या निवडणुकीत दिसून येईल, हे आजतरी चित्र आहे. शेवटी पक्षश्रेष्ठी काय निर्णय घेतील आणि कोणाला अध्यक्षपदाची उमेदवारी देतील याकडे सर्व इच्छुकांचे लक्ष लागले आहे.

## वर्ध्यात PSI विशाल सवाई यांची कारवाई

# अवैध दारू वाहतुकीवर छापा; तब्बल १६ लाखांचा मुद्देमाल जप्त

**वर्धा जनमाध्यम :** शहरातील अवैध दारू पुरवठ्यावर नियंत्रण आणण्यासाठी पोलिसांनी मोहीम सुरू केली असून सोमवारी रात्री झएघ विशाल सवाई यांच्या पथकाने धडक कारवाई केली. या कारवाईत तब्बल १६ लाख ६० हजार रुपयांचा अवैध दारू व वाहनाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपी मात्र फरार असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत.गुप्त माहितीच्या आधारे शप ३६ ँ ५९९९ क्रमांकाच्या पांढऱ्या रंगाच्या महिंद्रा एक्सयूव्ही ५०० कारवर समता नगर परिसरात नाकेबंदी करण्यात आली. पोलिसांना पाहताच चालकाने कार वेगाने पळवली, मात्र पोलिसांनी पाठलाग करून ती ताब्यात घेतली. कारची पंचा समक्ष पाहणी केली असता, टँगो पंच ब्रँडच्या ९० एमएलच्या ५१ पेट्या (किंमत ५ लाख १० हजार रुपये) आणि कार (किंमत ११ लाख ५० हजार रुपये) असा एकूण १६ लाख ६० हजार रुपयांचा मुद्देमाल मिळून आला.या प्रकरणी मोनू विश्वकर्मा आणि सौरभ भगत या आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आला असून दोघेही अवैध दारू वाहतुकीत सक्रीय असल्याचे पोलिस तपासातून समोर आले आहे. ही कारवाई पोलिसांनी केली आहे,



# अट्टल घरफोडी करणाऱ्या टोळीला वर्धा गुन्हे शाखेची गाठ

## -तीन घरफोड्या, एक चोरी उघड:१.५३ लाखांचा मुद्देमाल जप्त

**वर्धा जनमाध्यम :** दिवाळीच्या सुट्टीनिमित्त घरफोडीत गेलेले सोन्या-चांदीचे दागिने अखेर वर्धा पोलिसांनी परत मिळवले आहेत. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अट्टल घरफोडी करणाऱ्या आरोपी टोळीचा पर्दाफाश करून तीन घरफोड्या व एक चोरीचा गुन्हा उघड केला असून, एकूण १ लाख ५३ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.पोलीस स्टेशन सावंगी मेघे हद्दीतील गजानन नगरीत २५ ऑक्टोबर रोजी घरफोडी झाल्यानंतर पोलिसांनी समांतर तपास सुरू केला होता. गुन्हे शाखेच्या पथकाने परिसरातील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे संशयितांचा माग घेतला असता,



पूर्वी सेवाग्राम आणि रामनगर क्षेत्रात घरफोड्या करणारे आरोपीच या गुन्ह्यांत सामील असल्याचे निष्पन्न झाले.या माहितीवरून ४ नोव्हेंबर रोजी विक्रमशिला नगर परिसरात छापा टाकून तीन संशयितांना ताब्यात घेण्यात आले. अटक आरोपींपैकी सुदर्शन गंगाधर वाडेकर (वय २३, रा. सर्कस ग्राउंड, रामनगर), ओम संजय नवले (वय १९, रा. विक्रमशिला नगर, वर्धा) आणि एका विधी संघर्ष बालकाने सावंगी, रामनगर आणि देवळी भागातील घरफोड्यांची कबुली दिली. त्यांच्याकडून सोने-चांदीचे दागिने, मौल्यवान वस्तू असा एकूण १.५३ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या कारवाईत स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विनोद चौधरी आणि त्यांचे सहकारी पोलीस अंमलदारांचे पथक सहभागी होते. गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस स्टेशन सावंगी मेघे करत आहे.

## संत साबाजी महाराज पुण्यतिथी सोहळा उत्साहात संपन्न

# जीवन सुलभ, सोपे व आनंदी बनवण्यासाठी योग्य मार्ग आवश्यक : मोहन अग्रवाल

**देवळी जनमाध्यम :** संतांच्या विचारांनी समाजात एकता, नैतिकता आणि संस्कृतीची जपणूक होते. या मूल्यांवर आधारित जीवन जगल्यासच जीवन प्रवास सुलभ, सोपा व आनंदी होतो, असे प्रतिपादन ज्येष्ठ समाजसेवक मोहन अग्रवाल यांनी केले. ते देवळी येथे आयोजित श्री संत साबाजी महाराज पुण्यतिथी सोहळ्याच्या समारोपीय कार्यक्रमात अध्यक्ष म्हणून बोलत होते.ते म्हणाले की, खोटेपणा आणि स्वार्थाचा मार्ग तात्पुरता सुख देतो; पण त्याचे परिणाम पुढे दुःखातच होतात. त्यामुळे प्रत्येकाने कर्तव्य, प्रामाणिकपणा व माणुसकीचा धर्म स्वीकारावा.या कार्यक्रमास आल इंडिया शास्त्री सोशल फोरमचे राष्ट्रीय उपाध्यक्ष इम्रान राही, गोदावरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मोहन मोहिते, डॉ. गणेश मालधुरे, ह.भ.प. प्रशांत महाराज मानमोडे, साहित्यकार संजय इंगळे तिगांवकर, संगीता इंगळे आणि रेखा अग्रवाल उपस्थित होते. या प्रसंगी संजय इंगळे तिगांवकर यांना सामाजिक व साहित्यिक कार्यासाठी सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन दीपक अग्रवाल यांनी केले तर आभार प्रदर्शन महेश अग्रवाल यांनी केले.



कार्यक्रमाला नाथमल अग्रवाल, गिधर अग्रवाल, आशिष अग्रवाल, मधुसूदन अग्रवाल, कोषी उल्हास वाघ, अमोल मानकर, प्रा केशव कुंवारे, शरद नाईक महाराज, अंकुश गिरडे, दिनेश अग्रवाल, नरेश अग्रवाल, बाळकृष्ण हांडे आदी उपस्तिथ होते.

# दारूच्या नशेत ऑटो चालविणाऱ्यावर गुन्हा; चार बुलेट चालकांवरही कारवाई

## -वाहतूक शाखेची आर्वी नाका परिसरात कारवाई

**वर्धा जनमाध्यम :** आर्वी नाका चौकात वाहतूक नियंत्रण शाखेकडून करण्यात आलेल्या नाकाबंदी दरम्यान दारूच्या नशेत ऑटो चालविणाऱ्या चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला असून, चार बुलेटवरील मोठ्या आवाजाचे सायलेंसर जप्त करून दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.ही कारवाई पोलिस अधीक्षक अनुराग जैन यांच्या आदेशानुसार सोमवार, दि. ३ नोव्हेंबर रोजी करण्यात आली. रात्री आठच्या सुमारास एक ऑटो रिक्षा अतिवेगाने व नष्काळजीपणे चालविताना पोलिसांच्या नजरेस पडली. पोलिसांनी ती थांबवून तपासणी केली असता, चालक दारूच्या प्रभावाखाली असल्याचे निदर्शनास आले. वैद्यकीय तपासणीत त्याच्या रक्तात दारूचे प्रमाण सिद्ध झाल्याने चालक कैलास भास्करराव आडे (वय २५, रा. सिंधी मेघे) याच्याविरुद्ध मोटार वाहन कायदा कलम १८५ अंतर्गत वर्धा शहर पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला असून संबंधित ऑटो जप्त करण्यात आला आहे.तसेच मोठ्या आवाजाचे, बिनापरवानगी सायलेंसर लावून बुलेट चालविणाऱ्या चालकांवर कलम १९४ अंतर्गत कारवाई करण्यात आली. चार सायलेंसर जप्त करून एकूण १० हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.ही कारवाई सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक संजय भांडेकर, पोलीस हवालदार दिलीप कामडी आणि आशिष देशमुख यांनी केली. वाहतूक शाखेचे निरीक्षक विलास पाटील यांनी वाहनधारकांना इशारा दिला आहे की दारूच्या नशेत वाहन चालविणे तसेच बिनापरवानगी बदल केलेले सायलेंसर वापरणे हा कायद्याने गुन्हा असून अशा कृत्यांवर कठोर कारवाई सुरुच राहील.



# दिव्यांगांची प्रमाणपत्राकरीता आता दोन दिवस मंगळवार व शुक्रवार होणार तपासणी

## -अपंग जनता दल सामाजिक संघटनेची वर्धा जिल्हा अध्यक्ष सरोज पुनसे यांची माहिती

**वर्धा जनमाध्यम :** सामान्य रुग्णालयात प्रत्येक महिन्याच्या मंगळवारला दिव्यांग व्यक्तींची तपासणी व वैश्विक कार्ड वाटपासाठी कार्यवाही करण्यात येत होती. परंतू आता दिव्यांग व्यक्तींच्या सुलभतेसाठी प्रत्येक आठवड्याच्या मंगळवार व शुक्रवार असे दोन दिवस निश्चित करण्यात आले आहे. याचा लाभ दिव्यांगांनी घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. ४० टक्के किंवा त्यापेक्षा अधिक मानक असलेल्या दिव्यांग व्यक्तींना विविध सरकारी योजनांचा लाभ, सवलत व मदत देण्यासाठी २१ प्रकारच्या आजारांना प्रमाणपत्र देण्यात येते. यामध्ये लोकोमोटर विकलांगता, बौनापण, मांसपेशीय विकृती, कोढ दुरुस्त झालेला व्यक्ती, ?सिड अटॅक पिडीत, सेरेब्रल पाल्सी, न्युरोलॉजिकल डिसऑर्डर, पार्किसंस रोग, मल्टीपल स्क्लेरोसिस, थैलेसिमिया, हिमोफिलीया, सिकलसेल रोग, बहीरेपणा, वाणी विकलांग, कमी दृष्टी, अंधत्व, मानसिक आजार, बौध्दिक विकलांग, विशिष्ट शिकण्याचे विकलांग, ऑटिज्म, बहुविकलांग या आजाराचा समावेश आहे. दिव्यांगानी दिव्यांग प्रमाणपत्र (वैश्विक कार्ड) मिळविण्यासाठी swavlambancard.gov.in या संकेतस्थळावर जाऊन ऑनलाईन पध्दतीने स्वत: अर्ज करावा किंवा आपले सेवा केंद्राच्या मदतीने अर्ज सादर करावा. तपासणीकरीता रुग्णालयात जाऊन ओळखीचा पुरावा म्हणून आधारकार्ड, रहिवासी पुरावा म्हणून राशन कार्ड, ईलेक्ट्रिक बिल, रहिवासी प्रमाणपत्र आजारासंबंधित दवाखान्याचे कागदपत्रे, क्ष किरण इत्यादी सादर करावे. तपासणी झाल्यावर वैश्विक कार्ड पोष्टाने घराच्या पत्त्यावर पाठविण्यात येते, असे सामान्य रुग्णालयाच्यावतीने कळविण्यात आले आहे अशी माहिती अपंग जनता दल सामाजिक संघटना वर्धा जिल्हा अध्यक्ष सरोज पुनसे यांनी माहिती दिली



# एकजुटीने निवडणुका लढल्यास यश निश्चित:अतुल कोटेचा

**सेलू जनमाध्यम :** सेलू तालुक्यातील कॉंग्रेस कार्यकर्त्यांची आढावा सभा मंगळवारी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभागृहात पार पडली. या वेळी पक्षाचे निरीक्षक अतुल कोटेचा यांनी कार्यकर्त्यांना आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांना एकजुटीने सामोरे जाण्याचे आवाहन केले.कोटेचा म्हणाले, जर गटबाजी मागे ठेवून सर्व कार्यकर्ते एकदिलाने निवडणुका लढले, तर कॉंग्रेसचे यश निश्चित आहे. त्यांनी तालुका पातळीवर समन्वय वाढवण्याचे आणि मतदारांमध्ये कॉंग्रेसची ओळख बळकट करण्याचे आवाहन केले.या सभेला जिल्हा कॉंग्रेस अध्यक्ष मनोज चांदूरकर, शेखर शेंडे, राजेंद्र मिश्रा, विजय जयस्वाल, काशिनाथ लोणकर आदी नेते उपस्थित होते. कार्यकर्त्यांनी निवडणुकीतील अडचणी, स्थानिक पातळीवरील मतभेद आणि गटबाजीची कारणे सभेत खुलेपणाने मांडली. अनेकांनी कॉंग्रेसने कॉंग्रेसलाच कमजोर केले. असे मत व्यक्त करून संघटन बळकट करण्याची गरज अधोरेखित केली. सेलू तालुक्यातील सहा जिल्हा परिषद आणि बारा पंचायत समिती गणांमध्ये सर्व ठिकाणी कॉंग्रेसचे उमेदवार उभे करावेत, असा एकमुखी सूर उमटला. एकजुटीचा निर्णय घेतल्यानंतर सभेचे वातावरण उत्साहपूर्ण झाले.



या वेळी काशिनाथ लोणकर, सौरभ शेळके, फारुख शेख, अतुल पन्नासे, रुपेश ठाकरे, संदीप वाणी, प्रमोद ढुंमने, सुदाम पवार, राजू झाडे, गणेश खोपडे तसेच तालुक्यातील मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.


**Change in Name**

My name in my passport number U3328017 is written as 'Snehal Raju Petkar.' But on my Aadhar card, PAN card and in all my school records my name is written as 'Snehal Petkar.'

Hence, my correct and known name is Snehal Petkar.

Declared by-
Snehal Petkar, R/o Grampanchayt Deoli Rd, Ward No.1,Sawangi Meghe, Wardha Maharashtra - 442001

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## मंत्रिमंडळ निर्णय

### वाशिममधील वाईगौळ ग्रामपंचायतीला भक्त निवासासाठी विनामूल्य जमीन

वाशिम जिल्ह्यातील वाईगौळ (ता. मानोरा) ग्रामपंचायतीस भक्त निवास आणि यात्रेकरुंसाठी सोयी सुविधा उभारण्यासाठी १.५२ हे. आर जमीन ग्रामविकास विभागामार्फत विनामूल्य उपलब्ध करून देण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. वाईगौळ ग्रामपंचायतीला भक्त निवास व यात्रेकरूंसाठी सोयी सुविधा उभारण्यासाठी यापूर्वी जमिनीच्या प्रचलित दरानुसार असलेले बाजारमूल्य वसूल करुन भोगवटादार वर्ग-२ या धारणाधिकाराने जमीन देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. हा निर्णय रद्द करून ही जमीन ग्रामपंचायतीला विनामूल्य उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

### शिरूर येथे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय आणि दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर न्यायालय

पुणे जिल्ह्यातील घोडनदी (शिरुर) येथे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय तसेच दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर तसेच शासकीय अभियोक्ता कार्यालय स्थापना करण्यास व त्या अनुषंगाने पदे मंजूर करण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. घोडनदी (शिरुर) येथे मंजूर करण्यात आलेल्या जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय तसेच दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर या दोन न्यायालयांसाठी न्यायिक अधिका-यांची तसेच सहाय्यभूत कर्मचा-यांची नियमित पदे मंजूर करण्यात आली आहे. पुणे मुख्यालय ते घोडनदी-शिरूरमधील अंतर ८५ किमी असून येथील नागरिकांना न्यायासाठी पुणे मुख्यालयात येण्याची गरज भासू नये यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयासाठी नियमित २० तर बाह्य यंत्रणेद्वारे ६ पदे मंजूर करण्यात आली. शासकीय अभियोक्त कार्यालयासाठी नियमित ३ तर बाह्ययंत्रणेद्वारे १, दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तरसाठी नियमित २० तर बाह्ययंत्रणेद्वारे ४ पदे मंजूर करण्यात आली आहेत.

### पैठण येथे दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर न्यायालय

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पैठण येथे दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालय स्थापन करण्यास आणि त्यानुषंगाने न्यायिक अधिकारी व कर्मचा-यांचे पदे मंजूर करण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. पैठण तालुक्यातील न्यायालयीन प्रकरणे सध्या छत्रपती संभाजीनगर येथील दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर या न्यायालयात चालवली जातात. या न्यायालयात पैठण तालुक्यातील ७९९ इतकी दिवाणी प्रकरणे प्रलंबित असून त्यासाठी नागरिकांना ५३ कि.मी. इतका प्रवास करावा लागतो. नागरिकांच्या सोयीसाठी पैठण येथे दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर न्यायालय सुरू स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. या न्यायालयासाठी १६ नियमित व ४ बाह्ययंत्रणेद्वारे अशी एकूण २० पदे मंजूर करण्यात आली आहेत.

### राज्य मालमत्ता पुनर्रचना कंपनी बंद करण्याचा निर्णय

केंद्र शासनाच्या नॅशनल ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनीच्या धर्तीवर महाराष्ट्रात स्थापन करण्यात आलेली राज्य मालमत्ता पुनर्रचना कंपनी महा आर्क लिमिटेट बंद करण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. रिझर्व्ह बँकेने राज्य मालमत्ता पुनर्रचना कंपनीस परवाना नाकारला आहे. त्यामुळे कायदेशीरदृष्ट्या कंपनीचे कामकाज करणे अशक्य होणार आहे. या कंपनीवरील खर्च सुरू राहू नये यासाठी कंपनी बंद करण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. केंद्राच्या नॅशनल सेट रिकन्स्ट्रक्शन कंपनीची स्थापन केली होती, त्याच धर्तीवर राज्य कंपनीची स्थापना सप्टेंबर २०२२ मध्ये स्थापन करण्यात आली होती.

### ग्रामपंचायत कर्मचा-यांच्या वेतनासाठी करवसुलीची अट शिथिल

राज्यातील ग्रामपंचायत कर्मचा-यांना कर वसुलीच्या प्रमाणात वेतन अदा करण्यासंदर्भात कर वसुलीची अट शिथिल करण्यात आली आहे. आता ६० टक्क्यांपेक्षा जास्त कर वसुली असलेल्या ग्रामपंचायतीना शंभर टक्के वेतन हिस्सा मिळणार आहे. या करवसुलीची अट शिथिल करण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बैठकीच्या अध्यक्षस्थानी होते. ग्रामपंचायत कर्मचा-यांच्या किमान वेतनासाठी ग्रामपंचायत करवसुलीची अट १७ सप्टेंबर २०१८ च्या निर्णयानुसार घेतली होती. मात्र या निर्णयानुसार शासनाच्या १०० टक्के वेतन हिश्श्यासाठी किमान ९० टक्के कर वसुलीची अट घालण्यात आली होती. ही अट शिथिल करण्यात आली असून ६० टक्क्यांवर करवसुलीसाठी १०० टक्के वेतन देण्यात येणार आहे. तर ५० ते ६० टक्क्यांपर्यंत वसुलीसाठी ९० टक्के आणि ५० पेक्षा कमी कर वसुली असेल तेथील ग्रामपंचायतीच्या कर्मचा-यांना वेतनाचा ८० टक्के हिस्सा शासन देणार आहे. करवसुलीची जबाबदारी ग्रामसेवक, सरपंच, पदाधिकारी तसेच ग्रामपंचायत कर्मचा-यांची असणार आहे.

### तिरूपती देवस्थानास वांद्रे येथे जमीन

मुंबई उपनगरातील वांद्रे येथील ३९५ चौ.मी. शासकीय जमीन तिरुमला तिरुपती देवस्थानास वाहनतळ, माहिती केंद्र, कार्यालय व इतर सोयी-सुविधांसाठी भाडेपट्ट्याने देण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. याबरोबरच देवस्थानाने बांधलेल्या इमारतीतील २ हजार चौरस फूट जागा फर्निचरसह जिल्हाधिका-यांना देण्याचाही निर्णय झाला. यावर महसूल विभागाची मालकी राहणार आहे. वांद्रे येथील ही जमीन तिरूमला देवस्थानास ३० वर्षांच्या कालावधीसाठी एक रूपये वार्षिक नाममात्र भाडे दराने देण्यात येणार आहे. ही जमीन देवस्थानास यापूर्वीच भाडेपट्ट्याने देण्यात आलेल्या ६४८ चौरस मीटर जमिनीच्या समोर आहे. या नव्या भूखंडावर देवस्थान वाहनतळ, माहिती केंद्र व कार्यालयासह इतर सोयी-सुविधा उभारणार आहे. ही जमीन महाराष्ट्र शासनाच्या मालकीचीच राहणार असून, देवस्थानाने ती फक्त मंजूर उद्देशासाठीच वापरायची आहे.

### शहरी आरोग्य आयुक्तालय स्थापन करणार

सार्वजनिक आरोग विभागांतर्गत शहरी आरोग्य आयुक्तालय स्थापन करण्यास मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होत. राज्यात नागरीकरणाचा वेग मोठा आहे. सुमारे ५० टक्के लोकसंख्या ही शहरात असून राज्यात २९ महानगरपालिका, २४७ नगरपरिषदा आणि १४७ नगरपंचायती आहेत. मात्र शहरातील आरोग्य यंत्रणा सार्वजनिक आरोग्य विभाग आणि नगर विकास विभागात विभागली असल्याने आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी योग्य समन्वय राहावा यासाठी हे शहरी आरोग्य आयुक्तालय स्थापन करण्यात येत आहे. यातून मोठ्या प्रमाणावर शहरी भागात राहणा-या लोकसंख्येला दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध करून देता येणार आहे. या निर्णयानुसार शहरी आरोग्य आयुक्तालयाच्या कामकाजाचे सनियंत्रण करण्यासाठी आयुक्त शहरी आरोग्य हे पद निर्माण करण्यात आले आहे. हे पद भारतीय प्रशासकीय सेवेतील असेल. महानगर पालिकांमधील वैद्यकीय अधिकारी ही पदे सर्वजनिक आरोग्य विभागामार्फत प्रतिनियुक्तीने भरण्यात येणार आहेत.

### चंद्रपूर जिल्ह्यातील मूल येथे नवीन शासकीय तंत्रनिकेतन

चंद्रपूर जिल्ह्यातील मूल येथे ३०० प्रवेश क्षमतेचे नवीन शासकीय तंत्रनिकेतन सुरू करण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. या संस्थेमुळे स्थानिक विद्यार्थ्यांना तांत्रिक शिक्षणाच्या नव्या संधी उपलब्ध होणार आहे. मूल येथे सुरजगड इस्पात प्रायव्हेट लिमिटेड ही कंपनी कारखाना उभारणार आहे, त्याबरोबरच या परिसरात एक औद्योगिक परिसंस्था यानिमित्ताने उभी राहणार आहे. या कंपन्यांसाठी कुशल मनुष्यबळाची आवश्यकता भासणार असून त्यादृष्टीने तंत्रनिकेतनची आवश्यकता होती. या तंत्रनिकेतनसाठी टप्प्याटप्प्याने ३९ शिक्षक आणि ४२ शिक्षकेत्तर पदे मंजूर करण्यात आली. राज्यातील औद्योगिक विकासाला गती देण्यासाठी आणि ग्रामीण भागात तांत्रिक शिक्षणाचा प्रसार करण्याच्या उद्देशाने शासनाने हा निर्णय घेतला आहे. मुल तालुक्यातील या शासकीय तंत्रनिकेतनाच्या स्थापनेमुळे चंद्रपूर जिल्ह्यातील युवकांना कौशल्याधारित शिक्षण व नोकरीच्या संधींचे नवे दालन खुले होणार आहे.

### नाशिक कुंभमेळ्याच्या कामांना गती द्या

नाशिक कुंभमेळ्याशी संबंधित विविध कामांचा सार्वजनिक बांधकाम मंत्री (सार्वजनिक उपक्रम वगळून) शिवेंद्रसिंह राजे भोसले यांनी आढावा घेतला. कुंभमेळ्याशी संबंधित कामांना गती देण्याचे निर्देश त्यांनी यावेळी दिले. नाशिक येथील कुंभमेळ्याच्या अनुषंगाने सार्वजनिक बांधकाम विभागाशी संबधित विविध कामांचा मंत्री भोसले यांनी आढावा घेतला. यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागाचे सचिव (रस्ते) संजय दशपुते, सचिव बांधकामे आबासाहेब नागरगोजे, नाशिकचे मुख्य अभियंता प्रशांत औटी यांच्यासह विविध अधिकारी उपस्थित होते.

## राज्य मंत्रिमंडळाचे २१ मोठे निर्णय

# राष्ट्रीय आरोग्य अभियानात 10 वर्ष पूर्ण झालेल्या कंत्राटी कर्मचा-यांचे नियमित पदावर होणार समायोजन

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्याच्या व्यवसाय सुलभीकरण-ईझ ऑफ डुईंग बिझनेसला प्रोत्साहन देण्यासाठी कृषित्तर वापराखालील जमिनींवर आकारण्यात येणारा अकृषिक कर आकारणीच्या तसेच जमिनीच्या अकृषिक वापराच्या परवानगी व सनदेबाबतच्या महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मध्ये सुधारणा करण्यास मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. राज्यातील कृषित्तर वापराखालील जमिनींवर आकारण्यात येणारा अकृषिक कर रद्द करण्याचा व सदर जमिनीवर अकृषिक कराऐवजी एक रकमी रुपांतरण कर आकारण्यास मंत्रिमंडळाने यापूर्वीच मान्यता दिली आहे. यासाठी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मध्ये सुधारणा करणे आवश्यक होते. त्यानुसार आता नियोजन प्राधिकरणाने विकास परवानगी, बांधकाम आराखडे मंजूर केल्यास अशांना आता जिल्हाधिकारी यांच्या स्वतंत्र परवानगीची गरज राहणार नाही. तसेच दरवर्षी आकारल्या जाणा-या अकृषिक कराऐवजी जमिनीच्या वापरातील बदलादाखल टप्पानिहाय शीघ्र सिद्ध गणकानुसार येणा-या मूल्यांकनानुसार एकरकमी अधिमूल्य देण्यासंबंधातील जमीनधारकांच्या दायित्वाबाबतच्या सुधारित तरतुदींच्या नव्याने समावेश करण्यास व या सुधारणेच्या दिनांकापर्यंत थकित अकृषिक कर वसूल करण्यापासून सवलत देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच ज्या मिळकती ३१ डिसेंबर २००१ रोजी किंवा त्यापूर्वी बिनशेती झाल्यास त्यावर आकारल्या जाणा-या अकृषिक कराऐवजी २००१ च्या शीघ्र सिद्ध गणककानुसार येणा-या मूल्यांकनाच्या टप्प्यानुसार अधिमूल्य आकारले जाणार आहे. तसेच १ जानेवारी २००२ रोजी किंवा त्यानंतर बिनशेती झालेल्या मिळकतींवर अकृषिक कराऐवजी बांधकाम परवानगीच्या दिनांकाचे शीघ्र सिद्ध गणकानुसार येणारे मूल्यांकनाच्या टप्प्यानुसार अधिमूल्याची आकारणी करण्यात येणार आहे. यात १ हजार चौरस मीटर ०.१० टक्के सवलत, १ एकर पेक्षा कमी क्षेत्रासाठी ०.२५ टक्के आणि १ एकरपेक्षा जास्त क्षेत्रासाठी ०.५० टक्के इतकी सवलत देण्यात येणार आहे.

● **महाराष्ट्र जनविश्वास (तरतुदींमध्ये सुधारणा) अध्यादेश, २०२५ ला मान्यता**- राज्य शासनाने जनसामान्यांचे जीवनमान अधिक सुकर करणे आणि राज्यातील व्यवसाय-सुलभतेला चालना देणे या उद्देशाने महत्त्वाचे पाउल उचलले आहे. त्यानुसार मंत्रिमंडळ बैठकीत महाराष्ट्र जनविश्वास (तरतुदींमध्ये सुधारणा) अध्यादेश, २०२५ ला मान्यता देण्यात आली. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

या अध्यादेशाद्वारे पाच प्रशासकीय विभागांच्या सात राज्य अधिनियमांमधील तरतुदींमध्ये सुधारणा करण्यात येणार आहेत. हे निर्णय केंद्र सरकारच्या जनविश्वास अधिनियम, २०२३च्या धर्तीवर राज्यातील विविध अधिनियमांतील किरकोळ अपराधांच्या शिक्षेच्या तरतुदी रद्द किंवा तर्कसंगत करण्यात येणार आहेत. सुधारणा प्रस्तावित असलेले विभाग व अधिनियमः- कामगार विभागः महाराष्ट्र औद्योगिक संबंध अधिनियम, १९४६. महाराष्ट्र कामगार संघांना मान्यता व अनुचित प्रथांना प्रतिबंध अधिनियम, १९७१. महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवायोजन शर्ती यांचे विनियमन) अधिनियम, २०१७. महसूल विभागः- महाराष्ट्र मुद्रांक शुल्क अधिनियम, १९५८. वैद्यकीय शिक्षण व औषधद्रव्ये विभागः- महाराष्ट्र वैद्यकीय परिषद अधिनियम, १९६५.वित्त विभागः- महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोक-या यावरील कर अधिनियम, १९७५. सार्वजनिक आरोग्य विभागः- महाराष्ट्र शुश्रुषा गृह नोंदणी अधिनियम,



१९४९ राज्य शासनाने मे. विधि सेंटर फार लीगल पालिसी' या विख्यात संस्थेशी करार केला असून, या संस्थेमार्फत राज्य अधिनियमांचा आढावा घेउन किरकोळ अपराधांच्या शिक्षेच्या तरतुदी रद्द अथवा तर्कसंगत करण्यायोग्य अपराध निश्चित करण्यात येत आहेत.

● **महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना क्षेत्रीय कर्मचा-यांच्या मानधनात वाढ**

महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेंतर्गत आयुष्यमान कार्ड निर्माण करणे- व वितरण करणा-या क्षेत्रीय स्तरावरील कर्मचा-यांच्या मानधनात वाढ करण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. या निर्णयानुसार केवायसी केलेल्या कार्डामागे २० रुपये आणि कार्ड वितरणासाठी १० रुपये मानधन देण्यात येणार आहे. यासाठी राज्याने २०४ कोटी ६ लाख रुपयांच्या तरतुदीस मान्यता दिली आहे. विस्तारित योजनेत राज्यातील १२ कोटी ७४ लाख लाभार्थ्यांपैकी ३ कोटी ४४ लाख लाभार्थ्यांची आयुष्यमान कार्ड तयार करण्यात आले असून उर्वरित ९ कोटी ३० लाख कार्ड तयार करण्यात येणार आहेत. हे उद्दिष्टये १०० टक्के साध्य करण्यासाठी राज्यातील आशा कर्मचारी, स्वस्त धान्य दुकानचालक व आपले सरकार सेवा केंद्रातील कर्मचारी या क्षेत्रीय कर्मचा-यांना दर कार्डामागे असे वाढीव मानधन देण्यात येणार.

● **विस्तारित महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य व आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेच्या उपचारांच्या संख्येत वाढ**- विस्तारित महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना व आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेअंतर्गत सध्या समाविष्ट असलेल्या उपचारांमध्ये वाढ करण्यास मंत्रिमंडळाने मंजुरी दिली. यानुसार ३४ विशेषज्ञ सेवांतर्गत १३५६ उपचारांऐवजी आता ३८ विशेषज्ञ सेवांतर्गत एकूण २३९९ आजारांवर उपचार होणार आहेत. यामुळे बहुतेक आजारांवर उपचार उपलब्ध होणार असल्याने, गरजूंना मोठा दिलासा मिळणार आहे. विस्तारित महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजने व आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेअंतर्गत पॅकेजचा तुलनात्मक अभ्यास करण्यासाठी गठित समितीने उपचारांमध्ये वाढ करण्यासह इतर शिफारसी केल्या होत्या. त्यानुसार या शिफारशींना नियामक परिषदेनेही मान्यता दिली होती. नियामक परिषदेने दिलेल्या मान्यतेनुसार विस्तारित महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना व आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेअंतर्गत २३९९ उपचारांपैकी २२३ उपचार शासकीय रुग्णालयांकरिता राखीव ठेवण्यास मान्यता देण्यात आली आहे. तसेच या योजनेअंतर्गत अंगीकृत रुग्णालयांच्या श्रेणीनुसार पॅकेज दर अदा करण्याची सध्याची पद्धत बंद करण्यात येत आहे. त्याऐवजी राष्ट्रीय आरोग्य प्राधिकरणाचे दर तसेच राज्याच्या उपचारांचे निश्चित केलेले दर बेस पॅकेज रेट म्हणून लागू करतील. त्यानुसार अंगीकृत रुग्णालयांना प्रोत्साहनपर रक्कम मिळणार आहे. तसेच या योजनेअंतर्गत उपचार व त्यांचे दर यासंदर्भात धोरणात्मक निर्णय घेण्याचे अधिकार नियामक परिषदेस देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. विस्तारित महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजने व आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेअंतर्गत समग्र यादीतील उपचारांची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर आवश्यकतेनुसार आढावा घेउन एकूण उपचारांची संख्या निश्चित करणे, उपचारांच्या संख्येत, वर्णनात व दरात बदल करणे, शासकीय राखीव उपचारामध्ये भर घालणे किंवा कमी करणे, अपवादात्मक परिस्थितीत विशिष्ट क्षेत्रासाठी राखीव उपचार खासगी रुग्णालयांना खुले करण्याचे अधिकार सार्वजनिक आरोग्य विभागाच्या सचिवांना देण्यास मंजुरी देण्यात आली.

● **राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या कंत्राटी कर्मचा-यांच्या सेवा समायोजनाच्या निर्णयात दुरुस्ती**

राष्ट्रीय आरोग्य अभियानाअंतर्गत राज्यात कार्यरत कंत्राटी कर्मचा-यांचे नियमित पदावर समायोजन करताना सेवा प्रवेश नियमात दुरुस्ती न करता एक वेळची विशेष बाब म्हणून करण्यास राज्य मंत्रिमंडळाने घेतला आहे.

राष्ट्रीय आरोग्य अभियानातील १४ मार्च २०२४ रोजी किंवा त्यापूर्वी १० वर्षे सेवा पूर्ण झालेल्या कंत्राटी कर्मचा-यांचे सेवांचे समायोजन करण्याबाबतचा निर्णय यापूर्वी मंत्रिमंडळाने घेतला होता. त्या निर्णयात दुरुस्ती करून या सेवांचे समावेशन सेवा प्रवेश नियमात दुरुस्ती न करता एक वेळची विशेष बाब म्हणून करण्यास मान्यता देण्यात आली. त्यानुसार १० वर्षे सेवा पूर्ण झालेल्या कंत्राटी कर्मचा-यांचे समकक्ष पदावर सेवा समायोजन सार्वनजिक आरोग्य विभागातील पदांबरोबर, ग्रामविकास विभागामार्फत भरण्यात येणारी आरोग्य सेवेतील रिक्तपदांवर करण्यात येणार आहे. यात सरळसेवेने भरावयाची सद्या रिक्त असलेली पदे व राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत १४ मार्च २०२४ पूर्वी १० वर्षे पूर्ण झालेल्या कार्यरत कंत्राटी कर्मचारी यांची संख्या यापैकी जी संख्या कमी असेल तेवढी पदे राखून ठेवण्यास मान्यता देण्यात आली.

● **राज्यातील तीन आर्थिक विकास महामंडळाच्या वैयक्तिक,गट कर्ज व्याज परतावा योजनेस मान्यता**

राज्यातील परशुराम आर्थिक विकास महामंडळ, वीर शिरोमणी महाराणा प्रताप आर्थिक विकास महामंडळ आणि श्री वासवी कन्यका आर्थिक विकास महामंडळांना वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना व गट कर्ज व्याज परतावा योजना राबविण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. राज्यातील ब्राह्मण, राजपूत, आर्य वैश्य समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील सुशिक्षित बेरोजगार तरुणांकरिता अर्थसहाय्य उपलब्ध करुन उद्योग, रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने या तीन महामंडळाच्या माध्यमातून व्याज परतावा योजना राबविण्यात येत आहे. यातील लाभार्थ्यांना राष्ट्रीयकृत, खाजगी, सहकारी बँक यांच्याकडून घेतलेल्या १५ लाखापर्यंतच्या कर्जाचे व व्याजाचे हप्ते वेळेवर भरल्यास लाभार्थ्यांने बँकेकडे भरलेल्या व्याजाची रक्कम महामंडळाकडून दरमहा लाभार्थ्यांच्या खात्यात जमा केली जाणार आहे. व्याज परताव्याची कमाल रक्कम साडे चार लाख रूपये राहील. यामुळे या समाजातील तरूण उद्योगाकडे वळतील आणि त्यातून रोजगार निर्मिती होणार आहे. हे कर्ज कृषि संलग्न पारंपरिक उपक्रम, लघु, मध्यम व गृह उद्योग उत्पादन, व्यापार व विक्री, सेवा क्षेत्र व पर्यटन या क्षेत्रातील व्यवसायासाठी घेतले असल्यास व्याज परतावा योजना लागू होणार आहे.

● **पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी सहयोगी प्राध्यापकाची ५ पदे मंजूर**

बारामती येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी सहयोगी प्राध्यापक गट-अ संवर्गाची पाच पदे निर्माण करण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाच्या निकषांप्रमाणे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी सहयोगी प्राध्यपकांची पाच पदे मंजूर करण्यात आली असून यासाठी येणा-या आवर्ती खर्चास मान्यता देण्यात आली आहे. यापूर्वी वर्ग एक ते वर्ग चार संवर्गातील पदे तसेच विद्यार्थी पदे अशा एकूण ५१० पदांच्या निर्मितीस मान्यता देण्यात आली आहे.

## नामांतरानंतर उरूण ईश्वरपूर शहरात जल्लोष

**सांगली /प्रतिनिधी :** इस्लामपूरचे नामकरण उरूण ई[illegible]रपूर करण्याबाबतची अधिसूचना मंगळवारी शासनाने प्रसिद्ध करताच शहरात जल्लोष करण्यात आला. ग्रामदैवत संभूआप्पाचा उरूस सुरू असताना शहराचे नामकरण करण्याचा प्रस्ताव शासनाने अधिसूचित केल्याने वेगळाच आनंद शहरवासीयांकडून व्यक्तहोत आहे. इस्लामपूर शहराचे नामांतर ईश्वरपूर करण्याची ब-याच वर्षांची मागणी होती.शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी शहरात झालेल्या जाहीर सभेत पहिल्यांदा ईश्वरपूर असा जाहीर उल्लेख केल्यानंतर या मागणीने जोर धरला होता. नगरपालिकेच्या सभागृहातही ईश्वरपूर नामांतर करावे, असा ठराव करण्यात आला होता. पावसाळी अधिवेशनात आमदार सदाभाउ खोत यांनी विधान परिषदेत या मागणीचा पाठपुरावा केल्यानंतर मंत्री चंद्रकांत पाटील यांनी विधान परिषदेत आणि छगन भुजबळ यांनी विधानसभेत इस्लामपूरचे नामांतर ईश्वरपूर करण्याची घोषणा केली होती.नामांतराचा प्रस्ताव राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठविला होता. हा प्रस्ताव केंद्र शासनाने मंजूर केल्यानंतर आज याबाबतची अधिसूचना राज्य शासनाने प्रसिद्ध केली. यानुसार इस्लामपूर शहराचे नाव ईश्वरपूर आणि नगरपालिकेचे नाव उरूण ईश्वरपूर असे करण्यात आले आहे. याबाबत महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज मुंबईत घोषणा केली. शहरात फटाक्यांची आतषबाजी करत जल्लोष करण्यात आला. यामध्ये सर्वच राजकीय पक्षांचे कार्यकर्ते सहभागी झाले होते. शहरवासीयांची ब-याच दिवसांची मागणी शासनाने मान्य केल्याबद्दल माजी नगराध्यक्ष तथा राष्ट्रवादी कॉंग्रेस (अजित पवार) पक्षाचे जिल्हाध्यक्ष निशिकांत पाटील यांनी शासनाचे आभार मानले आहेत. तर, भाजपचे जिल्हाध्यक्ष सम्राट महाडिक, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख आनंद पवार यांनीही शासनाचे आभार मानले आहेत.



## 36 जिल्ह्यांमध्ये भारतीय संविधान अमृत महोत्सवी वर्षानिमित्त सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन

**मुंबई/प्रतिनिधी :** यंदाचे वर्ष भारतीय संविधानाचे अमृत महोत्सवी वर्ष आहे. त्यानिमित्त सांस्कृतिक कार्य विभागातर्फे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. याचाच एक भाग म्हणून महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यांमध्ये सांस्कृतिक कार्यक्रमातून संविधानाचे अमृत महोत्सवी वर्ष साजरे केले जाणार आहे.

**5 व 6 नोव्हेंबर 2025 रोजी दोन दिवस होणार संविधानाचा जागर**

भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त कलाकारांना व्यासपीठ मिळणार आहे. छत्रपती शिवाजी नाट्यमंदिर, दादर, मुंबई या ठिकाणी दि. ५ व ६ नोव्हेंबर २०२५ रोजी सायंकाळी ७:३० ते १०:०० या वेळेत सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. दि. ५ नोव्हेंबर २०२५ रोजी सायंकाळी ७:३० ते १०.०० या वेळामध्ये 'गौरवगाथा संविधानाची' सादर होणार आहे. या कार्यक्रमाचे दिग्दर्शन अमेय पाटील, संगीत संयोजन योगेश पवार, सुप्रसिध्द गायक दिनेश हेलोडे, सचिन आगवणे, नितेश मोरे आणि गायिका संगीता पांचाळ, निवेदन प्रतिक पवार करणार आहेत. ६ नोव्हेंबर २०२५ रोजी 'राष्ट्रग्रंथ - आधारस्तंभ लोकशाहीचा' हे प्रसाद थोरवे आणि अभिराम भडकमकर लिखित कुमार सोहोनी दिग्दर्शित दोन अंकी नाटक सादर केले जाणार आहे. या नाटकांत ४० पेक्षा जास्त कलाकारांचा समावेश आहे. 'गौरव गाथा संविधानाची' या कार्यक्रमाची संकल्पना सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड.आशिष शेलार यांची असून या कार्यक्रमास मार्गदर्शन डॉ.किरण कुलकर्णी, सचिव सांस्कृतिक कार्य विभाग यांचे लाभले आहे. रसिक प्रेक्षकांनी या सर्व कार्यक्रमाला भरभरून प्रतिसाद द्यावा, असे आवाहन सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक विभीषण चवरे यांनी केले आहे.

## महाराष्ट्र जीवन प्राधिकरणात 290 पदांची भरती

### कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) 144 पदांसह विविध जागा

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मध्ये मोठ्या प्रमाणावर भरती प्रक्रिया सुरू करण्यात येत असून एकूण २९० पदांची भरती आयबीपीएस मार्फत केली जाणार आहे. यासंदर्भातील सविस्तर जाहिरात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अधिकृत संकेतस्थळावर (www.mjp.maharashtra.gov.in) प्रसिद्ध करण्यात आली आहे, अशी माहिती पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी दिली. या भरतीत कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) या पदासाठी सर्वाधिक १४४ पदे उपलब्ध असून त्याशिवाय कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी), लिपिक, तसेच इतर तांत्रिक व प्रशासकीय पदे देखील भरण्यात येणार आहेत. या भरती प्रक्रियेमुळे राज्यातील तरुण अभियंत्यांना आणि इतर पात्र उमेदवारांना शासन सेवेत संधी उपलब्ध होणार आहे. मंत्री गुलाबराव पाटील यांनी सांगितले की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण राज्यातील ग्रामीण भागात पाणीपुरवठा व स्वच्छता योजना राबवते. या योजनांचे सक्षमीकरण करण्यासाठी तांत्रिक व प्रशासकीय कर्मचा-यांची आवश्यकता होती. त्यामुळे पारदर्शक पद्धतीने आयबीपीएस मार्फत ही भरती करण्यात येणार आहे. जाहिरातीमध्ये शैक्षणिक पात्रता, वयोमर्यादा, आरक्षण निकष, तसेच अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली आहे. उमेदवारांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर भेट देउन आवश्यक माहिती व अर्ज प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. या भरतीमुळे राज्यातील पाणीपुरवठा प्रकल्पांच्या कामकाजाला गती मिळणार असून स्थानिक रोजगारनिर्मितीलाही चालना मिळेल, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त करण्यात आला आहे.



## शहराजवळील रहिवासी क्षेत्रासाठी तुकडेबंदी कायदा रद्द

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील नागरी भागातील तसेच प्रादेशिक योजनांमधील बिगर शेती क्षेत्रावरील जमिनींसाठी तुकडेबंदी कायदा रद्द करण्यात आला आहे. याबाबत राज शासनाने नुकताच एक अध्यादेश जारी केला असून या अध्यादेशामुळे १५ नोव्हेंबर १९६५ पासून तुकडेबंदी कायद्यामुळे अडकलेली घरे आणि प्लाट कायदेशीर करण्याचा मार्ग मोकळा झाल्याची माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मंत्रालयात पत्रकार परिषदेत दिली.या निर्णयासंदर्भात अधिक माहिती देताना महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, या अध्यादेशानुसार दि. १५ नोव्हेंबर १९६५ ते १५ ऑक्टोबर २०२४ या कालावधीत झालेल्या अशा तुकड्यांच्या खरेदी-विक्री व्यवहारांना आता कोणतेही शुल्क न आकारता नियमित करण्यात येणार आहे. राज्य शासनाने घेतलेला हा निर्णय ऐतिहासिक असून या निर्णयाचा राज्यातील ४९ लाख परिवारांना लाभ होणार आहे. राज्यात सध्या अंमलात असलेला तुकडेबंदी कायदा हा कृषी क्षेत्रासाठी लागू आहे. या कायद्यानुसार बागायत किंवा जिरायत जमिनींसाठी ठराविक प्रमाणभूत क्षेत्र निश्चित करण्यात आले आहे. परंतु, वाढत्या नागरीकरणामुळे अनेकांनी शहर व गावांच्या सभोवतालच्या भागात आपल्या गरजेपोटी या प्रमाणभूत क्षेत्रापेक्षा कमी क्षेत्राचे व्यवहार केले आहेत. अशा व्यवहारांना आतापर्यंत कायदेशीर दर्जा मिळालेला नव्हता. यास्तव राज्य शासनाने ३ नोव्हेंबर २०२५ रोजी तुकडेबंदी कायद्यावरील सुधारित अध्यादेश जारी केला असून त्याची तत्काळ अंमलबजावणी केली जाणार आहे.हा निर्णय महानगरपालिका, नगरपरिषदा, नगरपंचायतींच्या हद्दीतील क्षेत्र, मुंबई, पुणे, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणे (एमएमआरडीए, पीएमआरडीए, एनएमआरडीए) ग्रोथ सेंटर्स आणि विशेष नियोजन प्राधिकरणांतील क्षेत्र, तसेच युडीसीपीआरअंतर्गत शहर/गावांच्या परिघातील क्षेत्रांना लागू होणार आहे. ज्या जमिनींचे व्यवहार नोंदणीकृत आहेत पण ७/१२ उता-यावर नावे नोंदलेली नाहीत, त्यांची नावे आता मालकी हक्क म्हणून नोंदवली जातील. तर नोंदणीकृत नसलेले (नोटरीद्वारे केलेले) व्यवहार असलेल्यांनी संबंधित सब-रजिस्ट्रार कार्यालयात नोंदणी करून आपले हक्क नोंदवता येतील असेही महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले.महसूल मंत्री बावनकुळे यांनी सांगितले महसूल विभागामार्फत याबाबत लवकरच सविस्तर कार्यपद्धती तयार करून सर्व विभागीय आणि जिल्हा स्तरावरील कार्यालयांना मार्गदर्शक सूचना देणार आहेत. या निर्णयामुळे राज्यातील लाखो नागरिकांना दिलासा मिळून जमिनींच्या मालकी हक्कांचे प्रश्न सुटणार असल्याचा विश्वासही महसूल मंत्री बावनकुळे यांनी पत्रकार परिषदेत बोलताना व्यक्त केला. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले, महसूल विभाग अधिक लोकाभिमुख करण्याबरोबरच तो अधिक सक्षम, गतिमान करण्यावर शासनाने भर दिला आहे. सर्वसामान्य जनतेला सेवा गतीने देण्यासाठी महसुली कायद्यांमध्ये सुधारणा करण्यात येत आहेत. महसूल विभागातील अधिकारी कर्मचा-यांची पदोन्नतीची प्रकरणे जलद गतीने मार्गी लावली जात आहेत.महसूल मंत्री स्तरावर प्रलंबित असलेल्या केसेस/ प्रकरणातील मागील आठ महिन्यात दोन हजार केसेस/ प्रकरणे मार्गी लावली आहेत. पुढील तीन वर्षांत एकही खटला प्रलंबित राहणार नाही असे सूक्ष्म नियोजन करण्यात आले आहे. राज्यात व्हर्टिकल सातबारा देण्याचे नियोजन असून यात आधी मोजणी, मग खरेदीखत आणि त्यानंतर नोंदणी, अशी सुटसुटीत व्यवस्था असेल, असेही महसूल मंत्री बावनकुळे यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

**राज्यातील 49 लाख तुकड्यांचे व्यवहार नियमित होणार महसूल मंत्र्यांची माहिती**



# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## बिहारचे रणकंदन

गुरुवापासून बिहारमध्ये विधानसभा निवडणुकांची रणधुमाळी सुरू होणार आहे. याकडे सा-या देशाचे लक्ष लागले आहे. ६ आणि ११ नोव्हेंबर अशा दोन टप्प्यांमध्ये होत आहेत. १४ नोव्हेंबरला मतमोजणी असून, त्यावेळी कोणाची हार आणि जीत स्पष्ट होईल. विधानसभेच्या २४३ जागा असून, सरकार स्थापन करण्यासाठी १२३ जागांचे बहुमत आवश्यक आहे. पाच वर्षांपूर्वी झालेल्या निवडणुकीत 'एनडीए'ने बहुमत मिळवले असले, तरी राष्ट्रीय जनता दल, म्हणजेच लालूप्रसाद यादव यांच्या आरजेडीने ७५ जागा जिंकल्या होत्या, तर भाजपने ७४. मुख्यमंत्रिपद भूषवत असलेल्या नितीश कुमार यांच्या 'जेडीयू'ला अवघ्या ४३ जागा मिळाल्या होत्या. काँग्रेसने १९, लोकजनशक्ती पार्टी म्हणजेच 'एलजेपी'ने १ आणि इतरांनी ३१ जागा जिंकल्या होत्या. यावेळी 'एनडीए' पुन्हा एकदा सत्ता स्थापन करू शकते, असा बहुसंख्य जनमत पाहण्यांचा अंदाज असला तरी त्यावरून निकालाचा अंदाज बांधणे कठीण. प्रचार अंतिम टप्प्यात आला आहे. आरोप-प्रत्यारोपांचा भडिमार सुरू आहे. 'इंडिया' आघाडीचे मुख्यमंत्रिपदाचे उमेदवार म्हणून तेजस्वी यादव यांचे नाव जाहीर करायला काँग्रेस पक्ष तयार नव्हता. आरजेडीने त्यांच्या डोक्यावर कट्टा लावल्यानंतर ते तयार झाले, अशा शब्दात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इंडिया आघाडीवर आणि विशेषतः काँग्रेसवर तोफ डागली आहे. एका युवराजाने व्होट अधिकार यात्रा काढली, त्यामुळे आपल्या स्थानाला धोका निर्माण झाला आहे, असे 'जंगलराज'च्या युवराजाला वाटले. त्यामुळे आरजेडीने काँग्रेस प्रदेशाध्यक्षांच्या विरोधातच उमेदवार जाहीर केला, असा हल्लाबोल त्यांनी केला आहे. तर बिहारचे डबल इंजिन सरकार दिल्लीतून चालवले जात असून, राज्याची जनता तसेच मुख्यमंत्री नितीश कुमार यांना आदर मिळत नसल्याची टीका काँग्रेस नेत्या प्रियांका गांधी यांनी केली आहे. लालूप्रसाद यादव मुख्यमंत्री असताना, बिहारमधील कायदा व सुव्यवस्था परिस्थिती पूर्णतः बिघडली होतीच; परंतु ताज्या आकडेवारीनुसार, २०१५ ते २०२४ या नितीश कुमार राजवटीतील राज्यातील गुन्हेगारीचे प्रमाण ८० टक्क्यांनी वाढले. याच कालावधीत गुन्हेगारीची राष्ट्रीय सरासरी ३२ टक्के वाढ दर्शवणारी होती, असे स्टेट क्राईम रेकॉर्ड ब्युरोच्या रिपोर्टमध्ये म्हटले आहे. केवळ लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी वा तेजस्वी यादवच नव्हे, तर एलजेपीचे प्रमुख चिराग पासवान हेदेखील वाढत्या गुन्हेगारीवरून नितीश कुमार सरकारला लक्ष्य करत आहेत. बिहारची लोकसंख्या १३ कोटी असून, जवळपास दोन ते तीन कोटी लोक नोकरीधंद्यासाठी स्थलांतरित झाले आहेत. बेकारीचा दर प्रचंड, म्हणजे १०.८ टक्के इतका आहे. बिहार हे देशातील सर्वाधिक गरीब राज्य असून, बहुआयामी दारिद्र्य निर्देशांकानुसार, देशातील सर्वाधिक वाईट कामगिरी बिहारची आहे. देशातील ९ टक्के लोक बिहारमध्ये राहतात; परंतु जीडीपीमधील त्यांचा वाटा साडेतीन टक्क्यांच्या आसपास आहे. थोडक्यात, सर्वच पक्षांनी बिहारमधील जनतेशी प्रतारणाच केलेली आहे. गेल्यावेळी एनडीए आणि आरजेडी, काँग्रेस व डाव्यांचे महागठबंधन यांच्यात फक्त १२ हजार मतांचा फरक होता. मागच्या वेळी एलजेपीने स्वतंत्रपणे निवडणुका लढवून, नितीश कुमार यांच्या जेडीयूचे उमेदवार धडाधड पाडले होते. यावेळीही नितीश कुमार यांना त्यांची जागा दाखवून देण्यात आली आहे. सत्तेत आल्यास भाजप मुख्यमंत्रिपदावर दावा सांगेल, असे सांगितले जाते. भाजपने २०२० मध्ये ११० जागा लढवल्या होत्या, तर जेडीयूने ११५. यावेळी भाजप व जेडीयू दोघेही १०१-१०१ जागा लढवत आहेत. उलट चिराग पासवान यांच्या पक्षाला अधिक जागा दिल्या आहेत. शिवाय आघाडीत आपली ताकद वाढल्याचे स्पष्ट संकेत भाजपने नितीश कुमार यांना दिलेले दिसतात. 'महागठबंधन'मध्येही सर्वकाही आलबेल नाही. काही मतदारसंघांमध्ये या आघाडीचे उमेदवार एकमेकांविरोधात लढणार आहेत. आघाडीने तेजस्वी यादव यांना मुख्यमंत्री व मुकेश सहनी यांना उपमुख्यमंत्रिपदाचा उमेदवार म्हणून जाहीर केले. काँग्रेस नेते राहुल गांधी आणि तेजस्वी यादव यांनी ३८ पैकी ३३ जिल्ह्यांतून 'मताधिकार यात्रा' काढून, कथित मतचोरीबाबत जनजागृती केली. राजद-काँग्रेसने वातावरणनिर्मिती करताच, आयआरसीटीसी हॉटेल घोटाळा प्रकरणात दिल्लीतील न्यायालयाने राबडीदेवी आणि तेजस्वी यादव यांच्यावर फसवणूक, भ्रष्टाचाराचे आरोप निश्चित केले. महागठबंधनमध्ये राजद, काँग्रेस, सीपीआय, सीपीआय (एमएल), सीपी (आयएम), व्हीआयपी, झारखंड मुक्ती मोर्चा, आयआयपी या पक्षांचा समावेश आहे. जागांवरून राजद व काँग्रेस यांच्यात मतभेद असून, काँग्रेसला जास्त जागा हव्या होत्या. महागठबंधनने जाहीरनाम्यात महिलांना दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी, बलात्कार पीडितांना मदत, जमीन सुधारणा, प्रत्येक उपविभागात ओबीसींसाठी वसतिगृह अशी आश्वासने दिली आहेत. या जाहीरनाम्यावर डाव्यांचा तसेच राहुल गांधी यांचा प्रभाव असल्याचे दिसते. दुहेरी लढतीत निवडणूक रणनीतिकार प्रशांत किशोर यांचा 'जनसुराज पक्ष' हा एक पर्याय म्हणून उतरलेला आहे. तो 'रालोआ'ची की 'महागठबंधन'ची मते कापेल, हे सांगता येणार नाही. गेल्या तीन महिन्यांत नितीश कुमार सरकारने मोफत वीज, सामाजिक सुरक्षितता पेन्शनमध्ये वाढ, बेकारी भत्ता अशा वारेमाप घोषणा केल्या. त्यामुळे सरकारच्या तिजोरीवरील भार प्रचंड वाढला. तसेच केंद्र सरकारने बिहारमधील महिलांसाठी प्रत्येकी १० हजार रुपये देण्याची घोषणा करून ती अंमलात आणली. जदयू-भाजप सरकारच्या विरोधातील (अँटिइन्कम्बन्सी) लाट थोपवण्याचे आटोकाट प्रयत्न सुरू आहेत. गेल्या काही वर्षांत देशातील झारखंडपासून ते उत्तर प्रदेशपर्यंत अनेक राज्यांचा चेहरामोहरा बदलला; परंतु बिहार अजून जुन्या-पुराण्या वैचारिक जोखडाखालीच राहिला आहे. धर्मापेक्षा जातीचे राजकारण आजही प्रभावी ठरताना दिसते. जातीपातींमध्ये दुभंगलेला बिहार आधुनिक विकासाचा व औद्योगिकीकरणाचा प्राथमिक टप्पा केव्हा ओलांडणार, हाच खरा चिंतेचा विषय आहे. बिहारवर जो कोण राज्य करेल, हे लवकरच स्पष्ट होईल. निवडणूक मैदानात दोन्ही आघाड्यांचा संघर्ष टिपेला पोहोचला आहे आणि पुन्हा एकदा सर्वसामान्य मतदारच केंद्रस्थानी आहे.

# कशासाठी? मोटारीच्या पोटासाठी!

**इथेनॉल निर्मितीला दिल्या जात असलेल्या प्रोत्साहनामुळे मक्याची लागवड वाढली तर तांदूळ, गहू, मूग, हरभरा आणि इतर पारंपरिक पिकांची लागवड कमी होत जाईल. ६० वर्षांनंतर आपल्यावर गहू आणि तांदूळ आयातीची नामुष्की येऊ नये असे वाटत असेल, तर अमेरिकेत इथेनॉलच्या आग्रहाचे काय दुष्परिणाम झाले, याचा अभ्यास आताच केला पाहिजे...**

'साहेब, तुमच्या आलिशान मोटारीची टाकी वर्षभर इथेनॉल भरते. त्यासाठी लागतो तेवढ्या मक्यात, आता चार माणसांची वर्षभर पोट भरली असती, तुमच्या कारखान्यात मक्यापासून एक लिटर इथेनॉल करायला जेवढे पाणी लागते, त्या पाण्यात आमच्या चार माणसांची तहान किमान तीन दिवस भागली असती.' असे फलक घेऊन, अमेरिकेच्या मिनेसोटा, नेब्रास्का आणि फ्लोरिडा राज्यांत अनेक ठिकाणी लोक रस्त्यांवर घोषणा देत होते. इथेनॉल कारखान्यांच्या बाहेर आंदोलन करत होते आणि त्यांच्या विरोधात न्यायालयात खटले दाखल करत होते. ते वर्ष होते २००७!

या काळात जगभरात अन्नधान्याचे भाव वाढत गेले. २००७ आणि २००८ या दोन वर्षात ते दुपटीहून अधिक झाल्यामुळे लोक मेटाकुटीला झाले. अर्धपोट व भुकेल्यांच्या असंतोषाची तीव्रता व व्याप्ती २००८ साली वाढत गेली. पास्ताच्या किमतीत वाढ झाल्यावर संपूर्ण इटली दोन दिवस ठप्प झाली. इजिप्तमध्ये स्वस्त ब्रेडसाठी लागलेली रांग मोडल्यामुळे दोन तरुणांचा बळी गेला. व्हेनेझुएला, मेक्सिको आणि हैती या लॅटिन अमेरिकन देशांत भुकेला जमाव हिंसक झाला होता. भूक न भागवणाऱ्या देशांमध्ये अराजकच माजले. सुदानमधील दारफूर भागात भुकेने तडफडणाऱ्यांसाठी येणाऱ्या धान्याच्या ८३ ट्रकांचे अपहरण झाले. थायलंडमध्ये भाताच्या पिकाची रात्रीची राखण करण्यासाठी बंदुकीचा पहारा ठेवणे भाग झाले. पाकिस्तानात धान्याची वाहतूक करताना सशस्त्र रखवालदार तैनात करावे लागले. जगात पुन्हा एकदा उपासमार वाढीला लागली.

विसाव्या शतकात १९६० च्या दशकापर्यंत शेतीतील उत्पादन अतिशय तुटपुंजे होते. दुष्काळात कोट्यवधी भूकबळी गेले होते. हे पाहून दुष्काळ निवारण्यासाठी अमर्त्य सेन हे अर्थशास्त्राकडे तर अमेरिकेच्या शेतकरी कुटुंबातील नॉर्मन बोरलॉग हे शेतीशास्त्राकडे गेले. सेन यांनी जगाला भुकेचे अर्थशास्त्र समजावून सांगितले. त्यांनी 'अन्नधान्याची उपलब्धता असली तरी सामान्य जनतेला बाजारातील धान्य विकत घेणे झेपत नाही. लोक अन्नापर्यंत पोहोचू शकत नाहीत, अन्न लोकांपर्यंत वा लोक अन्नापर्यंत पोहोचणे हाच महत्त्वाचा मुद्दा आहे.' असा सिद्धांत मांडला.

बोरलॉग यांनी जनुकशास्त्राच्या आधारे खुज्या जातीचे गव्हाचे नवीन वाण निर्माण केले. त्याचा प्रसार करून भारत, पाकिस्तान आणि चीनमधील गव्हाचे उत्पादन तिप्पटीने वाढवले. त्यामुळे इतिहासात पहिल्यांदाच या देशांतील कोठारांमध्ये गव्हाचा साठा दिसू लागला आणि आयात थांबली, शेतीशास्त्राला नोबेल देता येत नसल्यामुळे त्यांना १९७० साली शांततेचा नोबेल पुरस्कार बहाल केला गेला, तेव्हा निवड समितीने त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करताना म्हटले होते, 'संपूर्ण जग भुकेच्या खाईत आणि विनाशाच्या उंबरठ्यावर उभे होते. उपासमारीमुळे किती बळी गेले असते, याचा अंदाज बांधणे अशक्य होते. धान्याची टंचाई होऊन आशिया आणि आफ्रिका खंड कसे उद्ध्वस्त होतील, याचा सविस्तर आराखडा जगातील विद्वान सादर करत होते. डॉ. नॉर्मन बोरलॉग यांनी 'न भूतो न भविष्यति' अशी ऐतिहासिक कामगिरी करून मोठी मनुष्यहानी टाळली आहे.'

एकविसाव्या शतकाच्या पहिल्या दशकातील पुन्हा अर्धपोट- उपाशी जनता आणि त्यांची दैना पाहून डॉ. बोरलॉग विमनस्क झाले होते. ते २००७ साली भारतात आले असताना, डॉ. एम. एस. स्वामीनाथन यांच्यामुळे त्यांच्याशी संवाद साधण्याची संधी मला मिळाली होती. आपल्या हयातीतच दंतकथा झालेले 'हरित क्रांतीचे शिल्पकार' म्हणाले, 'मका हे कोट्यवधी लोकांचे अन्न आहे. त्यापासून इथेनॉल तयार करून ते मोटारीत वापरले जात आहे. अमेरिकी सरकार एक लिटर इथेनॉलमागे सुमारे ५० सेंट अनुदान देत अब्जावधी डॉलर उधळत आहे. अमेरिकेत मक्याचे क्षेत्र दणकून वाढल्यामुळे गहू आणि सोयाबीनचे क्षेत्र घटत गेले. मका इथेनॉलकडे वळल्याने धान्य आणि पशुखाद्य दोन्ही प्रचंड महाग होत आहे. अमेरिकेचा हा 'विचित्र उद्योग' जगाला धोक्याच्या वळणाकडे नेत आहे. इंधन माणसांसाठी की मोटारीसाठी? हा खरा सवाल आहे.' बोरलॉग स्वतःच्या सरकारचे वाभाडे काढत होते.

पुढे, बोरलॉग-स्वामीनाथन यांच्या पुढाकारातून 'फूड अँड ॲग्रिकल्चर ऑर्गनायझेशन'ने रोममध्ये 'हवामान बदल, जैव इंधनाचे आव्हान आणि अन्नधान्य सुरक्षा' या विषयावर शिखर परिषद आयोजित केली होती. तिला १८३ राष्ट्रांचे ४,७०० प्रतिनिधी उपस्थित होते. तिथे 'जमीन भुकेसाठी की मोटारीकरिता?' या प्रश्नाला 'इंधन स्वस्त, प्रवास अधिक, मोटारींचा खप जास्त आणि अर्थव्यवस्था मस्त' असे उत्तर देणारे कंपनी अधिकारी उपस्थित होते.

कार्पोरेट कंपन्यांचा दबाव कमी न होता तो वाढत गेला. परिणामी, अमेरिका व युरोपमधील जैवइंधन प्रकल्प झपाट्याने फोफावत गेले. स्वस्त बायोडिझेलसाठी जंगल तोडून मोगली एरंड लावले गेले. संयुक्त राष्ट्रसंघाचे महासचिव बान की मून यांच्यापासून अर्थवेत्ते अमर्त्य सेन यांच्यापर्यंत अनेक महनीय, 'इथेनॉलकडे वळणारा मका हाच धान्यांचे भाव कडाडण्याला कारणीभूत आहे,' याची स्पष्ट जाणीव करून देत राहिले.

गेली १८० वर्षे 'सायंटिफिक अमेरिकन' हे मासिक संपूर्ण जगाची वैज्ञानिक जाणीव प्रगल्भ करत आहे. यातून सुमारे १५० नोबेलने सन्मानित वैज्ञानिकांचे आणि अग्रगण्य संशोधन संस्थांचे शोध निबंध प्रसिद्ध झाले आहेत. 'साय-ॲम' २००८ पासून सातत्याने अनेक लेखांतून 'धान्यापासून इथेनॉल हे अजिबात स्वस्त, स्वच्छ आणि हरित नाही', हे सप्रमाण दाखवून देत आहे. 'साय-ॲम' ने २०२२ साली 'नॅशनल अकॅडमी ऑफ सायन्सेस'चा 'द सोबरिंग टूथ अबाऊट कॉर्न इथेनॉल' हा शोधनिबंध प्रसिद्ध केला होता. त्यात त्यांनी म्हटले आहे, 'जैवइंधनासाठी मका आणि इतर धान्य वापरल्यामुळे हवेतील हरितगृह वायूंचे उत्सर्जन जवळपास दुपटीने वाढत आहे.



(इंधनः पोटासाठी की मोटारीसाठी ? सौजन्य- सायंटिफिक अमेरिकन')

अमेरिका आणि जगातील अर्थतज्ज्ञांनीसुद्धा इथेनॉलच्या बहुगुणीपणाचे दावे हाणून पाडले आहेत. ते वारंवार सांगत आहेत, 'मक्याचे इथेनॉलमधील रूपांतर है अधिक ऊर्जाग्राही, जलग्राही आणि महागडे आहे. त्यापेक्षा उसाच्या रसापासून अथवा मळीपासून इथेनॉल निर्मिती अधिक कार्यक्षम आणि किफायतशीर आहे. ब्राझील, भारत, फिलिपाइन्स वा क्युबाकडून इथेनॉल आयात केल्यास पाणी, ऊर्जा व डॉलर यांची बचत होईल.'

अशी सर्व वैज्ञानिक माहिती घेऊन २००८ साली फ्लोरिडातील लोक आंदोलन करू लागले. तसेच त्यांनी इथेनॉल उद्योग बंद करण्यासाठी न्यायालयाकडे धाव घेतली. एक लिटर इथेनॉल तयार करण्यासाठी ३ ते ४ किलो मका आणि तीन हजार ते पाच हजार लिटर पाणी लागते, दरवर्षी २०० कोटी लिटर इथेनॉल उत्पादन करणा-या एका अर्कशाळेत प्रत्येक मिनिटाला २०,००० लिटर पाण्याचा अभिषेक घालावा लागतो. फ्लोरिडा राज्यात पाण्याचे दुर्भिक्ष्य जाणवत असतानाच इथेनॉल कारखान्याने दररोज तीन कोटी लिटर पाण्याचा पुरवठा करण्याची मागणी केली. नागरिकांनी, इथेनॉलच्या नादात पाण्याचे सर्व स्रोत कोरडेठाक होत असल्याचे पुरावे न्यायलयात सादर केले. त्यावर्षी इथेनॉलची अर्कशाळा असलेल्या अमेरिकेच्या दहा राज्यांतून संतप्त नागरिक इथेनॉलच्या विरोधात उभे ठाकले. अमेरिकी अध्यक्ष जॉर्ज बुश यांनी धान्यापासून जैवइंधनाला प्रोत्साहन दिले. नंतर आलेल्या बराक ओबामा यांनादेखील 'अमेरिकी कॉर्पोरेट सिस्टीम'चा दबाव झुगारून देता आला नाही. न्यायालयाकडून हस्तक्षेप होत राहिला. कारखाने कधी बंद तर कधी चालू होत राहिले.

या पार्श्वभूमीवर भारताची जैवइंधन वाटचाल पाहणे आवश्यक आहे. भारतामध्ये २०२४-२५ साली एकूण एक हजार ७९ कोटी लिटर इथेनॉल उत्पादनापैकी ४५ टक्के मक्यापासून तयार केले होते. 'अन्न महामंडळा'तील शिल्लक तांदळापासून २२ टक्के, तर १६ टक्के इथेनॉल उसाच्या मळीपासून केले होते. भारत सरकार २०२५-२६ साली मक्यापासून इथेनॉलचे प्रमाण ७० टक्क्यांवर नेण्याचे ठरवत आहे. देशाच्या उद्दिष्टापैकी ५० टक्के इथेनॉल उत्पादन करू शकणाऱ्या साखर कारखान्यांकडून केवळ २० टक्के इथेनॉल घेतले जाईल.

उत्तर प्रदेश, महाराष्ट्र, तेलंगणा, कर्नाटक, आंध्र प्रदेश, तमिळनाडू आणि छत्तीसगड या राज्यांतील सुमारे ७४० कारखान्यांतून धान्यापासून इथेनॉल तयार केले जात आहे. भाताचे कोठार असलेल्या छत्तीसगडमध्ये ३४ इथेनॉल कारखाने सुरू झाले आहेत. या कारखान्यांमुळे प्रदूषण आणि दुर्गंधी पसरत असल्याने रहिवासी वैतागले आहे. भातशेतीची हानी आणि पाणी पातळीत घट होत असल्यामुळे त्या वरोधात लोक शांततामय मार्गाने आंदोलन करत आहे. तेलंगण राज्याच्या जोगुलांबा गदवाल जिल्हयाती पेड्डा धनवाडा गावात इथेनॉल कारखान्याच्या विरोधात झालेल्या आंदोलनाला हिंसक वळण लागले होते.

यापुढे, मक्याची लागवड वाढल्यामुळे तांदूळ, गहू, मूग, हरभरा आणि इतर पारंपरिक पिकांची लागवड कमी होत जाईल. परिणामी, ६० वर्षांनंतर आपल्यावर पुन्हा गहू आणि तांदूळ आयातीची नामुष्की येऊ नये अशीच आपली इच्छा असेल. दरम्यान 'ट्रम्पायन' काळी, भारताने मका आयात करावा, यासाठी अमेरिका दबाव आणत आहे. भारताची २०२३ आणि २०२४ साली शेती उत्पादनाची आयात सुमारे तीन लाख कोटी रुपयांची होती. त्यात प्रामुख्याने खाद्यतेल आणि डाळींचा वाटा होता. आता त्यात धान्याची आयात वाढत गेली तर धान्य स्वावलंबनाचे काय ? मागील वर्षी भारत सरकारने 'शेती आयोग अहवाल' करणाऱ्या एम. एस. स्वामीनाथन यांना मरणोत्तर भारतरत्न देऊन गौरवले होते. यंदा त्यांच्या जन्मशताब्दीनिमित्त पोस्टाचे तिकीट आणि शंभर रुपयांचे नाणे जारी केले. ते स्वामीनाथन सतत बजावत आले, 'धान्य आयात म्हणजे देशाच्या शेतीचे कंत्राट बाहेरच्या देशांना देणे, बेकारी आयात करणे, धान्य सुरक्षितता आणि सार्वभौमत्व गहाण टाकणे आहे.

भारताचे इंधन धोरण, 'अमेरिकी वळण' का घेत आहे? हे कोणासाठी तोरण आणि कोणासाठी मरण ठरू शकेल ? अमेरिकेत मक्यापायी गहू आणि सोयाबीनची टंचाई झाली तेव्हा अमेरिकी कंपन्यांनी ब्राझिलमधील ॲमेझॉनच्या सदाहरित अरण्यातील वृक्षांवर वेगाने करवती फिरवून सोयाबीनची लागवड केली. भारतातही असे अरण्यकांड होणार नाही ना?

जगातील शेती अर्थशास्त्रज्ञांनी बोरलॉग यांच्या 'जंगल विनाश थांबवण्यासाठी अधिक उत्पादन देणाऱ्या पिकांच्या जातींची आवश्यकता' या प्रतिपादनाला 'बोरलॉग सिद्धांत' म्हटले होते. मी त्यांना त्याविषयी विचारले. शेतीसाठी आयुष्य समर्पित करणारे ९३ वर्षांचे बोरलॉग म्हणाले, 'जगातील अन्नधान्य उत्पादनाचे प्रमाण १९५० साली होते, तेवढेच ते २००० सालापर्यंत राहिले असते, तर सध्याच्या जागतिक उत्पादनाइतके अन्न मिळविण्यासाठी आपल्याला अंदाजे एक हजार ८०० कोटी हेक्टर अतिरिक्त शेतजमीन मिळवावी लागली असती. प्रत्यक्षात आपण केवळ ६० कोटी हेक्टर जमीन वापरली. माझ्या काही वक्तव्यांना तथाकथित सिद्धांत असे संबोधन दिले गेले, त्यावेळी जंगल तोडले जात होते ते धान्यासाठी ! आता अरण्यसंहार होतोय तो मोटारींसाठी आणि अवाढव्य कंपनांच्या प्रचंड नफ्यासाठी!'

सत्योत्तर काळात शेतीच्या सिद्धांताचे क्रूर विडंबन करणारा 'नव-सिद्धांत' असा तयार झाला आहे.

**अतुल देऊळगावकर**

## राज्यातील शाळांमधून गुणवत्तापूर्ण शिक्षण?

देशातील एक लाख चार हजार एक शिक्षकी शाळांपैकी ८१८७ शाळा महाराष्ट्रात आहेत. शिक्षकांच्या संख्येच्या बाबतीत आंध्र प्रदेश, उत्तर प्रदेश, झारखंड यानंतर महाराष्ट्राचा क्रमांक लागतो. या संख्येमुळे राज्यातील शिक्षण क्षेत्रातील उणिवांची जाणीव होते. ज्या शिक्षणामुळे गुणवत्तापूर्वक विद्यार्थी घडविण्याच्या प्रयत्नांनी पाया रचला जातो त्यात महाराष्ट्र सरकारला आणि त्यांच्या प्रशासकांना गांभीर्याने लक्ष द्यायला वेळ नाही असेच दिसून येते. शालेय शिक्षण घेतांना विद्यार्थ्यांच्या वाचन, लेखन, गणित, सामाजिक शास्त्र यांतील मूलभूत तत्वे, कौशल्ये आत्मसात करतांना विद्यार्थ्यांच्या अडचणी, गुणवत्ता यांचा विचार केला जात नाही, परिणामी विद्यार्थ्यांच्या त्या गुणांमधील कमतरतेमुळे विद्यार्थी अभ्यासक्रमात किती मागे राहतात याचा शिक्षण विभागाकडून गंभीरतेने पाहिले जात नाही. विद्यार्थी मागे पडल्यास शिक्षकांना जबाबदार धरले जाते. शाळांची, खास करून ग्रामीण भागातील शाळांची परिस्थिती पाहिली असता, जिथे एकशिक्षकी शाळा चालविली जाते तिथे इयत्ता पहिली ते चौथी/पाचवी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना अध्यापनाचे काम एकाच शिक्षकाला करावे लागते. त्याव्यतिरिक्त प्रशासकीय कामे, सर्वेक्षणाच्या कामांची जबाबदारी सोपविलेली असते ती पार पाडावी लागते. एकच शिक्षक असल्याने चारही इयत्तांचे विद्यार्थी एकाच वर्गात बसविले जातात. कारण त्या शिक्षकाला प्रत्येक विषयाच्या तासानंतर वर्ग बदलण्यात वेळ दवडणे प्रत्यक्षात व्यवहारी नसते. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांच्या शिक्षणाकडे एकाच शिक्षकाला अभ्यास आणि अभ्यासेतर तत्वे कौशल्ये आत्मसात करून घेणे शक्य होत नाही. यासाठी खरी गरज आहे ती अधिक शिक्षकांच्या नेमणुकांची. नेमणुकांभावीच्या अशा कारणांनी प्रशासकीय दुर्लक्ष विद्यार्थ्यांच्या पायाभूत शिक्षणाचा विचार न केल्याने शिक्षणाचा विकास होत नाही. अतिरिक्त शिक्षक का नेमले जात नाहीत यावर खुलासा केला जात नाही. शाळांमधून गुणवत्तापूर्वक विद्यार्थी घडविण्याचे प्रयत्न केले जात नाहीत यावरून शालेय शिक्षणासंबंधी जबाबदारी कुणाची हे समजणे कठीण होऊन बसले आहे.

**स्नेहा राज**

## दिवाळी सणाने अर्थचक्राला गती

दिवाळीचा सण हा जितका वैयक्तिक स्वरूपाचा असतो. दिवाळीच्या मुहूर्तावर होणारी घर खरेदी वाहन खरेदी, नव्या व्यवसायांचे शुभारंभ, त्या काळात होणारी शेताची पूजा आणि त्याचवेळी शेअर बाजारातही लक्ष्मीपूजनाच्या दिवशी असलेला उत्साह हा याच धार्मिक आस्था किंवा निष्ठेचा प्रभाव व्यक्त करणारा ठरतो. अर्थातच या श्रद्धेतून नवे संकल्प सिद्धीला नेण्याचेही बळ मिळते आणि वर्षभरासाठी आवश्यक असलेला आत्मविश्वास तयार होतो. अर्थचक्राबरोबर समाजमानालाही सक्रिय ठेवण्याचे काम या दिवाळीसारख्या सणातून होत असते. विशेषतः गेल्या पंधरा वर्षात भारतात सणासुदीला होणारे आर्थिक व्यवहार जवळपास पाच पटीने वाढल्याचे अर्थक्षेत्रातील तज्ज्ञांचे म्हणणे आहे. आज ती जवळपास सहा ते सात लाख कोटींवर जाऊन पोहोचली आहे. यंदाच्या दिवाळी उत्सवात वस्तूसेवाकरात कपात झाल्याने बाजारपेठांमध्ये देखील मोठा उत्साह दिसून आला. उद्योग-व्यवसाय या अर्थव्यवस्थेला मजबूत करतात हे जरी खरे असले तरी या अर्थव्यवस्थेचे चक्र कार्यरत ठेवण्यासाठी दिवाळीसारख्या सणातील बाजारपेठा महत्वपूर्ण घटक असतात हेही तेवढेच खरे ठरते यात काही शंका नाही.

**मधुकर चुटे**

## खा. राऊत सक्रीय राजकारणापासून दूर

महाविकास आघाडीच्या स्थापनेपासून ठाकरे शिवसेनेची मुलुख मैदान तोफ, खासदार संजय राऊत चर्चेचे केंद्रबिंदू बनले त्यातच गेल्या लोकसभा निवडणुकीपासून आजतागायत संजय राऊत यांची पत्रकार परिषद आणि महाराष्ट्राच्या राजकारणात आरोपांचा धुरळा असे समीकरणचं बनले होते मात्र हेचं राऊत आता पुढील काही दिवस सक्रीय राजकारणापासून दूर राहणार आहेत. राऊतांनी स्वतः याबाबत पत्रक काढत माहिती दिल्याचे वृत्त आहे. महाविकास आघाडी निर्माण करण्यात राऊतांचा महत्वाचा वाटा आहे संजय राऊत शिवसेनेशी एकनिष्ठ राहुन पक्ष वाढीसाठी सातत्याने प्रयत्न केले आहेत ठाकरे परिवाराचे अत्यंत विश्वासू मानले जातात. त्यांच्यावर अनेक आरोप प्रत्यारोपांच्या फैरी झडल्या मात्र त्यांना ते न जुमानता सर्व आरोप परतून लावले. एक कट्टर शिवसैनिक आणि धाडशीवृत्तीचा निर्णायक नेता म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते आजारपणामुळे अनेक चर्चांना उधाण आले आहे आपण सगळ्यांनी माझ्यावर कायम विश्वास ठेवला आणि प्रेम केले पण माझ्या प्रकृतीत काही गंभीर स्वरुपाचे बिघाड झाल्याचे समोर आले आहे. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका तोंडावर आलेल्या असताना असा राऊतांना धक्का पोहचल्यामुळे सर्वजण अचंबित झाले आहे.

**राजू जाधव**

# आज राज्यस्तरीय (विदर्भ) खो-खो स्पर्धेचे उद्घाटन

## नव जयहिंद मंडळाचे आयोजन, विदर्भातील महिला व पुरूषांच्या २९ संघांचा राहणार सहभाग

जनमाध्यम प्रतिनिधी



यवतमाळ : नव जयहिंद क्रीडा मंडळाच्या वतीने दि. ५ ते ७ नोव्हेंबर २०२५ दरम्यान अभ्यंकर कन्या शाळेच्या प्रांगणावर आयोजीत करण्यात आलेल्या स्व. चिंतामणी पांडे यांच्या स्मृती प्रित्यर्थ राज्यस्तरीय (विदर्भ) खो-खो स्पर्धेचे उद्घाटन बुधवार दि. ५ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता पार पडणार आहे. स्पर्धेमध्ये संपूर्ण विदर्भातून पुरुष व महिला गटातील २९ नामांकित मंडळांचे संघ सहभागी होणार आहेत.

या उद्घाटन सोहळ्याला खासदार, संजय देशमुख, आमदार बाळासाहेब मांगुळकर, माजी मंत्री मदन येरावार, अखील भारतीय खो-खो महासंघ दिल्लीचे सहसचिव चंद्रजीत जाधव, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, मंदार पत्की, जिल्हा क्रीडा अधिकारी घनश्याम राठोड, जिल्हा उपनिबंधक नानासाहेब चव्हाण, विदर्भ खो खो संघटनेचे अध्यक्ष सुधीर निंबाळकर, महासचिव संजय इंगळे, वुमेन्स एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष, ॲड. अमरचंद दर्डा, सहसचिव, मोहन गांधी, एज्युकेशन सोसायटीचे सचिव धनंजय पांडे, कै. बाळासाहेब पांढे पतसंस्थेचे उपाध्यक्ष सुभाष अतकर यांच्यासह इतर मान्यवर मंचावर उपस्थित राहणार आहेत. दररोज सकाळी ७ ते दुपारी १ आणि दुपारी ४ ते रात्री १२ या कालावधीत सामने खेळविले जाणार आहे. या स्पर्धेमध्ये तब्बल २९ संघांमधील ४५० खेळाडुंचा सहभाग राहणार आहे. या सर्व सहभागी संघांच्या खेळाडूंची निवास आणि भोजन व्यवस्था मंडळाच्या वतीने करण्यात आली आहे. अभ्यंकर कन्या शाळेच्या प्रांगणावर मैदान तयार करण्यात आले असून प्रेक्षकांसाठी आसन व्यवस्था करण्यात आली आहे. स्पर्धेमध्ये सहभागी होणाऱ्या खेळाडुंसाठी लाखो रुपयांची पारितोषीके देण्यात येणार आहेत. त्यामुळे या स्पर्धा पाहण्यासाठी आणि खेळाडूंच्या पाठीवर कौतुकाची थाप देण्यासाठी शहरवासीयांनी स्पर्धेला आवश्य भेट द्यावी असे आवाहन मंडळाचे अध्यक्ष विनायकराव बोदडे, उपाध्यक्ष बाळासाहेब दौलतकार, सचिव प्रशांत वानखडे, खो-खो संघटनेचे प्रा. विकास टोणे, प्रदीप वानखडे, अमोल बोदडे, अविनाश जोशी, प्राचार्य जयंत चतुर, सुनील वानखडे, विलास किनवटकर, कैलास शिंदे, नमोद बल्लाळ, कैलास राऊत, सचिन दरेकर, अजय निनगुरकर जम्मु लालुवाले, पंकज रोहणकर, आशिष प्यारलेवार, अमोल ढोणे यांनी केले आहे.

### पालकमंत्र्यांच्याहस्ते होणार बक्षीस वितरण

या स्पर्धेचा भव्य बक्षीस वितरण सोहळा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. संजय राठोड यांच्या हस्ते शुक्रवार दि. ७ नोव्हेंबर रोजी रात्री ८ वाजता पार पडणार आहे. यावेळी जिल्हाधिकारी विकास मिना, जिल्हा पोलिस अधीक्षक कुमार चिंता, जिल्हा क्रीडा अधिकारी घनश्याम राठोड, शिवसेना समन्वयक, पश्चिम विदर्भ पराग पिंगळे, खेतानी फाऊंडेशनचे अध्यक्ष सलीम खेतानी, गोदावरी अर्बनचे व्यवस्थापकीय संचालक धनंजय तांबेकर, विदर्भ खो-खो असोसीएशनचे अध्यक्ष सुधीर निंबाळकर, महासचिव संजय इंगळे यांच्यासह इतर पाहुणे मंचावर उपस्थित राहणार आहे.

### या मंडळांचे संघ होणार सहभागी


स्पर्धेत नागपुर शहर पोलिस, विदर्भ युथ क्रीडा मंडळ काटोल, राजापेठ स्पोर्टींग क्लब अमरावती, अनंत क्रीडा मंडळ अकोला, बुलढाणा जिल्हा खो-खो असोसीएशन, वत्सगुल क्रीडा मंडळ वाशीम, विदर्भ क्रीडा मंडळ गडचीरोली, नव महाराष्ट्र क्रीडा मंडळ नागपुर, क्रांती ज्योती क्रीडा मंडळ, चंद्रपूर, छत्रपती संभाजी क्रीडा मंडळ वरोरा, छत्रपती क्रीडा मंडळ नागपुर, तुळजा भवानी क्रीडा मंडळ परतवाडा, विदर्भ क्रीडा मंडळ काटोल, तुळजाई क्रीडा मंडळ खल्लार, शेषस्मृती क्रीडा मंडळ तळवेल, साई युवक क्रीडा मंडळ अमरावती, मराठा क्रीडा मंडळ अमरावती, ह्युमीनीटी क्रीडा मंडळ परतवाडा, तालुका क्रीडा संकुल वरोरा, सहयोग क्रीडा मंडळ हिंगणा, न्यु तुळजाई परतवाडा, फ्लाय क्रीडा मंडळ राळेगाव यासह नव जयहिंद मंडळ यवतमाळ या संघांचे खेळाडु सहभागी होणार आहेत.


# उमरखेड बंदला शिवभक्तांचा उत्स्फूर्त प्रतिसाद !

## आंदोलनकर्त्यांवरील गुन्हे मागे घेण्याची मागणी तीव्र; शहर ठप्प, शांतीपूर्ण वातावरणात बंद यशस्वी

### वादग्रस्त पेट्रोल पंप हटवण्याची एकमुखी मागणी!

जनमाध्यम प्रतिनिधी





उमरखेड : छत्रपती शिवाजी महाराज अश्वारूढ पुतळ्यालगत असलेल्या वादग्रस्त पेट्रोल पंपाच्या लीज मुदतीसह सर्व कायदेशीर अटी संपूनही तो अवैधरित्या सुरू असल्याचा आरोप करत, पंप तात्काळ सील करावा आणि आंदोलनकर्त्यांविरुद्ध दाखल गुन्हे मागे घ्यावेत या मागणीसाठी आज (दि. ४ नोव्हेंबर) उमरखेड शहरात कडकडीत बंद पाळण्यात आला.

या बंदला शिवभक्त, व्यापारी, विविध सामाजिक संघटना, सर्वपक्षीय नेते आणि नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सकाळपासूनच शहरातील सर्व बाजारपेठा, व्यावसायिक आस्थापने, हॉटेल्स, किराणा दुकाने आणि दैनंदिन व्यवहार पूर्णपणे ठप्प राहिले. शहरात शांतता आणि संयमाचे वातावरण असले तरी पोलिसांचा चोख बंदोबस्त पाहायला मिळाला. विशेषत: महात्मा गांधी चौक परिसरात पोलीस बंदोबस्त वाढवण्यात आला होता. बंददरम्यान महात्मा गांधी चौकात आंदोलनकर्त्यांनी शांततेत ठिय्या मांडला तसेच सुरु असलेला या आंदोलन सकाळपासून सायंकाळपर्यंत सुरू होता . काही आंदोलनकर्त्यांनी सांगितले की, "छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या सौंदर्यीकरणास अडथळा ठरणारा हा पेट्रोल पंप लीज संपून तीन महिने उलटले तरीही बेकायदेशीरपणे सुरू ठेवण्यात आला आहे." गेल्या महिनाभरापासून नगरपरिषदेच्या प्रवेशद्वारासमोर समितीच्या सदस्यांनी आमरण उपोषण आणि साखळी उपोषण सुरू ठेवले होते. परंतु, उपविभागीय महसूल अधिकारी यांच्या आदेशाने उपोषण मंडप हटवून पोलिसांनी उपोषणकर्त्यांवर कारवाई केली, त्यांच्यावर गुन्हे दाखल केले व काहींना जेलमध्ये पाठवले. "लोकशाही मार्गाने आंदोलन करणाऱ्यांवर प्रशासनाची हुकूमशाही आम्ही सहन करणार नाही," असा संतप्त सूर आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केला सकाळपासून सुरू असलेल्या या आंदोलनाला एक वेगळाच वळण आला होता या दरम्यान उपविभागीय महसूल अधिकारी व आमदार किसन वानखेडे यांच्यात उपविभागीय अधिकारी कार्यालय येथे बैठकीत तोडगा काढून छत्रपती शिवाजी महाराज अश्वारूढ पुतळ्याला अडथळा निर्माण करणाऱ्या पेट्रोल पंपाचे कॅबिन काढण्याचे ठरवण्यात आले त्यानंतर .उपविभागीय अधिकारी यांनी सदर या आंदोलनाला भेट देऊन आंदोलकांच्या काही मागण्या मान्य केल्या तरीही आंदोलकांनी मागण्या मान्य नसल्याने आंदोलन मात्र आपल्या मागणीवर ठाम असल्याचे दिसून आले.

आंदोलनकर्त्यांचे प्रमुख मागण्या : आंदोलनकर्त्यांवरील सर्व गुन्हे मागे घेऊन त्यांची तात्काळ सुटका करावी. लीज संपलेल्या व अवैधरीत्या सुरू असलेल्या भारत पेट्रोल पंपाला त्वरित सील करावे आंदोलनकर्त्यांवर अमानुष वर्तन करणाऱ्या अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करावी. संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्यासाठी स्वतंत्र एसआयटीची नियुक्ती करावी या मागणीसह आंदोलनांनी तीव्र भूमिका घेतली होती.

प्रशासनाविषयी नाराजी : बंद दरम्यान कोणतीही अनुचित घटना घडली नसली तरी नागरिकांमध्ये प्रशासनाविषयी तीव्र नाराजीचे वातावरण होते.

# बाभुळगाव तालुका डॉक्टर असोसिएशनचे दिवाळी स्नेहमिलन सोहळा संपन्न

जनमाध्यम प्रतिनिधी



बाभुळगाव : तालुका डॉक्टर असोसिएशन व केमिस्ट्र ॲण्ड ड्रगिस्ट असोसिएशन, ओसवाल फॉर्म यांच्या संयुक्त विद्यमानाने दिवाळी स्नेहमिलनाचा कार्यक्रम दिनांक २ नोव्हेंबर रोजी बाभुळगाव येथील मानवता मंदिर येथे संपन्न झाला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ सुभाष सुदलावर, मंचावर उपस्थित तालुका डॉक्टर असोसिएशन चे अध्यक्ष भास्कर गालाट, डॉ. अमोल दिवाणे, केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष अनिल खोडे उपस्थित होते. या कार्यक्रमामध्ये सर्वप्रथम आरोग्याचे देवता धन्वंतरी देवाचे, व राष्ट्रसंत तुकडोजी महाराजाचे पूजन करण्यात आले. ज्येष्ठ डॉक्टर डॉ. गणेश पिसे डॉ. रिकपचंद तातेड डॉ. रमेश महानूर डॉ. आजबराव डाखरे, डॉ महेंद्र बाजपेयी ओसवाल फॉर्म कंपनीचे कटारिया डॉ. स्वप्नील गलाट यांचा एम पी एस सी मार्फत नियुक्त झाल्याबदल यांचा सत्कार करण्यात आला. डॉ. रमेश महानूर, डॉ. रिकापचंद तातेड, डॉ. भास्कर गालाट डॉ. आजबराव डाखरे यांनी मनोगत व्यक्त केले. त्यानंतर मनोरंजनासाठी सूर सरगम चा कार्यक्रम घेण्यात आला. सूत्रसंचालन पद्माकर ठाकरे व आभार प्रदर्शन डॉ. अमोल दिवाणे यांनी मानले. या कार्यक्रमाला डॉ. प्रफुल खडसे, डॉ. नरेंद्र परडके, डॉ. शेख सदाम, डॉ. गौरव पाटेकर, डॉ. निकिता खडसे, डॉ. रूपाली हुले, डॉ. सारिका कापसे, डॉ. आशिष शिरभाते, डॉ. रवी हुले डॉ. अरविंद राऊत, डॉ. वाल्मिम चौधरी, डॉ रमेश तोटे, डॉ. अमोल हजारे, बाभुळगाव तालुक्यातील मेडीकल संचालक संतोष गुप्ता, संतोष वर्मा, मयूर पिसे, रोहनिश फसाटे, सुनील खोडे, सागर जीजकर, सुयोग राऊत, बाभुळगाव नगर पंचायत च्या नगरसेविका वृंदा पिसे आदी मान्यवर उपस्थित होते.

# कारेगांव (रामपुर) ग्रामपंचायत गावातील विविध समस्यांबाबत इंद्रनिल नाईक यांना निवेदन

जनमाध्यम प्रतिनिधी



पांढरकवडा - कारेगांव (रामपुर) ग्रामपंचायत गावातील विविध समस्यांबाबत इंद्रनिलजी नाईक (राज्यमंत्री सा.बा. आदिवासी विकास, पर्यटन, जलसंधारण) यांना विजय फनिधर खापर्डे,रा.रामपुर (कारेगांव) अध्यक्ष तंटामुक्त समिती व राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी (अजित पवार गट) तालुका सरचिटणिस यांनी गावातील विविध समस्यांबाबत निवेदन दिले आहे. रामपुर (कारेगांव) हे गाव आदिवासी क्षेत्रातील पेसा अंतर्गत गटग्रामपंचायत असुन गावात विविध समस्या आहे.रामपुर हे गाव चंद्रपुर-यवतमाळ राज्य महामार्ग रोडवर असून कारेगांव हे गाव रामपुर वरून राज्यमार्ग रोडपासून ०४ ते ०५ कि.मी. आतमध्ये जंगला लगत आहे.रामपुर हे गाव ५०० लोक संख्या असलेले गाव असुन येथे स्वातंत्र काळापुर्वी पासुन ते आजपर्यंत स्मशान व दफनभूमी नसुन त्यामुळे रामपुर ह्या गावातील नागरीकांची गैरसोय होत आहे.कारण गावात कोणी मयत झाल्यास कुठे तरी कोणाच्याही शेतातील धुऱ्यावर किंवा नाल्यावर काट्या,गोटयातुन जाऊन अंतविधी व दफन विधी करण्यात येत आहे.

त्यामुळे शेत मालक याने विरोध व नकार दिल्यास तंटे व झगडे निर्माण होत आहे.तरी रामपुर गावा लगत सरकारी कृषी विभागाची ६० एकर जमिन अनेक वर्षापासून पडीत आहे तरी त्या जमिनीतुन स्मशान व दफन भुमीसाठी जागा उपलब्ध करून देण्यात यावी.रामपुर येथे शाळेची इमारत जिर्ण झाली आहे व विद्यार्थ्यांना क्रीडागंण साठी जागा नाही.

तरी इमारतीसाठी व क्रीडांगणासाठी जागा उपलब्ध करून देण्यात यावी.

गावातील नाल्या व रस्तेसाठी निधी उपलब्ध करून देण्यात यावे.कारेगांव रामपुर येथील शेतकऱ्यांना शेतात जाण्या-येण्याकरीता शेत पांदन रस्त्यासाठी निधी उपलब्ध करून देण्यात यावे.असे निवेदन देण्यात आले असून त्यावेळीस राष्ट्रवादी कांग्रेस पार्टी (अजित पवार गट) तालुका अध्यक्ष स्वप्नील उर्फ सोनु उप्पलवार सह पदाधिकाऱ्यांसह आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

## वेचक



### भीमनगर समोर असलेल्या गतीरोधकामुळे अपघात होत असल्यामुळे उपाययोजना करा!

आजाद समाज पार्टी व भीम आर्मीचे बांधकाम विभागाला निवेदन

पुसद : श्रीरामपूर ते कारला जाणाऱ्या मुख्य मार्गावरील भीमनगर पुसद राम मंदिरासमोरील गतीरोधकावर रंगरंगोटी व सूचना फलक नसल्याने वारंवार अपघात घडत असून अनेक वाहनचालक, नागरिक जखमी झाले आहेत. या ठिकाणी तातडीने परावर्तक रंग (reflective paint) लावावा तसेच "पुढे गतीरोधक आहे" असा सूचना फलक बसवावा, अशी मागणी आजाद समाज पार्टी (कां.) व भीम आर्मी यांच्या वतीने करण्यात आली आहे. या संदर्भात आजाद समाज पार्टी (कां.) युवा मोर्चा यवतमाळ जिल्हाध्यक्ष राजकुमार भगत व भीम आर्मी पुसद तालुका उपाध्यक्ष वैभव सूर्यवंशी यांनी बांधकाम उपविभागीय अभियंता व कार्यकारी अभियंता पुसद यांना निवेदन दिले. गतीरोधकावर योग्य चिन्हे किंवा रंगरंगोटी नसल्याने विशेषतः रात्रीच्या वेळी वाहनचालकांना तो वेळेवर दिसत नाही, परिणामी अपघातांची मालिका सुरू आहे. प्रशासनाने तातडीने कार्यवाही करून नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी उपाययोजना कराव्यात अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. यावेळी राजकुमार भगत,वैभव सूर्यवंशी,विशाल डाके,राहुल धुळे, अश्विन कांबळे, करण खंदारे, प्रेम साळवे इत्यादी कार्यकर्ते उपस्थित होते.

### जिल्हास्तरीय युवा महोत्सव युवक-युवतींनी सहभागी होण्याचे आवाहन

यवतमाळ : युवकांच्या अंगी दडलेल्या कलागुणांना वाव देण्यासाठी तसेच राष्ट्रीय एकात्मतेला चालना देण्यासाठी दरवर्षीप्रमाणे यावर्षीही जिल्हास्तरीय युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात येत आहे. केंद्र शासनाच्या वतीने आयोजित होणारा हा महोत्सव दि. 7 नोव्हेंबर रोजी यवतमाळ येथे पार पडणार आहे. या महोत्सवात वक्तृत्व स्पर्धा, कथालेखन, चित्रकला, लोकनृत्य (सांघिक), लोकगीत (सांघिक), कविता लेखन, नवोपक्रम (विज्ञान प्रदर्शन) अशा विविध कलाप्रकारांचा समावेश करण्यात आला आहे. वयोगट 15 ते 29 वर्षांतील युवक-युवतींना या स्पर्धांमध्ये सहभागी होता येणार आहे. सहभागी स्पर्धकांचे वय 12 जानेवारी 2025 रोजी 15 ते 29 वर्षे पूर्ण असणे आवश्यक आहे. त्यासाठी जन्मतारखेचा दाखला किंवा आधारकार्डाची सत्यप्रत सोबत जोडणे बंधनकारक आहे. स्पर्धकांनी सादरीकरणासाठी लागणारे साहित्य स्वतःकडे ठेवावे, मात्र स्टेज व विद्युत व्यवस्था संयोजन समितीमार्फत पुरविली जाईल. स्पर्धेदरम्यान असभ्य वर्तन अथवा धार्मिक व राजकीय भावना दुखावणारे सादरीकरण आढळल्यास संबंधित स्पर्धक अपात्र ठरविण्याचा अधिकार संयोजन समितीकडे राहील. तसेच पंचांचा निर्णय अंतिम व बंधनकारक राहील, याची सर्व स्पर्धकांनी नोंद घ्यावी. स्पर्धेसाठी अर्ज स्वीकारण्याची अंतिम तारीख 6 नोव्हेंबर पर्यंत सायं. 4 वाजेपर्यंत असून, अर्ज जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, यवतमाळ येथे स्वीकारले जातील. जिल्हा क्रीडा अधिकारी घनश्याम राठोड यांनी युवक-युवतींना या जिल्हास्तरीय युवा महोत्सवात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

### अमृत संस्थेकडून परीक्षा शुल्क परत मिळण्याच्या योजनेची १५ नोव्हेंबर पर्यंत मुदतवाढ

यवतमाळ : महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या माध्यमातून घेण्यात येणाऱ्या शासकीय संगणक टंकलेखन जी सी सी-टी बी सी) व ऑनलाईन लघुलेखन परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या अमृत संस्थेच्या लक्षित गटातील विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क परत देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या परताव्यासाठी अर्ज सादर करण्याची मुदत १५ नोव्हेंबर २०२५ पर्यंत वाढविण्यात आली आहे. अर्जदारांनी www.mahaamrut.org.in या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज सादर करून आवश्यक कागदपत्रांची हार्ड कॉपी अमृतच्या जिल्हा कार्यालय, यवतमाळ येथे सादर करणे आवश्यक आहे. अमृतच्या लक्षित गटामध्ये आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील ब्राह्मण, बनिया, राजपुरोहित, कम्मा,कायस्थ, नायर, नायडू पाटीदार,बंगाली, पटेल,येलमार, मारवाडी, ठाकूर, जाट, सिंधी, राजपूत, भूमिहार इत्यादी जातींचा समावेश आहे. अधिक माहितीसाठी ९११२२२७६३३ या क्रमांकवर संर्पक साधावा.

# गौळ (खुर्द) येथील माजी सैनिक अद्यापही न्यायाच्या प्रतीक्षेत!

## केंद्रीय संरक्षण तथा गृहमंत्र्यांकडे मांडली हकिकत ;ग्रा.प.सचिवाची अरेरावी

जनमाध्यम प्रतिनिधी



पुसद : देशात एकीकडे 'जय जवान, जय किसान' असा मोठ्या उत्साहात नारा दिल्या जातो. त्यांचे गुणगान केल्या जाते. परंतु कठीण समयी याच जवानांवर किंवा किसानांवर वाईट वेळ येते तेंव्हा आपण त्यांना प्रामाणिकपणे मदत करतो का ! असा प्रश्न केला तर बहुतांशी नकारात्मक उत्तर येते, असाचएक प्रसंग गौळ खुर्द ता. पुसद येथील एका जवानांवर आलेला आहे.

रंजित नंदूसिंग चव्हाण असे त्या भारतीय सैनिकांचे नाव असून तो सध्या पानागड ता. कांगसा जी. वर्धमान (पश्चिम बंगाल) येथे कर्तव्य बजावत आहे. त्याची व त्याच्या परिवाराची मिळून गौळ (खुर्द) येथे मालमत्ता क्र. ३५३ क्षेत्रफळ एकूण ७१.९२ चौ. मी. जागा आहे. परंतु सदर जागेवर त्यांचे अनुपस्थितीत किरण अशोक जाधव व देवानंद सवाई राठोड रा. गौळ खुर्द या व्यक्तींनी बेकायदेशीपणे कब्जा केलेला आहे. या संदर्भात ग्रामसेवक यांना बोलले असता त्यांनी कोण तुम्ही, कसले सैनिक, कोणत्या देशाची सेवा करता, हे आम्हाला माहीत नाही असे अपमानजनक बोलून मानहानी केल्याचा जवानांचा आरोप आहे. तसेच सरपंच उपसरपंच देखील जबाबदार आहेत असं त्यांनी निवेदनात नमूद केले आहे. या प्रकरणी जुलै महिन्यात गौळ ग्रा.पं. कार्यालयात रंजित चव्हाण यांनी उपोषण आरंभले. होते. परंतु बीडीओ यांनी दोषींवर कारवाई करण्याचे लेखी अश्वासन दिल्या नंतर उपोषण मागे घेतले होते. मात्र आता या घटनेला तीन महिने उलटले तरी त्या सैनिकाला न्याय मिळालेला नाही. त्यामुळे सैनिकाने आता थेट संरक्षण मंत्री राजनाथसिंह, गृहमंत्री अमित शहा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, एकनाथ शिंदे यांचेसह इतर मंत्री व सर्व प्रशासकीय अधिकाऱ्यांना निवेदन देऊन न्यायाची मागणी केली आहे. न्याय न मिळाल्यास १२ नोव्हे पासून ग्रा.पं. कार्यालय येथे भारतीय सेनेच्या वर्दीत उपोषण सुरू करणार, असा इशारा दिला आहे.

# "अभिव्यक्ती स्वातंत्र्यावरील आघात" : असिम सरोदे यांच्या समर्थनार्थ शेतकरी चळवळीचे जिल्हाधिका-यांमार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन

जनमाध्यम प्रतिनिधी



यवतमाळ : वकील असिम सरोदे यांच्या वकिलीची सनद रद्द करण्याच्या निर्णयाच्या निषेधार्थ आज दिनांक ४ नोव्हेंबर रोजी शेतकरी चळवळ, यवतमाळ यांच्या वतीने जिल्हाधिकारी यवतमाळ यांच्या मार्फत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यांना निवेदन सादर करण्यात आले.

महाराष्ट्र बार कौन्सिलने ३ नोव्हेंबर रोजी सरोदे यांच्या वकिलीची सनद तीन महिन्यांसाठी रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. हा निर्णय त्यांनी एका सार्वजनिक कार्यक्रमात केलेल्या काही वक्तव्यांच्या पार्श्वभूमीवर घेतल्याचे नमूद केले गेले आहे. तथापि, शेतकरी चळवळीच्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की असिम सरोदे हे सामाजिक, जनहित, पर्यावरण, महिला व शेतकरी हक्कांच्या प्रश्नांवर सातत्याने लढा देणारे कार्यकर्ते असून त्यांच्यावरील कारवाई ही पक्षपाती आणि अन्याय्य असल्याचा आरोप करण्यात आला आहे. निवेदनात पुढे म्हटले आहे की,असिम सरोदे यांच्या प्रकरणाची निष्पक्ष व तटस्थ चौकशी करण्यात यावी. त्यांची वकिलीची सनद तातडीने पुनर्स्थापित करण्यात यावी.भविष्यात अशा प्रकारचे निर्णय घेताना संबंधित व्यक्तीस न्याय्य संधी देण्यात यावी.

या प्रसंगी असिम सरोदे यांचे बंधू अमित सरोदे, शेतकरी चळवळीचे प्रमुख शेतकरी आंदोलक प्रा. पंढरी पाठे, तसेच युवा कार्यकर्ते शुभम शेंडे उपस्थित होते. प्रा. पंढरी पाठे यांनी निवेदनावेळी कळविले की "असिम सरोदे यांच्यावर झालेली कारवाई ही केवळ एका व्यक्तीवरील अन्याय नाही, तर ती अभिव्यक्ती स्वातंत्र्यावरील आघात आहे. विचार मांडणाऱ्यांचा आवाज दाबून समाज बदलत नाही; उलट तो अधिक जागरूक होतो. आम्ही न्याय, संविधान आणि लोकशाहीच्या रक्षणासाठी असिम सरोदे यांच्या पाठीशी ठामपणे उभे आहोत.

# बाभूळगावात नाफेड खरेदी सुरु करण्याकरिता तहसीलदारांना निवेदन

जनमाध्यम प्रतिनिधी



बाभूळगाव : सोयाबीनला खुल्या बाजारात कमी दर मिळत आहे. यामध्ये ओल्या दुष्काळात सापडलेल्या शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत आहे. त्यामुळे नाफेडची खरेदी सुरू करावी, अन्यथा ६ नोव्हेंबरपासून बेमुदत उपोषणाला बसण्याचा इशारा देण्यात आला. यासंदर्भात तहसीलदार मीरा पागोरे यांना निवेदन देण्यात आले.

सततच्या पावसामुळे सोयाबीनच्या शेंगा भरल्या नाही. सरासरी एकरी दोन ते पाच पोते उतारा आला आहे. त्यातही खुल्या बाजारात १२०० ते १५०० रुपये फरकाचा फटका शेतकऱ्यांना सहन करावा लागत आहे. नाफेडचे केंद्र यवतमाळ जिल्ह्यात कळंब, राळेगाव, यवतमाळ येथे ३१ ऑक्टोबरपासून सुरू आहे. मात्र, बाभूळगाव येथे सन २०२५-२६ची नोंदणी संबंधित यंत्रणा आणि संबंधित अधिकारी यांच्या चुकीमुळे सुरू झालेली नाही. नाफेडची खरेदी सुरू करून शेतकऱ्यांना दिलासा देण्याची गरज आहे. निवेदन देताना राजकुमार पत्रे, डॉ. रमेश महानूर, पांडुरंग लांडगे, गजानन अजमिरे, प्रदीप नांदुरकर, विनायक हांडे, भानुदास बावणे, राहुल शिरभाते, सुहास येडे, देविदास पांडे, गजानन कडुकर, दशरथ जाधव, देवानंद चुके, संजय महाजन, प्रवीण डेहनकर, प्रशांत टोने, संजय ठाकरे, गजानन वाघ, वसंतराव दरने, रोहित टावरी, सुनील मते आदी उपस्थित होते.

# प्रलंबित शिष्यवृत्ती अर्ज तत्काळ निकाली काढावेत इतर मागास बहुजन कल्याण विभाग यांचे महाविद्यालयांना आवाहन

जनमाध्यम प्रतिनिधी

यवतमाळ : इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या वतीने जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयांना निर्देश देण्यात आले आहेत की, भारत सरकारच्या मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क योजनेंतर्गत प्रलंबित असलेले सर्व अर्ज तातडीने निकाली काढावेत.

जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क मंजुरीसाठीचे अर्ज मागील काही वर्षांपासून प्रलंबित आहेत. सदर अर्ज वर्षनिहाय पुढीलप्रमाणे प्रलंबित आहेत. २०१९-२०२० : १८२ अर्ज, २०२०-२०२१ : २१८ अर्ज,२०२१-२०२२ : २१९ अर्ज,२०२२-२०२३ : २८२ अर्ज,२०२३-२०२४ : २७४ अर्ज,२०२४-२०२५ : १५५६ अर्ज,२०२५-२०२६ : ५८५० अर्ज,प्रलंबित आहे. विभागाने स्पष्ट केले आहे की, संबंधित सर्व पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज मंजुरीसाठी महाविद्यालयांनी त्वरीत सादर करावेत. अन्यथा विद्यार्थी शिष्यवृत्तीच्या लाभापासून वंचित राहिल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित महाविद्यालयाची राहील. तसेच विद्यार्थ्यांकडून कोणत्याही प्रकारचे शुल्क घेता येणार नाही, याचीही सूचना देण्यात आली आहे. महाविद्यालयांनी प्रलंबित अर्ज निकाली काढण्यासाठी विद्यार्थ्यांना योग्य सूचना देण्यासाठी शाळांमध्ये नोटिसा प्रसिद्ध करणे, सूचना फलकावर माहिती लावणे, विद्यार्थ्यांचे व्हॉट्सॲप गट तयार करणे आणि नोडल अधिकारी (समन्वय अधिकारी) नेमणे या उपाययोजना तातडीने राबविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

# ज्यांना दिली नगर सेवक पदाची उमेदवारी, आले निवडुण नेत्याच्या जीवावरी

जनमाध्यम प्रतिनिधी



दिग्रस : दिनांक 04/11/2025 रोजी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीचे बिगुल वाजले. आचार संहिता लागु झाली. येत्या दिड महिन्यामध्ये नविन सत्ता स्थापना होईल. यावेळेसची निवडणुकी काही सोपी नाही. वाढलेले मतदार, तुटलेला प्रभाग झालेली घुसखोरी, नेत्याशी केलेली गद्दारी हा विषय फार महत्वाचा असणार आहे. बलाढ्य उमेदवार सुध्दा या वेळेस घाम गाळतांना सुध्दा दिसत आहेत. काही प्रभागा मध्ये चुरशीची लढत दिसण्याची चिन्हे आहेत. विधानसभे मध्ये जसा गद्दारीचा विषय जसा चर्चेचा विषय ठरला होता तसाच विषय यावेळेस स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकी मध्ये सुध्दा नागरीकांमध्ये चर्चीला जात आहे. ज्यांना कोणी ओळखत सुध्दा नव्हते अश्या लोकांना त्या नेत्याने पक्षाची उमेदवारी दिली, निवडुण आणले,विविध पदे देऊन त्यांच्यावर विश्वास दाखविला आज ते स्वतःच्या नावापुढे माजी हा शब्द लावुन मिरवतात, अश्यांनी त्या नेत्याशी गद्दारी करुन त्या नेत्यालाच गद्दार म्हणुन हिनविले. परंतु तोच शब्द आज त्या युवा नेत्यांवर उलटला असल्याची जोरात चर्चा सुध्दा नागरीकांमध्ये सुरु आहे. हेच ते नेते आहेत जे मतदारांच्या जीवावर निवडुण आले आणि ते त्या मतदारांना म्हणतात की, तुम्ही मला मतदान दिले नाही, मी तुमच्या भरवश्यावर निवडुण आलो नाही अशी चर्चा सध्या नागरीकांमध्ये सुरू आहे. ते आज म्हणतील हे काम आम्ही केले परंतु ते कधीच सांगणार नाही की, त्याला निधी हा त्याच्या पुर्वाश्रमीच्या नेत्याने दिला आहे. खरोखर अशो लोक जनतेला मुर्ख समजतात का ? जनता खुप हुशार झाली आहे.

## संक्षिप्त



### श्रमदान स्वच्छता अभियान

**मोर्शी-** धार्मिक स्थळाची स्वच्छता व स्वच्छतेचा संदेश तालुक्यातील दुर्गवाडा ग्रामपंचायत तर्फे मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियाना अंतर्गत श्रमदान स्वच्छता अभियान स्वच्छतेचा संदेश सर्व परिसर स्वच्छ करून गावांमध्ये रंगरंगोटी व रांगोळीनी सर्व गावातील परिसर सजविण्यात आला. स्वच्छते संदर्भात जनजागृती वारकरी दिंडी व शोभायात्रा विठ्ठल रुक्मिणी देवस्थान येथून सुरू करण्यात आली.दिंडी यात्रेला सुरुवात करण्यात आली व सर्व गावांमध्ये महापुरुषाचे व सर्व संतांचे फोटोचे पूजन करून सर्व परिसरामध्ये एक धार्मिकतेचे वातावरण तयार झाले या धार्मिकतेतून सर्व गावकऱ्यांना स्वच्छतेची जाणीव करून दिली. आपले गाव आपला परिसर सार्वजनिक मंदिरे नेहमी स्वच्छ करू अशी संकल्पना करून यापुढे सुद्धा अशीच परंपरा कायम सुरू ठेवू गाव विकासाला हातभार लावू या कार्यक्रमाला प्रामुख्याने उपस्थित होते.सरपंच,उपसरपंच, सर्व सदस्य. ग्रा.प. अधिकारी. ग्रा.प.कर्मचारी पोलीस पाटील अंगणवाडी सेविका रोजगार सेवक बँक सखी. गावातील सर्व महिला व पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### राष्ट्रसंतांच्या पादुका व ग्रामगीता ग्रंथाची शोभायात्रा

**काटपूर-** येथे कार्तिक चतुर्मास समाप्ती व वंदनीय श्री. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचा ५७ वा पुण्यतिथी महोत्सव काळा मारुती संस्थान व गुरुदेव सेवा मंडळ काटपूरममदापूर यांच्या समन्वयाने साजरा करण्यात आला. येथे पुरातन काळापासून काळा मारुती संस्थान येथे श्री.गुरुदेव प्रार्थना सेवा मंडळातर्फे कार्तिक चातुर्मासात काकडा आरतीचे आयोजन करण्यात येते. वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या चरण पादुका व ग्रामगीता ग्रंथाची भव्य शोभायात्रा संपूर्ण गावातून काढण्यात आली. यावेळी गुरुदेव सेवा मंडळाचे सर्व कार्यकर्ते, महिला मंडळ व बालगोपाल यांनी टाळ-मृदुंगाच्या गजरात संपूर्ण गावातुन राष्ट्रसंताचा जयघोष करत शोभा यात्रा काढण्यात आला. शोभायात्रेमध्ये माजी पंचायत समिती सभापती सोनाली नवले यांनी उपस्थिती महिलांसोबत फुगडी खेळून स्थानिक महिलांचा उत्साह वाढविला. गुरुदेव सेवा मंडळाचे अध्यक्ष अशोक राजस व मंडळाचे सर्व सदस्य यांच्या प्रमुख उपस्थितीत सप्ताहात समाज प्रबोधन, किर्तन, भजन, तसेच विविध कार्यक्रम साजरे करण्यात आले . सोमवारला दुपारी हभप पराडे महाराज (नेरपिंगळाई) यांचे काल्याचे किर्तन घेऊन भव्य महाप्रसादाचे आयोजन करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.



### राजू गजभिये यांचा सत्कार

**पूर्णानगर-** बहुजन समाज पार्टी तिवसा विधानसभा क्षेत्राच्या वतीने सुकळी (रसुलपूर) गावचे सरपंच तथा अमरावती जिल्हा प्रभारी राजू गजभिये यांचा भव्य नागरी सत्कार सोहळा शनिवार, १ नोव्हेंबर रोजी सायं. ६.०० वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, सुकळी येथे मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाला महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष ॲड. सुनिल डोंगरे हे मुख्य मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते तर प्रमुख उपस्थितीत म्हणून महाराष्ट्र प्रदेश प्रभारी मुकुंद सोनोने, पश्चिम विदर्भ झोन प्रभारी राजेंद्र कांबळे, झोन प्रभारी पंडीत बोर्डे, अमरावती जिल्हा प्रभारी दिपक पाटील, अनंता लांजेवार, रामभाऊ पाटील, जिल्हा उपाध्यक्ष भगवान लोणारे, जिल्हा महासचिव वसंत धंदर, तसेच अमरावती शहर अध्यक्ष विनय पहाडन यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक तिवसा विधानसभा अध्यक्ष जयंत इंगळे यांनी केले. या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने कार्यकर्त्यांची उपस्थिती होती. उपस्थित सर्व मान्यवरांनी राजु गजभिये यांच्या कार्याचे कौतुक करून पुढील राजकीय वाटचाल यशस्वीतेसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध गायक दीपक इंगळे यांचा भव्य भीमगांचा बहारदार कार्यक्रम करण्यात आला.

### डॉ.झाकिर हुसेन योजनेसाठी १४ नोव्हेंबरपर्यंत अर्ज करावे

**अमरावती-** अल्पसंख्याक विकास विभागातर्फे डॉ. झाकिर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजनेत सन २०२५-२६ या वर्षाकरिता अर्ज मागविण्यात येत आहे. इच्छुकांनी विहीत नमुन्यात अर्ज आवश्यक कागदपत्रे जोडून जिल्हाधिकारी कार्यालयातील संवाद शाखा येथील अल्पसंख्यांक कक्षात दि. १४ नोव्हेंबरपर्यंत प्रस्ताव २ प्रतीत सादर करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे केले आहे. शिक्षणासाठी हिंदी/इंग्रजी/मराठी व उर्दू यार्पकी एका माध्यमाची निवड करुन त्यानुसार शिक्षकांची नेमणूक करणे आवश्यक आहे. ग्रंथा लयासाठी तसेच शैक्षणिक साहित्यासाठी फक्त पहिल्यांदा रुपये ५० हजार व तद्नंतर प्रती वर्षी रुपये ५ हजार अनुदान देय राहील. शासन निर्णयात नमूद पायाभूत सुविधांसाठी रुपये १० लाख अनुदान देय आहे. ज्या मदरशांना एम्पस for Providing Quality Education in Madarsa (SPQEM) या केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत लाभ मिळाला आहे, अशा मदरशांना योजनेचा लाभ अनुज्ञेय राहणार नाही. इच्छुक मदरशांनी विहीत नमुन्यात अर्ज जिल्हाधिकारी कार्यालयातील संवाद शाखा येथील अल्पसंख्यांक कक्षात १४ नोव्हेंबरपर्यंत प्रस्ताव २ प्रतीत कार्यालयीन वेळेत सादर करावा. विहित मुदतीनंतर प्राप्त झालेले प्रस्ताव ग्राह्य धरले जाणार नाहीत. आवश्यक कागदपत्रांची यादी http://mdd.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

# दुर्गम भागातील रस्त्यांबाबत तातडीने उपाययोजनाः जिल्हाधिकारी

**अमरावती/का.प्र.**

खुटीया, एकताई, सिमोरी, हातरू येथील रस्ते, वीज, पुल आदींच्या व्यवस्थेसाठी तातडीने उपाययोजना करण्यात येतील. प्रामुख्याने या भागातील रस्त्यांचा प्रश्न तातडीने निकाली काढण्यासाठी रस्त्यांचे अंदाजपत्रक सादर करावेत, असे निर्देश जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिले.



मेळघाटातील नागरिकांनी विविध मागण्यासंदर्भात जिल्हाधिकारी यांना निवेदन सादर केले होते. त्यानुषंगाने मागण्यासंदर्भात गावातील नागरिकांशी आज जिल्हाधिकारी कार्यालयात चर्चा करण्यात आली. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर, उपवनसंरक्षक अर्जूना के. आर., किर्ती जमदाडे यांच्यासह गावातील नागरिक उपस्थित होते.

जिल्हाधिकारी येरेकर म्हणाले, कुटीदा ते सिंभोरी आणि सोमिथा ते कुटीदा या रस्त्यांचे काम प्राधान्याने हाती घेण्यात येणार आहे. यासाठी आवश्यक असणारे अंदाजपत्रक तातडीने तयार करण्यात येईल. या रस्त्यांची कामे रोजगार हमी योजनेतून करण्याची शक्यता पडताळून पाहता येईल. मेळघाटातील हातरू ते करंजखेड मार्गाचा संपर्क तुटत असल्याने याबाबतही योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

पुलाच्या कामांना सुमारे १५ कोटींचा निधी लागणार आहे. त्यामुळे पुलाच्या बांधकामासाठी शासनस्तरावर मागणी करण्यात येणार आहे. ही कामे व्हावीत, यासाठी पाठपुरावा करण्यात येईल.

विजेचा प्रश्न सोडविण्यासाठी जरिदा उपकेंद्राचा प्रश्न मार्गी लागला आहे. येत्या काळात २२ गावातील विजेचा प्रश्न कायमस्वरूपी निकाली निघणार आहे. विजेच्या समस्येमुळे मोबाईलचे नेटवर्क राहत नाही. याबाबत विजेची सोय असणाऱ्या ठिकाणी नेटवर्क राहण्यासाठी सूचना देण्यात येतील. आदिवासी क्षेत्रातील मक्याची खरेदी आदिवासी विभागाकडून करण्यात येते. ही खरेदी सुरू करावी, यासाठी संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करण्यात येतील. तसेच नागरिकांच्या रस्ते, वीज, पुलाच्या मागण्या पूर्ण करण्यासाठी कालावधी लागणार आहे. ही कामे होण्यासाठी शासनस्तरावर तातडीने कार्यवाही करण्यात येणार असल्याचे येरेकर यांनी सांगितले.

## समाजशास्त्रज्ञ स्व.डॉ.एम.आर.देशमुख स्मृतीप्रित्यर्थ शनिवारी जिल्हास्तरीय फिरता चषक वकृत्व स्पर्धा

**अमरावती/ प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास साधण्यासाठी आणि व्यक्तीमत्व विकास साधण्यासाठी वकृत्व ही एक कला आहे. या कलेचा विकास व्हावा या हेतूने एज्युकेशन सोसायटी बेलोरा व्दारा संचालित चांदूर बाजार तालुक्यातील कारंजा बहिरम अंर्तगत येणाऱ्या बोदड येथे समाजशास्त्रज्ञ स्व. डॉ.एम. आर. देशमुख स्मृती प्रित्यर्थ जिल्हास्तरीय फिरता चषक वकृत्व स्पर्धा-२०२५चे आयोजन शनिवार, ८ नोव्हेंबर रोजी करण्यात आले आहे.



या स्पर्धेचा विषय विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासाकरिता खेळाची उपयुक्तता, मी शेतकरी बोलतोयं, मोबाईल हटवा बालपण वाचवा, राष्ट्रनिर्माणासाठी युवकांची भूमिका, पर्यावरण संरक्षण व आव्हाने हे आहेत. ही स्पर्धा वर्ग ७ ते १० च्या विद्यार्थ्यासाठी आयोजित करण्यात आली असून स्पर्धक मराठी, हिंदी, इंग्रजी या पैकी कोणत्याही भाषेचा उपयोग करू शकते. स्पर्धेसाठी प्रत्येक स्पर्धकाला पाच मिनिटाचा अवधी दिल्या जाईल. स्पर्धेचा अंतिम निर्णय परीक्षकांचा असेल, शाळेने कितीही स्पर्धक पाठविण्याचे बंधन राहणार नाही. विजेत्यांना फिरता चषक देण्यात येणार आहेत. पारितोषिक प्राप्त शाळेला मिळालेला फिरता चषक सुस्थितीत परत करण्यात यावा ही अट ठेवण्यात आली आहे. स्पर्धेचे प्रथम पारितोषिक तीन हजार रुपये व फिरता चषक, ट्रॉफी, द्वितीय पारितोषिक दोन हजार रुपये व ट्रॉफी, तृतिय पारितोषिक एक हजार रुपये ट्रॉफी व प्रोत्साहनपर बक्षिस ५००रुपये व ट्रॉफी असे देण्यात येईल. सहभागी विद्यार्थ्यांना प्रशस्तिपत्र देऊन गौरविण्यात येईल. याबाबत अधिक माहितीकरिता जी.एन. धोटे मो. ७६६६९७९००७, जी.के. कोल्हे मो. ९९२३९१०१०९ या वर संपर्क साधावा असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## धुक्यामुळे मुंबई विमानफेरी रद्द!

**अमरावती/का.प्र.**

वातावरणात अचानक निर्माण झालेल्या बदलावामुळे अमरावती विमानतळावरील विमानसेवेलाही फटका बसला. सोमवारी मुंबई-अमरावती-मुंबई ही फेरी वेळेवर रद्द करावी लागल्याने मुंबई तसेच अमरावती येथील प्रवाशांना चांगलाच मनस्ताप सहन करावा लागला. विमान रद्द झाल्याची स्पष्ट सूचना कंपनीकडून देण्यात आलेली नव्हती. त्यामुळे प्रवाशीही चांगलेच संतापले होते. गेल्या २६ ऑक्टोबरपासून मुंबई अमरावती-मुंबई विमानसेवेच्या वेळेत बदल झाला आहे. प्रवाशांच्या सोईनुसार हा बदल झाल्याने चांगला प्रतिसाद मिळत आहे. विमानसेवा आता रविवार, सोमवार, बुधवार आणि शुक्रवार या दिवशी मुंबई येथून सकाळी ७.३० वाजता विमान उड्डाण करते तर सकाळी ८.५० वाजता अमरावती विमानतळावर पोहोचते. परतीचे विमान लगेच ९.१५ वाजता मुंबईकडे झेपावत असून, सकाळी १०.३० वाजता मुंबई विमानतळावर पोहोचते. अलायन्स एअर कंपनीने केलेल्या या बदलामुळे प्रवाशांची संख्याही वाढली आहे; मात्र सोमवारी सकाळी अमरावतीकडे निघालेले प्रवाशी मुंबई विमानतळावर पोहोचले.

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अंतिम मतदार याद्या प्रसिद्ध

### १० नोव्हेंबर दरम्यान आचार संहिता लागू होण्याची शक्यता

**चांदूरबाजार/ वार्ताहर**

बहुप्रतिक्षित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वजानिक निवडणूका,आता लवकरच लागण्याची शक्यता दिसून येत आहे.तीन ते चार वर्षांपासून आपल्या उमेदवारीचे बाशिंग बांधलेल्याना,सध्या प्रतीक्षा आहे ती निवडणूक घोषणेची.कारण नगर परिषद तथा जिल्हा परिषद व पंचायत समिती यांच्या अंतिम मतदार याद्या नुकत्याच प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत.परिणामी इच्छुकांची व पक्षाच्या नेत्यांची आपल्या आपल्या क्षेत्रात, उमेदवारीचा कानोसा घेण्यासाठी धावपळ सुरू झाली आहे.

नगर परिषदेची अंतिम मतदार यादी,३१ ऑक्टोबरला प्रसिध्द करण्यात आली.तर जिल्हापरिषद व पंचायत समितीची,अंतिम मतदार यादी ३ नोव्हेंबरला प्रशिध्द झाली.त्यामुळे आधी निवडणूक कोणती होणार.याच्या चर्चेचे गुऱ्हाळ सर्व पक्षात चालु आहे.काहींच्या मते आधी नगर परिषद, तर काहींच्या मते दोन्ही निवडणूका सोबतच घोषीत होणार.असे वेगवेगळे कयास बांधले जात असलेली तरी तीन ते चार वर्षांनंतर, दोन्ही निवडणूका होत असल्याने ग्रामीण व शहरी भागात निवडणूकीची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.



जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या गट व गण निहाय, अंतिम मतदार याद्या ९ नोव्हेंबरला प्रसिद्ध होणार आहेत. त्यानंतर निवडणूकीची घोषणा होईल. असा अंदाज काही राजकीय जाणकारांकडून वर्तविली जात आहे. त्यानुसार १० नोव्हेंबरच्या दरम्यान निवडणुकीची अधिकृत घोषणा होऊन,त्याच क्षणा पासून आचार संहिता लागू होईल. असा अंदाज राजकीय व प्रशासकीय क्षेत्रात वर्तविला जात आहे. असे असले हा सर्व अंदाज आहे. अखेर निवडणूकीचा सर्व काही अधिकार,राज्य निवडणूक आयोगाचेच अखत्यारीत आहे. निवडणूकीचा फड गाजविणाऱ्यांच्या हाती, सध्या तरी फक्त प्रतिक्षाच आहे.

## ३६ केंद्रांवर होणार टीईटी परीक्षा

**अमरावती-** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या वतीने आगामी २३ नोव्हेंबरला शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) घेतली जाणार आहे. ९ ऑक्टोबरच्या मुदतीत जिल्हात ९ हजार ६२५ उमेदवारांनी अर्ज केले आहेत. ३६ केंद्रांवर ही परीक्षा होणार आहे. गतवर्षीच्या तुलनेत यंदा टीईटीसाठी अर्ज अधिक आहेत. २०१३ पासून ही परीक्षा बंधनकारक करण्यात आली आहे. पण आता टीईटीची अट नसतानाही आता आम्ही ही परीक्षा का द्यायची असा प्रश्न शिक्षकांनी उपस्थित केला आहे. त्यावर शिक्षक संघटनांनी मुख्यमंत्र्यांसह सर्वच वरिष्ठ अधिकाऱ्यांना आपल्या मागणीचे निवेदन दिले आहेत.

## टीईटी निर्णयाविरोधात रविवारी मूक मोर्चा

**अमरावती/ का.प्र.**

शिक्षक पात्रता परीक्षा टीईटीसंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयामुळे राज्यातील प्राथमिक शिक्षकांचे भवितव्य अंधारात सापडल्याची भीती निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर शिक्षकांना संरक्षण देण्यासाठी राज्य सरकारच्यावतीने सर्वोच्च न्यायालयात पुनर्विलोकन याचिका दाखल करावी, या प्रमुख मागणीसाठी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक मध्यवर्ती संघटनेने ९ नोव्हेंबरला रोजी राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयावर शिक्षकांचा मूक मोर्चा काढण्याचे आयोजन केले आहे. शिक्षकांच्या विविध मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक मध्यवर्ती संघटनेने मूक मोर्चाचे आयोजन केले आहे. राज्यातील सर्व शिक्षकांनी मोर्चात मोठ्या संख्येने सहभागी होऊन मोर्चा यशस्वी करावा, असे आव्हान मध्यवर्ती संघटनेचे सरचिटणीस राजेश सुर्वे यांनी केले आहे.तसेच अमरावती येथे ९नोव्हेंबरला सकाळी ११वाजता ईर्विन चौक ते जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य मूक मोर्चा काढण्यात येणार आहे.या मोर्चात प्राथमिक,माध्यमिक शिक्षकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन अमरावती जिल्हा समन्वय शिक्षक समितीने केले आहे.

## नागपूर येथील रेशीमबागमध्ये पुस्तक महोत्सव

**अमरावती/ वार्ताहर**

नागपूर शहरातील रेशीमबागमधील मैदानावर येत्या २२ ते ३० नोव्हेंबर, २०२५ दरम्यान नॅशनल बुक ट्रस्टच्यावतीने पुस्तक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. महोत्सवामध्ये राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय ख्यातीप्राप्त व नामवंत लेखक, कवी, कथाकार, चित्रपट कलावंतांचा प्रत्यक्ष सहभाग राहणार आहे. तर सदर नामवंतांची वेगवेगळी दालने महोत्सवात राहणार आहेत. यानिमित्ताने संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या हस्ते पोस्टरचे विमोचन करण्यात आले.



याप्रसंगी विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. अजय लाड उपस्थित होते.विद्यापीठाशी संलग्नित पाचही जिल्ह्यांमधील महाविद्यालयांचे प्राचार्य, प्राध्यापक, विद्यार्थी यांनी सदर पुस्तक महोत्सवामध्ये जास्तीत जास्त संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी केले आहे. अधिक माहितीकरिता डॉ. राजीव बोरकर यांचेशी संपर्क साधावा, असे विद्यापीठाच्यावतीने कळविण्यात येत आहे.

# गरीब वीजग्राहकांना २५ वर्षे मोफत वीज

### राज्य शासनाच्या स्मार्ट योजनेसाठी महावितरणचा पुढाकार

**अमरावती/ का.प्र.**

दारिद्र्य रेषेखालील आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या घरांवर एक किलोवॅट क्षमतेचा सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प बसवून त्यांना २५ वर्षे मोफत विजेची सुविधा उपलब्ध करण्यासाठीच्या स्वयंपूर्ण महाराष्ट्र आवासीय रूफ टॉप (स्मार्ट) योजनेच्या अंमलबजावणीसाठी महावितरणने पुढाकार घेतला आहे. केंद्र सरकार व राज्य सरकारच्या अनुदानामुळे या योजनेतील लाभार्थी ग्राहकांना खूप कमी हिस्सा भरावा लागणार आहे, असे महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक मा. लोकेश चंद्र यांनी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात राज्य सरकारने स्मार्ट योजना सुरू केली आहे. दारिद्र्य रेषेखालील १.५४




लाख तर आर्थिकदृष्ट्या दुर्बल ३.४५ लाख अशा महिना १०० युनिटपेक्षा कमी वीज वापणाऱ्या पाच लाख घरगुती वीज ग्राहकांना मोफत वीज मिळावी आणि अतिरिक्त वीज विकून उत्पन्नही मिळावे यासाठी ६५५ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. ही योजना प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य तत्वावर राबविण्यात येणार आहे. महावितरणच्या नुकत्याच झालेल्या संचालक व मुख्य अभियंत्याच्या राज्यस्तरीय बैठकीत या योजनेच्या अंमलबजावणीबाबत सूचना देण्यात आल्या.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात केंद्र सरकारने प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना सुरू केली आहे. त्यामध्ये ग्राहकांना एक किलोवॅटचा छतावरील सौर ऊर्जा प्रकल्प बसविण्यासाठी ३० हजार रुपये अनुदान केंद्र सरकारकडून मिळते. स्मार्ट योजनेत या अनुदानाखेरीज राज्य सरकारकडूनही अनुदान मिळणार असल्याने वीज ग्राहकांना खूप कमी हिस्सा भरून प्रकल्प बसविता येईल.स्मार्ट योजनेनुसार दारिद्र्यरेषेखालील ग्राहकांना एक किलोवॅटचा सौर ऊर्जानिर्मिती प्रकल्प बसविण्यासाठी केंद्र सरकारकडून ३० हजार रुपये तर राज्य सरकारकडून १७,५०० रुपये अनुदान मिळेल. सौर ऊर्जा प्रकल्पाची ऊर्वरित रक्कम भरून ग्राहक २५ वर्षे मोफत विजेचा लाभ घेऊ शकतो.

शंभर युनिटपेक्षा कमी वीज वापर असणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल ग्राहकांनाही केंद्र सरकारच्या ३० हजार रुपये अनुदानाखेरीज राज्य सरकारकडून अनुदान मिळणार आहे. या गटातील सर्वसाधारण ग्राहकांना दहा हजार रुपये राज्य सरकारकडून मिळतील. अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या ग्राहकांना राज्य सरकार १५ हजार रुपये अनुदान देणार आहे.एक किलोवॅटच्या सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्पातून दरमहा सुमारे १२० युनिट वीजनिर्मिती होते. त्यामुळे शंभर युनिटपर्यंत वीज वापरणाऱ्या ग्राहकांना स्वतःची गरज भागवून अतिरिक्त वीज महावितरणला विकता येते. या प्रकल्पातून २५ वर्षे वीजनिर्मिती होत असल्याने तेवढा काळ लाभ होतो.

## यादव देशमुख महाविद्यालय क्रीडा क्षेत्रात राज्यस्तरावर



**तिवसा/ वार्ताहर**

श्री शिवाजी शिक्षण संस्था द्वारा संचालित या.द.व देशमुख कला व वाणिज्य महाविद्यालय तिवसा येथील विद्यार्थी अनुराग भवनदास गाडगे आणि श्रेयस विनोद गोरे यांनी विभागीय शालेय मैदानी क्रीडा स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत महाविद्यालयाचा गौरव वाढवलेला आहे. ही विभागीय शालेय मैदानी क्रीडा स्पर्धा जिल्हा क्रीडा संकुल, गोधनी रोड, यवतमाळ येथे पार पडली.अनुराग गाडगे याची ११० मीटर हर्डल्स व ४०० मीटर हर्डल्स (वयोगट १९) या प्रकारात निवड झाली होती व श्रेयस गोरे याची (वयोगट १७) ४०० मीटर हर्डल्स या प्रकारात विभागीय पातळीवर निवड झाली होती. या विभागीय स्पर्धेमध्ये अनुराग गाडगे यांने ४०० मीटर हर्डल्समध्ये द्वितीय क्रमांक पटकावला आणि राज्यस्तरीय शालेय मैदानी स्पर्धेसाठी निवड मिळवली आहे.यावेळी महाविद्यालयातील अधिक्षक महेश अवघड तसेच प्रा. रवींद्र पाटील, गौरी गणोरकर, वाय.एम देशमुख ,जगताप ,के एम कुथे, पी जे भोयर, राजकुमार तिडके, बी. डी गोंजारे उपस्थित होते.तसेच सर्व कनिष्ठ आणि वरिष्ठ महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी देखील विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व पुढील राज्यस्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्यात.

# विशेष सखोल फेरतपासणी आणि राजकारण !

निवडणूक आयोगाने बारा राज्यांत विशेष सखोल फेरतपासणी ( एसआयआर) मोहीम राबवण्याचा निर्णय घेतला आहे.ही मोहीम राबवण्याऱ्या अधिकाऱ्यांना प्रशिक्षण दिल्यानंतर लगेचच या मोहिमेची अंमल बजावणी सुरू होईल.बिहारमध्ये अशाच प्रकारची मोहीम निवडणुक आयोगाने राबवली. त्यामध्ये बऱ्याच अडचणी आल्या, परंतु निवडणुक आयोगाने ती मोहीम यशस्वीपणे पार पाडली असून,आता मोहीमेचा दुसरा टप्पा बारा राज्यांत अंमलात आणला जाईल.बिहारमध्ये ६५ लाख मतदारांची नावे या मोहिमेंतर्गत वगळण्यात आली.काही मतदारांचा झालेला मृत्यू,काही मतदारांनी केलेले स्थलांतर,काही मतदारांची दुबार नोंदणी,ही कारणे,त्या मतदारांची नावे मतदार यादीतून वगळण्यासाठी, निवडणुक आयोगाकडून देण्यात आली.

विशेष सखोल फेरतपासणी मोहीमेच्या दुसऱ्या टप्प्याची घोषणा निवडणुक आयोगाने केल्यानंतर केरळ, तामिळनाडू आणि पश्चिम बंगाल या राज्यांमधील सत्ताधाऱ्यांनी या मोहिमेला कडाडून विरोध केला आहे.केरळ विधानसभेने तर विशेष सखोल फेरतपासणी मोहीमेच्या विरोधात विधानसभेत प्रस्तावच मंजूर केला आहे.पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी या गेले अनेक दिवस विशेष सखोल फेरतपासणी मोहीमेच्या विरोधात वक्तव्ये करत होत्या.आता ही मोहीम पश्चिम बंगाल मध्ये राबविण्यात येणार असल्याने,या मोहिमेच्या विरोधात त्या आकाश पाताळ एक करत आहेत.

ममता बॅनर्जी आणि त्यांच्या पक्षाला असे वाटत आहे की, बांगलादेशमधून पश्चिम बंगालमध्ये घुसखोरी करणाऱ्या लोकांची नावे, मतदार यादीतून वगळण्यासाठी ही मोहीम प्रामुख्याने राबवली जात आहे.हे घुसखोर,ममता बॅनर्जी यांच्या पक्षाची व्होट बँक असल्याने,त्या भयभीत झाल्या आहेत.ममता बॅनर्जी यांच्या पक्षाने म्हणजेच तृणमूल काँग्रेसने इतकी वर्षे बांगलादेशी घुसखोरांना, घुसखोरी करण्यासाठी प्रोत्साहन दिले आणि आपली व्होट बँक तयार केली.या घुसखोरांना आधार कार्ड, रेशनकार्ड वगैरे कागदपत्रे मिळवून देण्यासाठी तृणमूल काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी मदत केली असा आरोप त्यांच्यावर अनेक वेळा करण्यात आला आहे.



विशेष सखोल फेरतपासणी मोहीमेत या घुसखोरांची नावे वगळण्यात आली तर ममतांच्या पक्षाला पुढील वर्षी होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत मोठा फटाका बसण्याची शक्यता आहे.२०११ साली मार्क्सवादी कम्युनिस्ट प्रणीत डाव्या आघाडीचा पराभव करुन ममतांच्या नेतृत्वाखालील तृणमूल काँग्रेसने पश्चिम बंगाल मध्ये आपले सरकार स्थापन केले.डाव्या आघाडीची ३४ वर्षांची राजवट संपुष्टात आणल्यानंतर, तृणमूल काँग्रेस गेली १४ वर्षे पश्चिम बंगालमध्ये बिनधोकपणे राज्य करत आहे.आपली व्होट बँक, ममतांनी व्यवस्थितपणे जपली असून त्या व्होट बँकेच्या मदतीने त्या विजया मागून विजय मिळवत आहेत.मात्र विशेष सखोल फेरतपासणी मोहीमेत, ममतांच्या व्होट बँकेला मोठ्या प्रमाणात धक्का बसण्याची शक्यता असल्याने,त्या सैरभैर झाल्या आहेत.

विशेष सखोल फेरतपासणी मोहीमेच्या अंमलबजावणीची घोषणा निवडणुक आयोगाने केल्यानंतर पश्चिम बंगालमध्ये घुसखोरी केलेल्या बांगलादेशी नागरिकांमध्ये घबराटीचे वातावरण निर्माण झाले आहे.या मोहिमेत आपण पकडले जाऊ या भीतीने काही घुसखोर बांगलादेशमध्ये पळून जाण्याचा प्रयत्न करत आहेत.अशा काही घुसखोरांना सीमा सुरक्षा दलाच्या जवानांनी नुकतेच ताब्यात घेतले आहे.पश्चिम बंगालमध्ये जसजशी ही मोहीम राबवली जाईल, तसतशी, बांगलादेश मध्ये पळून जाणाऱ्या घुसखोरांची संख्या वाढू शकेल.

तामिळनाडूमध्ये विशेष सखोल फेरतपासणी मोहीमेला सत्ताधारी द्रमुक पक्षाकडून मोठ्या प्रमाणात विरोध केला जात आहे.नुकतीच द्रमुक आणि त्याच्या मित्रपक्षांची बैठक तामिळनाडूमध्ये आयोजित करण्यात आली होती.या बैठकीला इतर पक्षांनाही आमंत्रित करण्यात आले होते.मात्र तामिळनाडूमधील प्रमुख विरोधी पक्ष, अण्णा द्रमुकने त्या बैठकीवर बहिष्कार घातला.

तसेच सिनेस्टार विजय यांच्या नेतृत्वाखालील टीव्हीके या पक्षाने आणि पीएमके या पक्षाने बैठकीवर बहिष्कार घातला.द्रमुक आणि त्याच्या मित्रपक्षांचा असा आरोप आहे की मतदारांना मोठ्या प्रमाणात मतदानापासून वंचित करण्यासाठी ही मोहीम राबवली जात आहे.निवडणूक आयोग हा भाजपाच्या इशाऱ्यानुसार वागत असून, भाजपाच्या फायद्यासाठी हे सर्व केले जात आहे.या मोहीमेच्या विरोधात द्रमुक आणि त्याचे मित्रपक्ष सर्वोच्च न्यायालयात अपील करणार आहेत.

राजकीय पक्ष त्यांचे राजकारण करत राहतील.परंतु राजकारण बाजूला ठेवून या मोहिमेच्या बाबतीत सखोल विचार केला तर ही मोहीम किती गरजेची आहे ही गोष्ट आपल्या लक्षात येईल.मतदार याद्यांची नीटपणे छाननी केली नाही तर त्या सदोष राहतील आणि अशा सदोष मतदार याद्यांच्या सहाय्याने निवडणुका घेतल्या तर ती गोष्ट कितपत योग्य ठरेल,याचा विचार आपण करणार आहोत की नाही? मतदार यादीतून मृत व्यक्तिंची नावे वगळावीच लागतील.ज्या मतदारांनी स्थलांतर केले आहे त्या मतदारांची नावे मतदार यादीतून काढावीच लागतील.

ज्या मतदारांची नावे एकापेक्षा जास्त ठिकाणी नोंदवलेली आहेत ती दुरुस्त करावीच लागतील. निवडणूक पारदर्शक होण्यासाठी निवडणुक आयोगाला हे सर्व करावेच लागणार आहे.तेंव्हा निवडणूक आयोगाने बारा राज्यांत विशेष सखोल फेरतपासणी मोहीम राबवण्याचा जो निर्णय घेतला आहे,त्याला सर्व राजकीय पक्षांनी सहकार्य करण्याची आवश्यकता आहे.

**अभय गोखले**

# संघर्ष,उर्मी आणि आत्मविश्वासाचा विजयविहार




आमच्या सारख्या ९० च्या दशकातील मुलांसाठी क्रिकेट म्हणजे पहिले प्रेम. सचिन तेंडुलकर आणि विरेंद्र सेहवाग हेच आमचे जीव की प्राण. सकाळी उठल्या पासून रात्री झोपेपर्यंत केवळ क्रिकेट, आणि नसेल खेळत तरी चर्चाच क्रिकेटची. लाईट गेली की रेडिओला कान लावून कॉमेंट्री ऐकणे आणि ये 'बीएसएनएल चौका' म्हटले की गल्लीभर गोंधळ माजवणे, असेच ते आमचे बालपण. पण या साऱ्या क्रिकेटप्रेमात आम्ही कधी पाहिलेच नाही की महिला क्रिकेट नावाचे एक स्वतंत्र विश्वही अस्तित्वात आहे. आमच्यासाठी क्रिकेट म्हणजे पुरुषांचा खेळ. आणि एखादी मुलगी बॅट हातात घेताना दिसली की लगेच प्रश्न यायचा,मुली क्रिकेट खेळतात का?पण २ नोव्हेंबर २०२५ या एका दिवशी भारतीय मुलींनी तो प्रश्न कायमचा इतिहासात दफन केला आणि मनात घुमले तेच वाक्य,'छोरी भी छोरो से कम नहीं होती'!

१९७८ मध्ये महिला क्रिकेटचा पहिला पाऊलखूण उमटली. शांता रंगस्वामी, डायना एदुलजी, चंद्रा नायडू या धाडसी नावांनी समाजाला विचार करायला भाग पाडले, मुली सुद्धा क्रिकेट खेळतात? तो काळ होता जेव्हा मैदानावर जाणे म्हणजे विरोधाचा सामना करणे. सुविधा नव्हत्या, साधने नव्हती, पण स्वप्न मात्र होते मोठे. आम्ही खेळू आणि देशाचे नाव उज्वल करू हा निश्चयच त्यांचे बळ ठरले.आणि मग आले.१९८२, भारतीय क्रिकेटच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिलेले वर्ष.कपिल देव यांच्या नेतृत्वाखाली पुरुष संघ विश्वचषक जिंकून आला आणि देश आनंदात न्हाऊन निघाला. पण त्या आनंदाच्या लाटेतही महिला संघाने स्वतःची कहाणी लिहिली. त्या वेळी कोणत्याही मोठ्या प्रायोजकांचा पाठिंबा नव्हता, ना माध्यमांची दखल; तरीसुद्धा भारतीय महिला संघाने लढवय्या वृत्तीने एक मोठा आंतरराष्ट्रीय विजय मिळवला. इंग्लंडच्या संघाविरुद्ध झुंजार कामगिरी करत त्यांनी भारतीय तिरंगा परदेशी भूमीवर फडकवला. त्या विजयाचा आवाज रेडिओवर नसेल गेला, पण प्रत्येक खेळाडूच्या हृदयात भारत माता की जयचा नाद घुमला. तो क्षण होता स्त्रीशक्तीच्या पहिल्या गर्जनेचा, आम्ही पण खेळू शकतो, आम्ही पण जिंकू शकतो!

१९९० चे दशक आले, संघर्ष वाढला. सुविधा नाहीत, मैदाने नाहीत, पण स्वप्न मात्र ठाम होतं. डायना एदुलजी, अंजुम चोपरा, नीतू डेविड यांनी आपल्या घामाने आणि जिद्दीने महिला क्रिकेटचा दिवा विझू दिला नाही. त्यांच्यामुळे अनेक छोट्या गावातील मुलींच्या डोळ्यात नवीन स्वप्ने उजळली.२००५ मध्ये भारताने पहिल्यांदाच विश्वचषकाच्या अंतिम फेरीत प्रवेश केला.

मिथाली राज आणि झुलन गोस्वामी यांच्या नेतृत्वाखाली भारताने दाखवून दिलं, आपण जिंकू शकतो. आणि २०१७ मध्ये हरमनप्रीत कौरच्या १७१ नाबाद धावा म्हणजे स्त्रीशक्तीचा रणघोषच ठरला.त्या दीर्घ संघर्षाचे सोने झाले २०२५ मध्ये. २ नोव्हेंबर हा इतिहासात कोरलेला दिवस ठरला. हरमनप्रीत कौर, स्मृती मंधाना, शेफाली वर्मा, रेणुका ठाकूर या तरुण वीरांगनांनी केवळ सामना जिंकला नाही, तर समाजाच्या मनातल्या पूर्वग्रहांना धुळीत मिळवलं. चौकाराबरोबर इतिहासाचे प्रतिध्वनी उमटले, आणि प्रत्येक विकेटसोबत जुन्या समजुती कोसळल्या.

आणि मग आला तो क्षण, हरमनप्रीतने घेतलेला शेवटचा कॅच, आणि मैदानभर झंकारणारा विजयाचा दौडता प्रवास. तो क्षण जणू संपूर्ण भारतीय स्त्रीने आकाश कवेत घेतल्याची साक्ष होता. त्या मुलींच्या डोळ्यांतील आनंदाश्रू म्हणजे केवळ विजयाचे पाणी नव्हते, ते होतं नव्या उषेचं तेज, नव्या स्वप्नांचं प्रकाश.हा प्रवास म्हणजे केवळ एका संघाचा नाही, तर प्रत्येक भारतीय मुलींच्या स्वप्नांचा प्रवास आहे, संघर्षातून गौरवापर्यंत, आणि गौरवातून इतिहासापर्यंत.

**मयुर चौधरी**
अमरावती
मो.७७९८०६०५००

# खुर्चीचा मोह विरुद्ध लोकशाहीचा मंत्र..!

स्थानिक स्वराज्य संस्थांचा बिगुल अखेर वाजला आहे. येत्या डिसेंबर-जानेवारी महिन्यात नगरपरिषद, नगरपंचायत आणि जिल्हा परिषदांसह अनेक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार असल्याचे संकेत आहेत. गेली नऊ वर्षे या निवडणुका पुढे ढकलल्या गेल्या, कधी प्रशासकीय कारणे सांगण्यात आली तर कधी राजकीय समीकरणांच्या सोयीने तारखा लांबवण्यात आल्या. पण आता या निवडणुका प्रत्यक्षात येत असल्याने सत्तेची आस असलेले अनेक राजकीय खेळाडू सज्ज झाले आहेत.



स्वातंत्र्यानंतर देशाने लोकशाहीचा स्वीकार केला, लोकांनी लोकांसाठी चालवलेले राज्य हे तत्त्व लोकाभिमुख प्रशासनाच्या केंद्रस्थानी ठेवले. स्थानिक स्वराज्य संस्था म्हणजे या लोकशाहीचा पाया. मात्र, आज हा पाया सत्तेच्या मोहात डळमळीत होत चालला आहे.निवडणूक म्हणजे आता लोकसेवेचा उत्सव नसून, खुर्ची मिळवण्याचा व्यवहार बनला आहे. पैशाच्या बळावर, आश्वासनांच्या आमिषावर आणि समाज घटकांतील तडजोडींवर सत्ता मिळवण्याचे खेळ खुलेआम सुरू आहेत. या खेळात लोकहिताचे विचार मागे पडले आहेत आणि सत्तेच्या गणिताने सर्व मूल्यांना गिळले आहे.

आज निवडणूक म्हणजे व्यवहार. पैसा लावा, सत्ता मिळवा आणि परत पैसा कमवा या तीन टप्प्यांच्या समीकरणावर राजकारण उभे आहे.शासकीय निधीला 'सार्वजनिक संपत्ती' न मानता तो वैयक्तिक मालमत्ता समजण्याची प्रवृत्ती वाढली आहे. करोडो रुपयांच्या कामांच्या घोषणा, प्रकल्पांचे उद्घाटन, जनतेच्या नावाखाली निधींचे अपव्यय हे सर्व रोजच्या बातम्यांमध्ये सामान्य झाले आहे.पण या सर्व घोषणांच्या पलीकडे पाहिले, तर प्रत्यक्ष विकास कोसो दूर दिसतो. कारण पैशाची कमतरता नाही, पण त्या पैशाचा योग्य वापर करणारी इच्छाशक्ती आणि प्रामाणिकता दुर्मिळ झाली आहे. भारतीय मतदार आजही असा समज बाळगतो की राजकारणी हा काही विशेष बुद्धिमान, शक्तिशाली आणि आपल्यापेक्षा वेगळा वर्ग आहे.यामुळेच सामान्य नागरिक स्वतःला दुय्यम समजतो आणि 'राजकारण आपल्यासाठी नाही' अशी मानसिक गुलामी स्वीकारतो.पण खरी लोकशाही म्हणजे केवळ मतदान नव्हे; ती सततचा सहभाग आणि प्रश्न विचारण्याची संस्कृती आहे. जनतेने निवडून दिलेल्यांना उत्तरदायी ठेवलं नाही, तर सत्ताधारी राजे बनतात आणि जनता पुन्हा प्रजा.

आजच्या काळात चारित्र्यवान आणि मूल्यनिष्ठ नेते शोधणे कठीण झाले आहे.देशाच्या स्वातंत्र्यानंतर जे नेते केवळ लोककल्याणासाठी राजकारण करत होते, त्यांची फळी आता संपुष्टात आली आहे. आज राजकारणात प्रवेश म्हणजे 'करिअर' आणि सत्ता म्हणजे 'गुंतवणूक परतावा.'निष्ठा, आदर्श, आचारसंहिता, या

**स्थानिक स्वराज्य निवडणुकीत उघड होणार खरे चेहरे!**

संकल्पना आता निवडणूक आयोगाच्या कागदपत्रांपुरत्याच मर्यादित राहिल्या आहेत.निवडून आलेले सदस्य काही दिवसांतच पक्षांतर करतात, 'तिकीट' विकले जाते, 'मत' खरेदी केले जाते, आणि लोकशाही एक प्रहसन बनते. एकेकाळी मूल्यांच्या पायावर उभे असलेले राजकारण आता 'जुगाराच्या टेबलावर' उतरले आहे.

खुर्ची कधीही चुकत नाही; चुकतो तो त्या खुर्चीवर बसणारा माणूस सत्ता मिळाल्यानंतर नेत्याचे वर्तन, भाष्य, आणि निर्णय हे त्याच्या मानसिकतेचे प्रतिबिंब असते.राजकीय सत्तेचा अर्थ 'सेवा' न राहता 'स्वार्थ' झाला की लोकशाही कोलमडते.असे असले तरी अजूनही काही नेते प्रामाणिकतेचा आणि जनसेवेचा दीप जिवंत ठेवून काम करत आहेत. त्यांचे विचार, त्यांचे आचरण आणि सार्वजनिक जीवनातील पारदर्शकता हेच लोकशाहीचे खरे शिलेदार ठरतात.पण त्यांची संख्या अल्प आहे, आणि त्यांचा आवाज सत्तेच्या गदारोळात दाबला जातो.आगामी स्थानिक स्वराज्य निवडणुका या केवळ पदांसाठीचा संघर्ष नसावा, तर लोकशाहीची पुनर्स्थापना करण्याची संधी ठरावी.


मतदारांनी आपल्या मताचा वापर आंधळेपणाने नव्हे, तर विचारपूर्वक करणे आवश्यक आहे.'खुर्ची नव्हे, चारित्र्य निवडा; आश्वासन नव्हे, आचरण तपासा आणि पक्ष नव्हे, व्यक्ति निष्ठा पाहा'कारण राज्याचे चारित्र्य ठरवणारा घटक म्हणजे सत्तेचा रंग नाही, तर सत्ताधाऱ्याचा स्वभाव आहे.भारताची लोकशाही अजूनही मजबूत आहे. पण ती मजबूत ठेवण्याची जबाबदारी केवळ नेत्यांची नाही, ती प्रत्येक मतदाराची आहे.खुर्ची बदलली की व्यवस्था बदलेल, हा भ्रम सोडा माणूस बदलला की राजकारण बदलेल.आगामी स्थानिक स्वराज्य निवडणुका या विचारसरणीच्या बदलाची सुरुवात ठराव्यात, हीच खरी लोकशाहीची विजय घोष ठरेल.

**विवेक वानखडे**, यवतमाळ
मो. नं.९८५०९७८९३३

# गुरुनानक देव:मानवता आणि सामाजिक समतेचे प्रवर्तक

भारतीय संत परंपरेत अनेक थोर पुरुषांनी समाजाच्या उद्धारासाठी कार्य केले, पण त्या परंपरेतील सर्वात तेजस्वी आणि मानवतेचा खरा दीपस्तंभ म्हणजे गुरुनानक देव होते. त्यांनी धर्माला पंथ, जाती, विधी यांच्यापलीकडे नेऊन तो समाजकल्याणाशी जोडला. त्यांच्या विचारसरणीत माणुसकी, समानता, सेवा, प्रेम, श्रमसन्मान आणि न्याय यांचे अद्भुत मिश्रण आहे. त्यांचे जीवन हे केवळ धार्मिक क्रांतीचे नव्हे, तर सामाजिक परिवर्तनाचे घोषणापत्र ठरले. आजच्या काळातही त्यांची शिकवण समाजाला नवा नैतिक मार्ग दाखवते. गुरु नानक देव यांचा जन्म तळवंडी या गावात झाला, ज्याला आज ननकाना साहिब (पाकिस्तान) म्हणून ओळखले जाते. त्या काळात भारतीय समाज धर्माच्या नावाखाली विभागला गेला होता. जातिभेद, अंधश्रद्धा, स्त्रीदमन, शोषण आणि असमानता यांचे सावट संपूर्ण समाजावर पसरलेले होते. धर्म हा व्यवहाराच्या केंद्रस्थानी होता, पण त्याचा वापर लोकशोषणासाठी होत होता. अशा वेळी एका बालकाने समाजाला सांगितले की 'ना को हिंदू, ना को मुसलमान' म्हणजेच प्रत्येक मनुष्य सर्वप्रथम एक मानव आहे. हे वचन त्या काळातील धार्मिक संकुचिततेवर प्रहार करणारे आणि समाजाला नव्या दिशेने नेणारे होते.

गुरुनानक देव यांचे बालपण शांत, करुणामय आणि चिंतनशील वातावरणात गेले. लहानपणापासूनच त्यांना सामाजिक अन्याय, गरीबी, आणि धर्माच्या नावाखाली होणारे अत्याचार जाणवले. त्यांनी देवाला शोधण्याची प्रक्रिया बाह्य पूजापद्धतीत नव्हे, तर अंत:करणातील शुद्धतेत शोधली. त्यांनी धर्माला मनुष्याच्या आचरणाशी जोडले. त्यांच्या दृष्टीने धर्म म्हणजे सत्याचा शोध, इतरांविषयी करुणा, प्रामाणिक श्रम आणि सामूहिक कल्याणासाठीची सेवा होय. त्यांची मूलभूत शिकवण तीन शब्दांत सांगता येते ते म्हणजेच नाम जपो, किरत करो आणि वंड छको. या तत्त्वांमध्ये समाजजीवनाची संपूर्ण दिशा अंतर्भूत आहे. नाम जपो म्हणजे



सतत सत्य आणि परमात्म्याचे स्मरण, म्हणजेच अंत:करणातील शुद्धता; किरत करो म्हणजे प्रामाणिक श्रम करा, म्हणजेच जीवनात परिश्रम आणि स्वावलंबनाचा सन्मान करा; तर वंड छको म्हणजे आपल्या उत्पन्नातील काही भाग इतरांसोबत वाटून घ्या, म्हणजेच समाजातील दुर्बल घटकांविषयी जबाबदारी बाळगा. या शिकवणुकीत आर्थिक समता, सामाजिक न्याय आणि नैतिकतेचा सुंदर संगम दिसतो. हे तीन तत्त्व आजच्या समाजातही तितकेच उपयुक्त आहेत.

गुरु नानक देव यांनी धर्माच्या नावाखाली होणाऱ्या ढोंगीपणाला व पाखंडाला आव्हान दिले.गुरुनानक देव हे स्त्रीसमानतेचेही प्रवर्तक होते. त्या काळात स्त्रियांना समाजात कनिष्ठ स्थान होते. पण त्यांनी ठामपणे सांगितले की 'सो क्यों मंदा आखिए, जित जमे राजान.' म्हणजे जी स्त्री राजांना जन्म देते, ती कशी कनिष्ठ असू शकते? त्यांनी स्त्रियांना समाजातील समान स्थान देण्याची आवश्यकता अधोरेखित केली. त्यांच्या विचारांमुळे पुढे शीख धर्मात स्त्रियांना धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात मान्यता मिळाली. हे त्या काळातील समाजासाठी अत्यंत प्रगतिशील विचार होते.गुरुनानक देव यांनी समाजात श्रमाचा सन्मान वाढवला. त्यांनी सांगितले की 'घाळ खाए किछ हातहु दे, नानक राहु पछाणे से.' म्हणजे जो स्वतः परिश्रम करतो आणि इतरांना देतो, तोच योग्य मार्ग ओळखतो.

त्या काळात श्रम करणाऱ्यांना समाजात नीच मानले जात होते, पण त्यांनी सांगितले की श्रम म्हणजेच साधना. या विचारांनी श्रमिक वर्गाला आत्मसन्मान आणि सामाजिक प्रतिष्ठा दिली. त्यांनी व्यक्तीच्या आणि समाजाच्या नैतिक जबाबदाऱ्या अधोरेखित केल्या. त्यांनी धर्म आणि समाज यांचा मेळ घालून एक सामाजिक चळवळ निर्माण केली. त्यांच्या शिकवणीत आर्थिक न्याय या संकल्पनेलाही महत्त्व आहे.

शेवटी असे म्हणता येईल की गुरु नानक देव हे केवळ शीख धर्माचे प्रवर्तक नव्हते, तर ते मानवतेचे जागतिक प्रवक्ते होते. त्यांनी दाखवलेला मार्ग कालातीत आहे, जो प्रत्येक माणसाला स्वतःच्या अंत:करणाशी जोडतो आणि समाजाशी नाते घट्ट करतो. त्यांचे विचार आजही समाजाच्या आत्म्याला नवी ऊर्जा देतात. त्यांच्या शिकवणुकीचा अर्थ असा की, माणूस हेच देवाचे सर्वश्रेष्ठ रूप आहे. म्हणूनच गुरु नानक देव जयंती साजरी करणे म्हणजे त्यांच्या तत्त्वांचा अंगीकार करून समाजात प्रेम, समानता आणि सेवा या मूल्यांचा पुनःप्रकाश प्रज्वलित करणे होय.

**डॉ. राजेंद्र बगाटे**
मो. क्र. ९९६०१०३५८२

■ बुधवार, ५ नोव्हेंबर २०२५

paper : www.janmadhyam.com

mail : Jmakola.thakur@gmail.com

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला जिल्हा विशेष

# विभागीय नियंत्रक विलास राठोड यांच्या भ्रष्टाचाराची चौकशी करून बडतर्फीची मागणी

## २६ नोव्हेंबर संविधान दिनी आत्मदहनाचा इशारा : नंदकुमार कांबळे यांची पत्रकार परिषदेत माहिती

■ प्रतिनिधी | मूर्तिजापूर ■

राज्य परिवहन महामंडळातील अन्यायकारक बडतर्फी, अधिकाराचा गैरवापर आणि भ्रष्टाचाराच्या मुद्द्यावरून एसटी वर्कर्स काँग्रेसकडून अकोला विभाग नियंत्रक विलास राठोड यांच्या चौकशीसह बडतर्फीची मागणी करण्यात आली आहे. तसेच येत्या २६ नोव्हेंबर संविधान दिनी आत्मदहन करण्याचा इशाराही संघटनेचे प्रदेश संघटक सचिव नंदकुमार कांबळे यांनी दिला आहे.



अकोला विभागातील अनेक कर्मचाऱ्यांना एकाचवेळी नोकरीतून बडतर्फ करण्यात आले होते. यापैकी काहींना पुन्हा नोकरीवर घेतले असताना, ४० कामगारांवर जाणीवपूर्वक अन्याय झाला आहे, असा आरोप कांबळे यांनी रविवारी आयोजित पत्रकार परिषदेत केला. या संदर्भात त्यांनी व्यवस्थापकीय संचालक, मुख्य सुरक्षा दक्षता अधिकारी (मुंबई) आणि विभागीय नियंत्रक (अकोला) यांना लेखी कळविले आहे.

कांबळे यांनी सांगितले की, 'अकोला विभागातील ६२ बडतर्फ कर्मचाऱ्यांपैकी फक्त २२ जणांना न्याय मिळाला, तर उर्वरित ४० कर्मचाऱ्यांची अपिले नामंजूर करून त्यांच्यावर अन्याय झाला आहे. विभाग नियंत्रक विलास राठोड यांच्या मनमानी आणि गलथान कारभारामुळे अनेक कर्मचाऱ्यांवर उपासमारीची वेळ आली आहे. त्यांच्या विरोधात सखोल चौकशी करून योग्य ती कारवाई करण्यात यावी.' यापूर्वी झालेल्या बेमुदत उपोषणानंतर वरिष्ठ सुरक्षा व दक्षता अधिकाऱ्यांनी राठोड यांच्या कारभाराचा अहवाल मध्यवर्ती कार्यालय मुंबई येथे पाठविला होता. मात्र, अद्याप कोणतीही कारवाई झालेली नाही. 'विलास राठोड यांनी आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करून लाखो रुपयांचा भ्रष्टाचार केला आहे. अशा भ्रष्ट अधिकाऱ्याविरुद्ध तात्काळ कारवाई करून त्यांना पदावरून हटवावे, तसेच सर्व बडतर्फ कर्मचाऱ्यांना नोकरीवर रुजू करून घ्यावे. अन्यथा २६ नोव्हेंबर रोजी आत्मदहन करण्यात येईल,' असा इशारा कांबळे यांनी दिला. या पत्रकार परिषदेला कार्याध्यक्ष चंद्रकांत काकडे, प्रदेश संघटक सचिव नंदकुमार कांबळे, तसेच बडतर्फ कर्मचारी जितेंद्र राऊत आणि शकिल खान उपस्थित होते.

> '२६ नोव्हेंबर रोजी जर काही अप्रिय घटना घडली, तर त्यास पूर्णतः जबाबदार राज्य परिवहन प्रशासनाचे मध्यवर्ती कार्यालय मुंबई आणि विभागीय कार्यालय अकोला असेल,'
> **नंदकुमार कांबळे.**

# तांत्रिक अडचणींमुळे लाडकी बहिणी अडचणीत

## बंधनकारक ई-केवायसी महिलांसाठी ठरली डोकेदुखी

■ प्रतिनिधी | खेट्री ■

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या ई-केवायसी प्रक्रियेमुळे पातुर तालुक्यासह चान्नी परिसरात महिलांची मोठी लगबग पाहायला मिळत आहे. शासनाने ई-केवायसी बंधनकारक केल्याने महिलांनी मोठ्या उत्साहाने पडताळणीसाठी हजेरी लावली आहे. मात्र, तांत्रिक अडचणींमुळे लाडकी बहिणींना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे.

संकेतस्थळावर वाढलेला ताण, दिवसा वारंवार साइट बंद पडणे, ओटीपी न मिळणे, तसेच पती किंवा वडिलांच्या मोबाईलवर ओटीपी न येणे या कारणांमुळे पडताळणी प्रक्रिया ठप्प झाली आहे. जवळपास पंधरा दिवसांपासून ही प्रक्रिया सुरू असून, दररोज साइट ठप्प होण्याची समस्या कायम आहे.

अनेक महिलांना तासनतास रांगेत थांबावे लागत असून, ई-केवायसी पूर्ण करण्यासाठी काही महिलांना अनेक वेळा चकरा माराव्या लागत आहेत. ग्रामीण भागातील लाडकी बहिणींकडून शासनाने प्रणालीमध्ये सुधारणा करून प्रक्रिया सुलभ करण्याची मागणी होत आहे.



**केवायसीसाठी लाडकी बहिणींचं रात्रभर जागरण ! :** पातुर तालुक्यातील ग्रामीण भागातील महिलांचा संघर्ष वाढत चालला आहे. दिवसा शेतात मजुरी करून उपजीविका चालवणाऱ्या लाडकी बहिणींना ई-केवायसीसाठी रात्री उशिरापर्यंत संगणक केंद्रांवर थांबावे लागत आहे. संकेतस्थळावर प्रचंड गर्दी व साइट बंद पडल्याने अनेक महिलांना रात्रभर जागरण करून पडताळणी प्रक्रिया पूर्ण करण्याचा पर्याय उरला आहे.

# हिवरखेड नगरपरिषदेची पहिलीच निवडणूक

### स्वयंघोषित उमेदवारांची लगबग, जिकडून तिकीट मिळेल तिकडे जाण्याची तयारी

**हिवरखेड :** हिवरखेड नगरपरिषद स्थापनेनंतरची ही पहिलीच निवडणूक ठरणार असून, सध्या शहरात राजकीय हालचालींना वेग आला आहे. स्वयंघोषित उमेदवारांची लगबग सुरू असून, जिकडून तिकीट मिळेल तिकडे जाण्याची अनेक इच्छुकांची तयारी दिसून येत आहे.

ग्रामपंचायत काळातील शेवटच्या निवडणुकीत सहा वार्डातून एकूण १७ सदस्य निवडून आले होते. नगरपरिषद स्थापन झाल्यानंतर नव्याने प्रभागरचना करण्यात आली असून, आता दहा प्रभागांमधून प्रत्येकी दोन अशा २० नगरसेवकांची निवड होणार आहे. याशिवाय नगराध्यक्षपदाची निवड जनतेतून थेट मतदानाद्वारे होणार आहे. आरक्षण सोडतीनुसार पहिल्या नगराध्यक्षपदाचा मान ओबीसी महिला प्रवर्गासाठी राखीव ठरला आहे. त्यामुळे इतर प्रवर्गातील तसेच पुरुष इच्छुकांमध्ये निराशा पसरली आहे.

**मागील निवडणुकांतील राजकीय पार्श्वभूमी :** ग्रामपंचायत काळात निवडणुका पक्षचिन्हांवर झाल्या नसल्या तरी, सदस्यांचा पक्षीय कल पाहता काँग्रेसचे गिऱ्हे, भोपळे, मिरसाहेब, ओंकारे गट आणि वंचित बहुजन आघाडीचे एक असे एकूण आठ सदस्य निवडून आले होते. त्यांना सत्ता स्थापनेसाठी एका जागेची कमतरता भासली होती. दुसरीकडे प्रहार संघटनेचे आणि रवी घुंगड गटाचे ५, भाजपप्रणीत दुतोंडे गटाचे २ आणि वंचितचे २ असे एकूण ९ सदस्य एकत्र येत त्यांनी सत्ता स्थापन केली होती. या काळात टप्प्याटप्प्याने दोन सरपंच कार्यरत होते. मागील २० वर्षांमध्ये हिवरखेडला एकही पूर्ण पंचवार्षिक सरपंच मिळालेला नाही. सरपंच पद आपापसात विभागून घेण्याची परंपराच येथे रूढ झाल्याचे दिसते. त्यामुळे आता नगरपरिषद स्थापन झाल्यानंतर पहिल्या नगराध्यक्षांचा पाच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण होतो का, की पुन्हा सत्तावाटपाचे खेळ सुरू राहतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**पंचरंगी लढतीचे प्राथमिक संकेत :** हिवरखेड नगरपरिषदेच्या आगामी निवडणुकीत काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट), वंचित बहुजन आघाडी, प्रहार आणि भाजप या पाच पक्षांमध्ये पंचरंगी लढत होण्याचे प्राथमिक चित्र दिसत आहे. मात्र, निवडणुकीपूर्वी व नंतर होणाऱ्या युती किंवा आघाड्यांवरच अंतिम निकालाचे गणित अवलंबून राहणार आहे.

## जाहीर सुचना

सर्वत्र लोकांना या जाहीर नोटीसव्दारे सुचित करण्यात येते की, आमचे पक्षकार डॉ. मंजु अनिल बजाज रा. तोष्णीवाल लेआउट अकोला यांनी त्यांची खालील वर्णीत मालमत्ता विकण्याचा सौदा ईसार हा नितीनकुमार छगनलाल गणात्रा रा. गौरक्षण रोड, अकोला यांचेशी केला होता व त्याप्रमाणे त्याची खरेदी दि. ३०/१०/२०२५ रोजी ठरलेली होती, त्या सदर मालमत्तेचे वर्णन खालील प्रमाणे :-

**मालमत्तेचे वर्णनः-**

तापडिया नगर अकोला येथील सर्वे नं. ५७ मधील नझुल प्लॉट नं. २, शिट नं. ६३-सी मधील लेआउट प्लॉट क्र. ११२-अ, नविन प्लॉट नं. २/२९/अ. क्षेत्रफळ ३२५.६० चौ. मिटर, पुर्व-पश्चिम ३५ फुट व उत्तर-दक्षिण १०० फुट, असे एकुण ३५०० चौ.फुट क्षेत्रफळाची प्लॉटवर १४१.५१ चौ.मिटर दोन मजली बांधकाम, दि. ३०/०८/२००३ च्या म.न.पा. परवानगीनुसार बांधलेले पक्के घर ज्यास चतु:सिमाः- पुर्वेस- नागापुरे यांचे प्लॉट, पश्चिमेस- पाटील यांचे प्लॉट, उत्तरेस- रोड व दक्षिणेस- सर्व्हीस लाईन.

या नोटीसव्दारे सर्व लोकांना सुचित करण्यात येत आहे की, वरील उल्लेखित मालमत्ते मध्ये आमचे पक्षकार यांनी नितीनकुमार छगनलाल गणात्रा यांचे सोबत सदर मालमत्ता विकण्याचा सौदा ईसार केलेला होता व त्या प्रमाणे दि. ३०/१०/२०२५ रोजी खरेदी नियोजीत केली होती व सदर खरेदीच्या दिवशी नितीन गणात्रा यांना बोलावुन खरेदी करण्याबाबत विनंती केली तसेच आमच्या पक्षकाराने खरेदी करिता स्टॅम्प पेपर सुध्दा विकत घेतले तसेच त्यापुर्वी आमच्या पक्षकाराने नितीन गणात्रा यांना वकीला मार्फत दि. २८/१०/२०२५ रोजी नोटीस पाठवुन खरेदीस उर्वरित मोबदल्यासह हजर राहण्याबाबत सुचित केले होते व पुन्हा ईसाराची मुदत वाढवुन देण्यात येणार नाही तसेच खरेदी करीत नसल्यास ईसारा पोटी दिलेली अंशत: रक्कम आमचे पक्षकार दि.

३०/१०/२०२५ रोजी बिनशर्त आपल्याला परत देतील व त्यानंतर आमचे पक्षकार सदर अंशत: मोबदल्याची रक्कम परत देण्यास जबाबदार राहणार नाहीत आणि खरेदी न केल्यास आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाही, असे सुध्दा सुचित केले होते. परंतु दि. ३०/१०/२०२५ रोजी नितीन गणात्रा यांनी आमच्या पक्षकाराला पुन्हा ईसार चिठ्ठीची मुदत एक वर्षाने वाढवुन देण्याबाबत अवास्तव मागणी केली, सदर मागणी आमच्या पक्षकाराला मान्य नव्हती तसेच आमच्या पक्षकाराने अंशतः मोबदला रक्कम नितीन गणात्रा यांना परत घेण्याबाबत विनंती केली, परंतु त्यांनी ती रक्कम परत घेण्यास इच्छा दर्शविली नाही व पुन्हा मुदत वाढवुन खरेदी करण्याची विनंती केली, जी आमच्या पक्षकाराला मान्य नाही. त्यावरून आमच्या पक्षकाराने नितीन गणात्रा यांना दि. ३०/१०/२०२५ रोजी वकीला मार्फत नोटीस पाठवुन अंशतः मोबदला परत घेवुन जाण्याबाबत सुचित केले, तसेच सदरच्या मालमत्तेतील विक्रीचा करार हा खरेदी न केल्यामुळे रद्द झाला, असे नोटीसव्दारे सुचित केले. तरी सुध्दा नितीन गणात्रा यांनी सदर नोटीसचे जबाब दिले नाही व आमच्या पक्षकाराच्या विनंतीला प्रतिउत्तर दिले नाही. त्यावरून आमचे पक्षकार या जाहीर नोटीसव्दारे सुचित करतात की, आमच्या पक्षकाराने नितीन गणात्रा यांचे सोबत वरील मालमत्तेचा केलेला खरेदी विक्रीचा व्यवहार हा दि. ३०/१०/२०२५ रोजी नितीन गणात्रा यांनी खरेदी करून न घेतल्यामुळे रद्द झाला असुन भविष्यात आमचे पक्षकार कोणत्याही कायदेशीर कार्यवाही साठी जबाबदार राहणार नाहीत, तसेच नितीन गणात्रा यांचा सदर मालमत्तेच्या संबंधातील व्यवहारात कोणताही कायदेशीर अधिकार राहणार नाही, तो दि. ३०/१०/२०२५ रोजी संपुष्टात आलेला आहे. करिता ही जाहीर नोटीस.

अकोला

दि. ०३/११/२०२५

**ॲड. प्रविण आर. कडाळे,**
३०, सोनाई, तोष्णीवाल लेआउट, मुर्तिजापुर रोड, अकोला. अकोला. मो. ९८५०३४३४७७

## Change In Name

I have Changed My Name Form
**OMKAR BHAGWAN KAMBLE**
TO
**ONKAR BHAGWAN KAMBLE**
Passport no-H8135029
My residential Address in Samata Colony, Ring Road Kulkhed Akola 444004

## Change In Name

I have Changed My Name Form
**ANUSHAYA OMKAR KAMBLE**
TO
**ANUSAYA ONKAR KAMBLE**
Passport no-H8135030
My residential Address in Samata Colony, Ring Road Kulkhed Akola 444004

## चौकशीची जाहिर नोटीस

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला.**

अर्ज क्रमांक :- १२८/२०२५ कलम-१९ जा.क्र. ३२४३/२०२५ दि. ०४/११/२०२५

**सार्वजनिक न्यासाचे नाव -** नालंदा उद्यान विहार समिती ट्रस्ट सिरसो ता. मुर्तीजापूर जि. अकोला

**अर्जदार :-** दादाराव शालीकराम जामनिक रा. ग्रामसेवक कॉलोनी, मुर्तीजापूर ता.मुर्तीजापूर जि. अकोला

सर्व संबंधित लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यांत येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त अकोला विभाग अकाला हे वर नमुद केलेल्या अर्ज या संबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२/१९ अन्वये खालील मुद्यावर चौकशी करणार आहेत.

१) वर नममद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय? २) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

अ) जंगम मिळकत (वर्णन) :- **१७१७/- रुपये आहे.**

आ) स्थावर मिळकत (वर्णन) :- **काही नाही.**

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची केलेली कैफियत ही नोटिस प्रसिध्द झाल्या तारखे पासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्तयावर मिळेल अशा रितीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरिल मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरि केली जाईल व अर्जाचे निकाला बाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटिस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त - १, अकोला यांच्या शिक्कयानीशी आज दिनांक ०३-११-२०२५ रोजी दिली.

(शिक्का) **अधिक्षक,** सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला.

जनमाध्यम — जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - २९ अंक ३३५**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

## जाहीर नोटीस

**दिवाणी न्यायालय क. स्तर बाळापुर**
**श्रीमती डि.एम.पाटील यांचे न्यायालयात**
**दिवाणी न्यायाधिश क. स्तर, बाळापुर, बाळापुर, अकोला.**

दिवाणी किरकोळ अर्ज/२६०/२०२५ प्रोसेस नं.२५५८/२०२५

मनकर्णाबाई प्रल्हादराव अवचार वि. कोणीही नाही

पुढील तारिख : २१/११/२०२५

**अर्जदार :** श्रीमती मनकर्णाबाई प्रल्हादराव अवचार वय अ ८१ वर्ष धंदा निवृत्त रा. वाडेगाव ता. बाळापुर जि. अकोला..

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निरंक

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी कलम २ बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII १८२७ अंतर्गत वारस प्रमाणपत्र मिळणे करीता वि.न्यायालयामध्ये अर्ज केला आहे. मयत शेवंताबाई विठ्ठल खंडारे हे दिनांक १९.०६.१९९४ रोजी वाडेगाव ता. बाळापुर जि. अकोला येथे मरण पावले. मयत विठ्ठल उदेभान खंडारे हे दिनांक ०६.०८.१९६६ रोजी पारस ता बाळापुर जि.अकोला येथे मरण पावले. मयत दारूबाई विठोबा खंडारे हे दिनांक २८.०७.२०२२ रोजी वाडेगाव ता. बाळापुर जि. अकोला येथे मरण पावली. मयत सरूबाई विश्राम सावदेकर ही दिनांक २५.०४.१९९३ रोजी जवळा बु. येथे मरण पावली. वरील नमुद सर्व अर्जदार याना मयत शेवंताबाई विठ्ठल खंडारे व मयत विठ्ठल उदेभान खंडारे यांचे एकमेव वारस असल्यामुळे त्यांना शासकीय, निमशासकीय व ईतर लाभाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, सदरचे अर्जा विरुध्द इतर कोणतीही कोणत्याही प्रकारची हरकत अथवा आक्षेप असल्यास त्यांनी या न्यायालयात स्वतः अथवा वकीलामार्फत दिनांक २१.११.२०२५ रोजी किंवा त्याअगोदर या न्यायालयात हजर राहावे अन्यथा प्रकरण एकतर्फी निकाली काढण्यात येईल. करीता आज दिनांक १५/१०/२०२५ रोजी माझे सहीने व कोर्टाच्या शिक्यानिशी प्रकाशित करण्यात येत आहे.

(शिक्का) **आदेशानुसार** सहायक अधिक्षक (न्यायीक) दिवाणी न्यायालय, क स्तर बाळापुर

## जाहीर नोटीस

**वि.५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १७९४/२०२५ प्रोसेस नं.१७४६३/२०२५

चौ.ता. १२/१२/२०२५ दिनांक : १६/१०/२०२५

**अर्जदार :** १. श्रीमती सुलभा लक्ष्मण पवार २. सौ. निता संतोष पेटकर रा. आयर पॅन सेवा इकाई, एन एस डी. एल, पहिला मजला, टाईम्स टॉवर, कमला मिल्स कंपाउंड, . एस. बी. मार्ग, लोअर परेल, मुंबई. ३. सौ. संध्या सुनिल घाटे रा. सितलामाता मंदिर जवळ, जयहिंद चौक, अकोला. ता. जि. अकोला. ४. वैभव लक्ष्मण पवार १ व ४ रा. महाराणा प्रताप चौक, गोडबोले प्लॉट, डाबकी रोड, अकोला. ता. जि. अकोला. ह. मु. रूम नं. २५, गांधी नगर, केएल कॉलनी, कोपरी ठाणा इस्ट पुणे, ता. जि. पुणे. ५. सौ. रिता संदिप पिंपळे रा. माहेश्वरी भवन जवळ, न्यु राधाकिसन प्लॉट, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.

**मयताचा पत्ता :-** मयत : लक्ष्मण गणपत पवार

**पत्ता :-** रा. महाराणा प्रताप चौक, डाबकी रोड, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत लक्ष्मण गणपत पवार यांचे दि. २१/०५/२०२५ रोजी अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १२.१२.२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे . गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १६/१०/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

(शिक्का) **आदेशानुसार** अधिक्षक दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## चौकशीची जाहिर नोटीस

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला.**

अर्ज क्रमांक :- १३४/२०२५ कलम-१९ जा.क्र. ३२४५/२०२५ दि. ०४/११/२०२५

**सार्वजनिक न्यासाचे नाव -** बालवीर हनुमान मंदिर ट्रस्ट कौलखेड अकोला ता. जि. अकोला

**अर्जदार :-** कैलास दिगंबर नागे रा. कौलखेड अकोला ता. जि. अकोला

सर्व संबंधित लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यांत येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त अकोला विभाग अकाला हे वर नमुद केलेल्या अर्ज या संबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२/१९ अन्वये खालील मुद्यावर चौकशी करणार आहेत.

१) वर नममद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय? २) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

अ) जंगम मिळकत (वर्णन ) - **११११/- रुपये आहे.**

आ) स्थावर मिळकत (वर्णन ) :- **काही नाही.**

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची केलेली कैफियत ही नोटिस प्रसिध्द झाल्या तारखे पासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्तयावर मिळेल अशा रितीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरिल मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरि केली जाईल व अर्जाचे निकाला बाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटिस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त - १, अकोला यांच्या शिक्कयानीशी आज दिनांक ०३-११-२०२५ रोजी दिली.

(शिक्का) **अधिक्षक,** सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला.

## जाहीर नोटीस

**वि. ०६ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १९५५/२०२५ प्रोसेस नं.१८२०७/२०२५

चौ.ता. ०५/१२/२०२५ दिनांक : ०३/११/२०२५

**अर्जदार :** १. श्रीमती सुधाताई सुरेशराव माकोडे २. उमेश सुरेशराव माकोडे ३. मंगेश सुरेशराव माकोडे सर्व रा. उमेश वेल्डिंग वर्कशॉप जवळ, राजीव गांधी नगर, मुर्तिजापूर रोड, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.

**मयताचा पत्ता :-** मयत :सुरेश नामदेवराव माकोडे

**पत्ता :-** रा.उमेश वेल्डिंग वर्कशॉप जवळ, राजीव गांधी नगर, मुर्तिजापूर रोड, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत सुरेश नामदेवराव माकोडे यांचे दि. २२/१२/२००९ रोजी शिवर शिवणी अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही.. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०५/१२/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०३ / ११ / २०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

(शिक्का) **आदेशानुसार** अधिक्षक दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि. ०५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १९७४/२०२५ प्रोसेस नं.१७९६६/२०२५

चौ.ता. १६/१२/२०२५ दिनांक : २९/१०/२०२५

**अर्जदार :** १. अनिता दिपक असेरी २. अजय दिपक असेरी मयत तर्फे वारस अ. अंजली अजय असेरी ब. लक्ष अजय असेरी क. दर्शित अजय असेरी ३. विशाल दिपक असेरी सर्व रा. वानखडे नगर, डाबकी रोड, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.

**मयताचा पत्ता :-** मयत : दिपक मदनलाल असेरी

**पत्ता :-** रा.वानखडे नगर, डाबकी रोड, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत दिपक मदनलाल असेरी यांचे दि. ०४/११/२०२४ रोजी अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १६ / १२ / २०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत अन्यथा कोणाची कसल्याही न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २९/१०/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

(शिक्का) **आदेशानुसार** अधिक्षक दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि. ०६ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १७७६/२०२५ प्रोसेस नं.१५९३६/२०२५

चौ.ता. १४/११/२०२५ दिनांक : २२/०९/२०२५

**अर्जदार :** १. सुलभा अशोकराव उनवणे २. सचिन अशोकराव उनवणे क्र. १ व २ रा. डुप्लेक्स क्र. ९ विंग ४, येवता रोड, गजानन महाराज मंदिराजवळ, यमुना नगर, मलकापूर, अकोला. ता. जि. अकोला. ३. मनिष अशोकराव उनवणे रा. जैन मंदिर जवळ, जुने शहर किल्ला चौक, अकोला ता. जि. अकोला. ४. रोहीणी रविंद्र कळमकर रा. जैन मंदिरजवळ, सौदागर पुरा, वाशिम ता. जि. वाशिम.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.

**मयताचा पत्ता :-** मयत : अशोकराव रामभाउ उनवणे

**पत्ता :-** रा.डुप्लेक्स क. ९ विंग ४, येवता रोड, गजानन महाराज मंदिराजवळ, यमुना नगर, मलकापूर, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे: त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत अशोकराव रामभाउ उनवणे यांचे दि. ०३ / ११ / २०२४ रोजी आयकॉन हॉस्पिटल, अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार व गैरअर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक. १४/११/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २२/०९/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

(शिक्का) **आदेशानुसार** अधिक्षक दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि. ०६ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १८९७/२०२५ प्रोसेस नं.१७४११/२०२५

चौ.ता. २१/११/२०२५ दिनांक : १५/१०/२०२५

**अर्जदार :** १. शांताबाई शेषराव चौरपगार २. सदानंद शेषराव चौरपगार ३. देवानंद शेषराव चौरपगार ४. आनंद शेषराव चौरपगार सर्व रा. शांती नगर, जुने शहर, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.

**मयताचा पत्ता :-** मयत : शेषराव श्यामराव चौरपगार

**पत्ता :-** रा.शांती नगर, जुने शहर, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत शेषराव श्यामराव चौरपगार यांचे दि. ०८/०२/२०२४ रोजी अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २१/११/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरून सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १५/१०/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

(शिक्का) **आदेशानुसार** अधिक्षक दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## चौकशीची जाहिर नोटीस

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला.**

अर्ज क्रमांक :- १३५/२०२५ कलम-१९ जा.क्र. ३२४७/२०२५ दि. ०४/११/२०२५

**सार्वजनिक न्यासाचे नाव -** संकटमोचन हनुमान मंदिर ट्रस्ट अवधूत कॉलोनी अकोट ता. अकोट जि. अकोला

**अर्जदार :-** अमोल लक्ष्मन मानकर रा. अवधूत कॉलोनी अकोट ता. अकोट जि. अकोला

सर्व संबंधित लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यांत येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त अकोला विभाग अकाला हे वर नमुद केलेल्या अर्ज या संबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२ / १९ अन्वये खालील मुद्यावर चौकशी करणार आहेत.

१ ) वर नममद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय? २) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

अ) जंगम मिळकत (वर्णन) :- **५०५ /- रुपये आहे.**

आ) स्थावर मिळकत (वर्णन) :- **काही नाही.**

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची केलेली कैफियत ही नोटिस प्रसिध्द झाल्या तारखे पासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरिल मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरि केली जाईल व अर्जाचे निकाला बाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटिस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त- १, अकोला यांच्या शिक्कयानीशी आज दिनांक ०३-११-२०२५ रोजी दिली.

(शिक्का) **अधिक्षक,** सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला.

## जाहीर नोटीस

**वि. ०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १८७४/२०२५ प्रोसेस नं.१७३९८/२०२५

चौ.ता. २४/११/२०२५ दिनांक : १५/१०/२०२५

**अर्जदार :** १. श्रीमती ताईबाई बापु नाईकनवरे रा. नवीन हिंगणा, वाशीम रोड, अकोला. ता. जि. अकोला. २. मीरा लक्ष्मण अंधारे रा. राम मंदिराजवळ, मु. पो. माणकेश्वर, उस्मानाबाद, महाराष्ट्र ३. राधाबाई दादासाहेब इंगळे रा. अंधारे वस्ती, मु.पो. माणकेश्वर, उस्मानाबाद, महाराष्ट्र ४. शाहाजी बापु नाईकनवरे रा. अनुसया भवन, वाशीम बायपास रोड, हिंगणा, अकोला. ता. जि. अकोला. ५. दिलीप बापुराव नाईकनवरे मयत तर्फे वारस ५अ : श्रीमती भागीरथी दिलीप नाईकनवरे रा. वाशीम रोड, नवीन हिंगणा, अकोला. ता. जि. अकोला. ५ब. प्रियंका सुजीत वाळके रा. तेल्हारा, ता. तेल्हारा जि. अकोला. ५. प्रिती रजनीकांत गोरे रा. मु. पो. अंतरगांव, ता. जि. उस्मानाबाद

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.

**मयताचा पत्ता :-** मयत : बापु बलभिम नाईकनवरे

**पत्ता :-** रा. अनुसया भवन, वाशीम बायपास रोड, हिंगणा, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत बापु बलभिम नाईकनवरे यांचे दि. ०६/०१/२०१३ रोजी श्यामदिप क्रिटीकल केअर अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २४/११/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १५/१०/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

(शिक्का) **आदेशानुसार** अधिक्षक दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि. ०२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १८३४/२०२५ प्रोसेस नं.१८०८६/२०२५

चौ.ता. ०४/१२/२०२५ दिनांक : ०१/११/२०२५

**अर्जदार :** १. किशोर गिताराम अडोळे २. श्रुतिका किशोर अडोळे ३. कृतिका किशोर अडोळे ४. श्रेयश किशोर अडोळे. सर्व रा. श्रद्धा नगर नं. ३, सी / ३, रिजनल वर्कशॉप च्या समोर, कौलखेड रोड, अकोला, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.

**मयताचा पत्ता :-** मयत : योगिता किशोर अडोळे

**पत्ता :-** रा.श्रद्धा नगर नं. ३, सी / ३, रिजनल वर्कशॉप च्या समोर, कौलखेड रोड, अकोला, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत योगिता किशोर अडोंळे यांचे दि. २५/०५/२०२४ रोजी अकोला, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०४/१२/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०१ / ११ / २०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

(शिक्का) **आदेशानुसार** अधिक्षक दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

# उमेदवारी निष्ठावंतांना की नातेवाईकांना?

## पैशांचा खेळ की निष्ठेची खिल्ली : उमेदवारीवरून कार्यकर्त्यांचा रोष; साहेबांच्या दरबारात निष्ठेचा अपमान

**रवींद्र लाखे**

**वर्धा-** जिल्ह्यात सुरू झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या हालचालींनी राजकीय तापमान चढले असून, जिल्हा परिषद नगरपालिका पंचायत समिती च्या उमेदवारीवरून असंतोषाचे वारे जोरात वाहू लागले आहेत. ऑक्टोबर मध्ये झालेल्या जिल्हा परिषद नगरपालिका पंचायत समिती अध्यक्ष आणि सदस्यांच आरक्षण सोडतीनंतर पक्षनिष्ठ कार्यकर्त्यांत उत्साह निर्माण झाला होता, मात्र उमेदवारीसाठी 'नातलग' आणि 'पैशाचे बळ' पुढे येऊ लागल्याने तळागाळातील कार्यकर्त्यात संतापाची लाट उसळली आहे.पक्षासाठी वर्षानुवर्षे रात्रंदिवस काम करणारे, गावागावात झेंडे फडकवणारे कार्यकर्ते पुन्हा एकदा दुर्लक्षित राहतील का, असा प्रश्न आता उघडपणे विचारला जात आहे. नेत्यांच्या घराबाहेर तिकीट मागण्यासाठी कार्यकर्त्यांची गर्दी आहे, पण निर्णय मात्र दरबारातल्या निकटवर्तीयांवर झुकत असल्याची चर्चा जोरात आहे.

आयात उमेदवारांचा फुगवटा वाढतोय आणि स्थानिक निष्ठावंतांच्या कष्टांची थट्टा होतेय, हा तळागाळातील रोष आता सोशल मीडियावरूनही प्रकट होऊ लागला आहे.

मतदारसंघाशी संबंध नसलेले आणि शेवटच्या क्षणी आलेले नवे चेहरे आपली ओळख पैशांच्या बळावर निर्माण करू



पाहत आहेत. खरा कार्यकर्ता मात्र अजून तंबूत बसून साहेबांच्या फोनकडे डोळे लावून बसलाय. निष्ठा दारात आणि पैसा गाडीत हा नवा राजकीय मंत्र ठरणार काय? असा प्रश्न कार्यकर्ते विचारत आहेत.कॉंग्रेस, राष्ट्रवादी शरद पवार गट, भारतीय जनता पक्ष आणि कॉंग्रेस गटांमध्ये उमेदवारीसाठी चुरस लागली आहे. प्रत्येक पक्षात निष्ठावंत विरुद्ध नातलग अशी अंतर्गत ध्रुवीकरणाची लढत सुरू झाली आहे. पक्षाच्या प्रतीकावर घाम गाळणारा कार्यकर्ता तिकीटाच्या प्रतीक्षेत आहे, तर एका फटक्यात साहेबांचे कौतुक करणारा नवा चेहरा उमेदवार ठरत आहे. घरची भाकर खाऊन पक्षासाठी धावणाऱ्यांना आज पुन्हा बेंचवर बसवले तर पक्षाची मुळेच निघून जातील, अशा शब्दांत स्थानिक कार्यकर्त्यांनी नाराजी व्यक्त केली आहे. जनतेतही नाराजीनं उसळी घेतली आहे. निवडणूक म्हणजे जनतेचा हक्क, तो केवळ घराणेशाहीचा खेळ नाही, हा संदेश मतदारांनी यावेळी देणं गरजेचं आहे, अशी मतदारांची स्पष्ट भूमिका उमटू लागली आहे.आता सर्वांचे लक्ष पक्षश्रेष्ठींच्या यादीकडे आहे. निष्ठेची किंमत उरेल का, की पुन्हा पैशांचा खेल'च मैदानात रंगेल, हे काही दिवसांत स्पष्ट होईल.

# फसवी ऑनलाईन प्रणाली विरोधात बांधकाम कामगारांचा संताप

## स्वाभिमानी संघटनेच्या मेळाव्यात शासनाला इशारा; उत्स्फूर्त सहभाग

**वर्धा/जनमाध्यम**



शासनाच्या भ्रष्ट ऑनलाईन प्रणालीविरोधात बांधकाम कामगारांचा आक्रोश उसळला वर्धा येथील चरखा गृह मैदानावर स्वाभिमानी बांधकाम कामगार संघटनेच्या वतीने आयोजित न्यायहक्क मेळाव्यात हजारो बांधकाम मजूर एकत्र येत आपल्या हक्कासाठी गगनभेदी घोषणांनी परिसर दणाणवून टाकला.या मेळाव्यात देवळी-पुलगाव मतदारसंघाचे आमदार राजेश बकाणे, माजी खासदार रामदास तडस, ओमप्रकाश यादव, गुंडुभाऊ कावळे, यशवंत झाडे, अटल पांडे, राना रणनवरे, संजय गाथे, अविनाश देव आणि आशिष ठाकरे या मान्यवरांची उपस्थिती लाभली. संघटनेचे संस्थापक अध्यक्ष उमेश अग्निहोत्री यांनी उत्स्फूर्त भाषण करून ऑनलाईन प्रणालीतील भ्रष्टाचारावर जोरदार हल्ला चढवला. त्यांनी म्हटले, बांधकाम कामगारांच्या हक्कांवर कुणी घाला घालणार नाही. ऑनलाईन नावाखाली जे फसवणुकीचे खेळ सुरू आहेत, ते आम्ही उघडे पाडू. आमचा संघर्ष न्यायासाठीच आहे आणि तो शेवटपर्यंत चालेल, बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची फसवी ऑनलाईन प्रणाली बंद करून जुनी ऑफलाईन प्रणाली लागू करावी. ग्रामसेवकांकडून ९० दिवस कामाचे प्रमाणपत्र नाकारल्यास कठोर कारवाई करावी. गंभीर आजार उपचार योजना व प्रसूती लाभ योजना तातडीने सुरू करण्यात यावी. कामगारांच्या मुलांना स्पर्धा परीक्षा तयारीसाठी कोचिंग सहाय्य मिळावे.मृत कामगारांच्या वारसांना अनुदान देताना नोंदणी नूतनीकरणाची अट शिथिल करावी.मंडळाचे सचिव विवेक कुंभार यांची तातडीने बदली करून पारदर्शक अधिकारी नेमावा.२८ मार्च २०२५ चा अन्यायकारक पेन्शन निर्णय मागे घेऊन सन्मानजनक पेन्शन लागू करावी.या सर्व मागण्यांसह संघटनेने शासनाकडे ठाम निवेदन सादर केले. कामगारांनी न्याय मिळेपर्यंत संघर्ष सुरू ठेवण्याचा निर्धार केला. घोषणा, टाळ्यांचा गजर, आणि संघटनेची एकता पाहून वातावरण भारावून गेला.

## देवळी पोलिसांची धडक कारवाई

# अवैधरित्या दारूची तस्करी करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश



**वर्धा/जनमाध्यम**

जिल्हा दारूबंदी असतानाही शेजारच्या यवतमाळ जिल्ह्यातून मोठ्या प्रमाणात दारूची तस्करी करून वर्धा जिल्ह्यात विक्री केली जात असल्याचा प्रकार उघड झाला आहे.

देवळी पोलिसांनी राकेश वाघांना आणि त्याच्या साथीदारांवर कारवाई करीत अवैध दारूसह एक कार जप्त केली आहे. विश्वसनीय माहितीनुसार, राकेश वाघांना (रा. भिडी) हा आपल्या सहकाऱ्यांसह कळंब, जि. यवतमाळ येथून देशी दारू आणून वर्धा परिसरात विक्री करीत होता. त्यानुसार देवळी पोलिसांनी माऊली पार्कजवळ शहरालगत रिंग रोड परिसरात नाकेबंदी केली. या नाकेबंदीत राकेश वाघांना याचा साथीदार हिरा निळकंठ कोहचाडे (रा. कळंब) हा मारुती स्विफ्ट कार (क्रमांक एम-३५-इ-४५३२) मधून विना परवाना दारू वाहतूक करताना पकडण्यात आला. तपास दरम्यान पोलिसांनी त्याच्या ताब्यातून १८० मिलीलिटरच्या २८८ निप बाटल्या, पांढरी स्विफ्ट कार, आणि अँड्रॉइड मोबाईल असा एकूण ६ लाख ७२ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला.या प्रकरणात चिंतामणी ट्रेडर्स, कळंबचा चालक नरेश चांदोरे, राकेश वाघांना आणि हिरा कोहचाडे यांच्याविरुद्ध देवळी पोलीस ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

# दिव्यांगांच्या सक्षमीकरणासाठी कार्य करणाऱ्या संस्थांना नोंदणी आवश्यक

**वर्धा/जनमाध्यम**

दिव्यांग व्यक्तीच्या सक्षमीकरणात नागरीक, नागरी समाज संघटना, संस्था महत्वपूर्ण भूमिका बजावतात. दिव्यांगांसाठी काम करणाऱ्या या संस्था नोंदणीकृत असणे आवश्यक आहे. त्यामुळे ज्या संस्थांची नोंदणी झाली नसेल अशा पात्र संस्थांनी नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

दिव्यांग व्क्ती हक्क अधिनियम, २०१६ च्या कलम ४९-५३ अनुसार दिव्यांगांच्या कल्याण, विकास, पुनर्वसन आणि सक्षमीकरण क्षेत्रात काम करणाऱ्या नागरी समाज संघटना, संस्थांची नोंदणी अनिवार्य आहे. तथापि दिव्यांग क्षेत्रात अनेक नागरी समाज संघटना, संस्था वैध नोंदणी शिवायही कार्यरत आहेत.

सदर बाब दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ च्या कलम ५० चे उल्लंघन करणारी आहे.

कोणतीही व्यक्ती अथवा नागरी समाज संघटना, संस्था दिव्यांग क्षेत्रात वैध नोंदणीशिवाय कार्य करु शकत नाही.त्यामुळे सर्व संस्था, संघटनांच्या कामकाजात एकसमानता येण्यासाठी तसेच त्यांची जबाबदारी आणि सेवांची गुणवत्ता सुनिश्चित करण्यासाठी नागरी समाज संघटना, संस्थांची नोंदणी, तपासणी, देखरेख, नुतनीकरण, जबाबदारी व पारदर्शकता निश्चित करण्यासाठी कार्यप्रणाली निश्चित करण्यात आलेली आहे. त्याअन्वये संघटना, संस्था यांच्या नोंदणीसाठी पात्रतेचे निकष ठरविण्यात आले आहे. त्यात संघटना दिव्यांग व्यक्तींच्या सक्षमीकरण, विकास व पुनर्वसनासाठी कार्यरत असावी, संस्था सोसायटी नोंदणी कायदा १८६६-बॉम्बे पब्लीक ट्रस्ट कायदा १९५० किंवा कंपनी कायदा २०१३ (कलम ८) अंतर्गत नोंदणीकृत असणे आवश्यक आहे, नागरी समाज संघटना, संस्था दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ आणि केंद्र शासनाच्या दिव्यांग व्यक्ती हक्क नियम २०१७ व महाराष्ट्र राज्य दिव्यांग व्यक्ती हक्क नियम ४ नुसार पात्र असावी.

संघटना, संस्था आर्थिकदृष्ट्या सक्षम असणे आवश्यक आहे. स्वतःचे वित्तीय स्त्रोत असणे आवश्यक आहे.

नोंदणीसाठी अर्ज करतांना नोंदणी प्रमाणपत्र, नोंदणी शुल्क प्रदान केलेल्या पावतीची प्रत, वार्षिक अहवाल, मागील तीन वर्षातील सनदी लेखापाल लेखापरिक्षण, वास्तुची माहिती सोबत जोडणे आवश्यक आहे. अर्ज दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी यांच्या कार्यालयात सादर करावे.

अधिक माहितीसाठी दि.४ नोव्हेंबर पर्यंत कार्यालयाशी प्रत्यक्ष संपर्क साधावा, असे जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी प्रतिभा भागवतकर यांनी कळविले आहे.

# शरद पवार डेंटल कॉलेजमध्ये बालकावर मुख पुनर्वसनाची शस्त्रक्रिया

## अगत्स्यच्या चेहऱ्यावर पुन्हा उमटले बालहास्य; वैद्यकीय क्षेत्रात नवी कामगिरी

**वर्धा/जनमाध्यम**



बालदंत चिकित्सेच्या क्षेत्रात उल्लेखनीय यश मिळवत शरद पवार डेंटल कॉलेज आणि हॉस्पिटलच्या बाल दंतचिकित्सा व प्रतिबंधात्मक दंतचिकित्सा विभागाने केवळ १.५ वर्षांच्या अगत्स्य या चिमुकल्यावर संपूर्ण मुख पुनर्वसनाची शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पूर्ण केली. इतक्या कमी वयात इतकी व्यापक दंतचिकित्सा प्रक्रिया कॉलेजमध्ये प्रथमच पार पडली आहे.

अगत्स्यास तीव्र दंतक्षयामुळे सर्व दुधाचे दात प्रभावित झाले होते. वेदना आणि भीतीमुळे सहकार्य न करू शकणाऱ्या या बालकावर डॉक्टरांनी सर्वसामान्य भूल देऊन उपचार करण्याचा निर्णय घेतला. डॉ. रामकृष्ण येळुरी आणि डॉ. मीनल पांडे यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. हरिकिशन कनानी, डॉ. रुतुजा पाटील, डॉ. शेपली हुळे, डॉ. यश नाईक, डॉ. देवयानी आजगेकर आणि डॉ. प्रद्युम्न वात्स या टीमने संपूर्ण प्रक्रिया काळजीपूर्वक पूर्ण केली.या उपचारात रेस्टोरेशन, पल्पेक्टॉमी आणि स्टेनलेस स्टील क्राऊन लावणे आदी प्रक्रिया एका सत्रात करण्यात आल्या. लहान बालकात भूल देताना येणारी जोखीम असूनही काटेकोर नियोजन आणि टीमवर्कमुळे सर्व उपचार सुरक्षितरीत्या पूर्ण झाले.उपचारानंतरच्या फॉलो-अप तपासणीत बालक पूर्णपणे निरोगी आढळले असून त्याची आहार आणि वर्तणूक सुधारली आहे. वेदनामुक्त झालेल्या अगत्स्यने आता सामान्य आहार सुरू केला आहे. या यशाबद्दल कुलगुरू डॉ. ललितभूषण वाघमारे, प्रो व्हाइस चान्सलर डॉ. गौरव मिश्रा, रजिस्ट्रार डॉ. श्वेता काळे पिसुळकर, डॉ. राजीव बोरले, डॉ. तृप्ती वाघमारे, डॉ. संदीप श्रीवास्तव, डॉ. मनोज चांडक, डॉ. विद्या लोहे, डॉ. अलका हांडे आणि डॉ. अंजली बोरले यांनी टीमचे अभिनंदन केले.या यशामुळे शरद पवार डेंटल कॉलेजचे बाल दंतचिकित्सेत उत्कृष्टतेचे केंद्र म्हणून स्थान अधिक बळकट झाले असून संस्थेच्या वैद्यकीय कौशल्याचा ठसा पुन्हा अधोरेखित झाला.

# दिव्यांगांची प्रमाणपत्राकरीता आता दोन दिवस होणार तपासणी

**वर्धा/जनमाध्यम**

सामान्य रुग्णालयात प्रत्येक महिन्याच्या मंगळवारला दिव्यांग व्यक्तींची तपासणी व वैश्विक कार्ड वाटपासाठी कार्यवाही करण्यात येत होती. परंतू आता दिव्यांग व्यक्तींच्या सुलभतेसाठी प्रत्येक आठवड्याच्या मंगळवार व शुक्रवार असे दोन दिवस निश्चित करण्यात आले आहे. याचा लाभ दिव्यांगांनी घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. ४० टक्के किंवा त्यापेक्षा अधिक मानक असलेल्या दिव्यांग व्यक्तींना विविध सरकारी योजनांचा लाभ, सवलत व मदत देण्यासाठी २१ प्रकारच्या आजारांना प्रमाणपत्र देण्यात येते. यामध्ये लोकोमोटर विकलांगता, बौनापण, मांसपेशीय विकृती, कोढ दुरुस्त झालेला व्यक्ती, ॲसिड अटॅक पिडीत, सेरेब्रल पाल्सी, न्युरोलॉजिकल डिसऑर्डर, पार्किसंस रोग, मल्टीपल स्क्लेरोसिस, थैलेसिमिया, हिमोफिलीया, सिकलसेल रोग, बहीरेपणा, वाणी विकलांग, कमी दृष्टी, अंधत्व, ऑटिज्म, बहुविकलांग या आजाराचा समावेश आहेदिव्यांगानी दिव्यांग प्रमाणपत्र (वैश्विक कार्ड) मिळविण्यासाठी swavlambancard.gov.in या संकेतस्थळावर जाऊन ऑनलाईन पध्दतीने स्वत: अर्ज करावा किंवा आपले सेवा केंद्राच्या मदतीने अर्ज सादर करावा. तपासणीकरीता रुग्णालयात जाऊन ओळखीचा पुरावा म्हणून आधारकार्ड, रहिवासी पुरावा म्हणून राशन कार्ड, ईलेक्ट्रिक बिल, रहिवासी प्रमाणपत्र आजारा संबंधित दवाखान्याचे कागदपत्रे, क्ष किरण इत्यादी सादर करावे. तपासणी झाल्यावर वैश्विक कार्ड पोष्टाने घराच्या पत्त्यावर पाठविण्यात येते, असे सामान्य रुग्णालयाच्या वतीने कळविण्यात आले आहे.

## संक्षिप्त

### चोराच्या प्रयत्नात असलेल्या एकाला अटक

**वर्धा -** ज्ञानेश्वर नगर, म्हसाळा येथे गुरुदेव मोटर्स गॅरेजजवळ चोरी करण्याच्या प्रयत्नात अंधारात आपले अस्तित्व लपवून बसलेल्या एकाला सेवाग्राम पोलिसांनी अटक केली आहे. अयान जमालुद्दीन शेख (२४) रा. गाडगे नगर, म्हसाळा असे आरोपीचे नाव आहे. सेवाग्राम पोलीस रात्रीच्या पेट्रोलिंगवर असताना त्यांना गुरुदेव मोटर्स येथे अंधारात आपले अस्तित्व लपवून बसला असताना त्याला ताब्यात घेतले. त्याला विचारणा केली असता उडवाउडवीची उत्तरे दिल्याने पोलिसांनी अटक केली.

## निधन

### तुळसा दरणे



**वर्धा -** स्थानिक पद्मावती नगर आलोडी येथील तुळसाबाई अंबादास दरने यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्या ७८ वर्षाच्या होत्या. त्यांच्यावर स्थानिक हिंदू स्माशानभुमित अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे एक मुलगा आणि तीन मुली असा बराच मोठा आप्तपरिवार आहे. त्या कारंजा घाडगे येथील पंचायत समिती येथे कार्यरत असलेले वरिष्ठ सहाय्यक यशवंत दरने यांच्या त्या मातोश्री होय.

### वच्छला कोंडलकर



**वर्धा-** तालुक्यातील पवनूर येथील वच्छला नामदेव कोंडलकर यांचे ४ नोव्हेंबर रोजी मंगळवारी पहाटेचा सुमारास हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. त्या ८० वर्षाच्या होत्या. त्यांच्यावर आज स्थानिक हिंदू स्माशानभुमित अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पती, तीन मुल आणि एक मुलगी असा बराच मोठा आप्तपरिवार आहे. त्या पवनूर येथील सामाजिक कार्यकर्ते व प्रगतिशील शेतकरी गजानन कोंडलकर यांच्या त्या मातोश्री होय.

### इंदुबाई काकडे



**वर्धा -** स्थानिक जुनी म्हाडा कॉलनी पवनसूत नगर येथील रहिवासी इंदुबाई भगवंत काकडे (वय ९३) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात मोठा परिवार आहे. त्यांच्यावर स्थानिक मोक्षधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले, त्या जय पवनसुत हनुमान मंदिर देवस्थान ट्रस्टचे विश्वस्त तथा पत्रकार पवन काकडे यांच्या आजी होत्या.

# निवृत्तीवेतन धारकांना हयातीचा दाखला सादर करण्याचे आवाहन

**वर्धा-** जिल्हा कोषागार कार्यालय वर्धा येथून निवृत्तीवेतन घेत असलेल्या सर्व महाराष्ट्र राज्य शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झालेले अधिकारी व कर्मचारी निवृत्तीवेतनधारक व कुटूंब निवृत्तीवेतन धारकांनी दि.३० नोव्हेंबर पर्यंत हयातीचा दाखला सादर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे. जे निवृत्तीवेतन धारक, कुटूंब निवृत्तीवेतन धारक दि.३० नोव्हेंबर पर्यंत त्यांचा हयातीचा दाखला सादर करणार नाहीत, त्यांचे डिसेंबर महिन्याचे निवृत्तीचे वेतन स्थगित करण्यात येईल. निवृत्ती वेतन धारकांची अद्याक्षरनिहाय यादी त्यांच्या संबंधीत बँक शाखांकडे पाठविण्यात आली आहे. निवृत्तीवेतन धारक ज्या बँकेतून निवृत्तीवेतन घेतात त्या शाखेत नमुद कालावधीत हजर राहून यादीतील त्यांच्या नावासमोर शाखा व्यवस्थापकांसमोर साक्षरी करुन आपला मोबाईल क्रमांक, पॅन क्रमांक, आधार क्रमांक नमुद करावा.सदर यादी दि.३० नोव्हेंबर पर्यंत बँकेत उपलब्ध राहील. तसेच ज्या कुटूंब निवृत्तीवेतन धारकांचे वय ८० वर्ष किंवा त्यापेक्षा अधिक असेल त्यांनी आपल्या वयाचा पुरावा म्हणुन जन्म तारखेचा दाखला, आधार कार्ड, पॅन कार्ड तसेच पासबुकची छायांकित प्रत कोषागार कार्यालयास सादर करावेत जेणेकरुन त्यांना वाढीव निवृत्तीवेतन अदा करणे शक्य होईल, असे जिल्हा कोषागार अधिकारी यांनी कळविले आहे.

# कारंजाची सून दिव्या ढोले झाली चार्टर्ड अकाउंटंट

**कारंजा घा/जनमाध्यम**

जिद्द, चिकाटी आणि आत्मविश्वासाचा सुंदर संगम काय असतो, याचे जिवंत उदाहरण कारंजा येथील दिव्या ढोले हिने घालून दिले आहे. इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडिया (ICAI) तर्फे घेण्यात आलेल्या सीए फायनल परीक्षेत तिने यश संपादन करत शहराचं नाव उज्ज्वल केलं आहे.

दिव्याने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातून बी.कॉम. पदवी प्राप्त केली आहे.



अभ्यासू, शांत स्वभावाची आणि प्रामाणिक वृत्तीची ही मुलगी अनेक अडथळ्यांवर मात करत अखेर आपल्या स्वप्नाला आकार देण्यात यशस्वी ठरली. हा प्रवास खडतर होता, पण मी हार मानली नाही. पडले प्रत्येक वेळी, पण पुन्हा उभी राहिले, कारण माझं ध्येय स्पष्ट होतं एक दिवस माझ्या नावापुढे 'C.A.' लिहिलं जाईल, असं दिव्या सांगते.ती पुढे म्हणते, सीए परीक्षेत फक्त अभ्यास पुरेसा नसतो. सातत्य, आत्मविश्वास आणि योग्य नियोजन हेच यशाचं सूत्र आहे. स्वतःच्या चुका ओळखा आणि त्यातून शिका. प्रयत्न थांबले, तर स्वप्नही थांबतं तिच्या या यशामागे पालक मोरेश्वर आणि माया ढोबाळे, सासू-सासरे हेमंत आणि माधुरी ढोले, पती निखिल ढोले, दीर प्रभात तसेच भावंडं कुणाल, आरती, दीपा आणि अंकिता यांचे मोलाचे योगदान आहे. माझ्या प्रत्येक पडझडीत माझं कुटुंब माझ्या पाठीशी ठाम उभं राहिलं, हाच माझ्या यशाचा खरा पाया आहे, असं ती भावनिकपणे म्हणाली.दिव्या आता फायनान्स क्षेत्रात करिअर घडवत समाजात आर्थिक साक्षरतेचा प्रसार करण्याचं स्वप्न पाहते आहे. तिच्या या यशामुळे केवळ कुटुंबच नव्हे तर संपूर्ण कारंजा शहर आनंदाने उजळलं आहे. तिचं यश प्रत्येक तरुणासाठी प्रेरणादायी ठरत आहे, जो अपयशाला न जुमानता स्वप्नांच्या दिशेने चालत राहतो.

## पवनार महिला व्हॉलीबॉल संघ विजेता

# जिद्द,कौशल्य आणि संघभावनेच्या जोरावर जिल्ह्यात पहिला क्रमांक

**वर्धा/जनमाध्यम**



जिल्हा व्हॉलीबॉल संघटना व जिल्हा प्रशिक्षण केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने पार पडलेल्या जिल्हास्तरीय वरिष्ठ गट व्हॉलीबॉल अजिंक्यपद स्पर्धेत पवनारच्या महिला व्हॉलीबॉल संघाने दमदार खेळ सादर करत प्रथम क्रमांक पटकावला.

या ऐतिहासिक यशामुळे पवनार गावाचे नाव जिल्ह्यात अभिमानाने उजळले आहे.स्पर्धेत जिल्ह्यातील नामांकित संघांमध्ये चुरशीच्या लढती पाहायला मिळाल्या. मात्र पवनार संघाने अपूर्व संघभावना, अचूक वेळेचे भान आणि अखंड जिद्द यांच्या जोरावर प्रतिस्पर्ध्यांवर मात करत अजिंक्यपद आपल्या नावावर केले.समारोप प्रसंगी विजेत्या संघाला स्व. नामदेव दयाराम स्मृती ट्रॉफी प्रदान करण्यात आली. ही ट्रॉफी अड. श्रीनाथ आणि आशीष यांच्या हस्ते देण्यात आली.

संघाच्या विजयामागे प्रशिक्षकांचे मार्गदर्शन, खेळाडूंची अविरत मेहनत आणि संपूर्ण गावाचे प्रोत्साहन हेच बळ ठरले, असे मत व्यक्त करण्यात आले.या उल्लेखनीय यशानंतर पवनार गावात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

गावकऱ्यांनी महिला खेळाडूंवर फुलांची उधळण करत विजयाचा जल्लोष साजरा केला. आगामी स्पर्धांमध्येही पवनार संघाकडून असाच दमदार खेळ पाहायला मिळावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष - १३ अंक ३३६**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# शेती पंपांना दिवसा विद्युत पुरवठ्यासाठी शेकडो शेतकऱ्यांचे वीज वितरण कार्यालयासमोर धरणे

## -वीजपुरवठ्याच्या लपंडावाने शेती अडचणीत!

**मोर्शी /प्रतिनिधीः-** विज वितरण कंपनीने दिलेल्या व वेळापत्रकाप्रमाणे नियमित विज मिळत नाही. त्यामुळे शेतकरी त्रस्त झालेला आहे.रात्री वीज येते, पण शेतात जीव धोक्यात घालून काम करावं लागतं. साप, विंचू, वन्य प्राणी, चोर यांचा धोका कायम असतो. दिवसा वीजपुरवठा मिळेल, अशी शेतकरी आशा करतो पण दिवसा आली तरी बिघाड होतो आणि पुन्हा अंधारच. शेती करायची की वीजेच्या प्रतीक्षेत बसायचं?' असे उद्गार नेरपिंगळाई परिसरातील त्रस्त शेतकरी काढत आहेत.दिवसा शेतीला अखंडितपणे विज पुरवढा द्यावा या मागणी करता शेकडो शेतक-यांनी (दि.३१) विद्युत कार्यालयासमोर धरणे आंदोलन केले .

सध्या नेरपिंगळाईसह परिसरातील शेतकऱ्यांना आठवड्यातील काही दिवस दिवसा तर काही दिवस रात्री वीजपुरवठा मिळतो. पण दिवसा असतानाही वारंवार तांत्रिक बिघाडांमुळे वीजपुरवठा खंडित होतो. बिघाड दुरुस्तीला वेळ लागतो, कर्मचारी उपलब्ध नसतात. परिणामी शेतकऱ्यांना खाजगी लाईनमनकडूनच दुरुस्ती करून घ्यावी लागते आणि त्यासाठी मेहनताना व साहित्य खर्च स्वतःच्या खिशातून करावा लागतो.अनेक डीबी मधील उघड्या विद्युत तारा लोंबकडलेल्या आहेत. अनेक डीबी मधील विद्यूत साहित्य निकृष्ट दर्जाचे आहे . शेतकऱ्यांना रात्री अपरात्री फ्युज टाकायला जावे लागते . त्यामुळे प्राणहाणी होण्याची शक्यता आहे. आधीच रासायनिक खतं, फवारणीचे औषधं, मजुरी, डिझेल यांचे दर वाढलेले आहेत. त्यात आता वीजपुरवठ्याच्या बिघाडासाठीही खर्च करावा लागतो. शेतकऱ्यांना मोफत वीज नको, पण नियमित आणि दिवसा वीज द्या, एवढीच मागणी आहे,' असा संताप शेतकऱ्यांनी व्यक्त केला आहे. अनेक वेळा रात्री वीजपुरवठ्यामुळे अपघात, सर्पदंश, मोटारी जळणे, विजेचा धक्का लागणे अशा घटना घडल्या आहेत. दिवसा वीज दिल्यास उत्पादन वाढेल, पिकांना वेळेवर पाणी देता येईल आणि शेतीचा दर्जा सुधारेल. पण शासनाला शेतकऱ्यांच्या जीवाची, त्रासाची काहीच पर्वा नाही.'



महावितरणच्या अकार्यक्षम व्यवस्थेमुळे शेतकरी अक्षरशः हैराण झाले आहेत. वेळापत्रक ठरवलं जातं, पण त्या वेळेत वीज नसते. बिघाड दुरुस्तीला तासनतास वेळ जातो. 'वीज येईल की नाही, हे सांगता येत नाही. त्यामुळे पिकं कोमेजतात, मजूर रिकामे बसतात, आणि खर्च मात्र आमच्यावरच वाढतो,' अशी व्यथा शेतकऱ्यांनी व्यक्त केली.

दरम्यान, शेतकरी संघटनांनी प्रशासनाला इशारा दिला आहे की, जर तातडीने सततचा दिवसा वीजपुरवठा आणि बिघाडमुक्त सेवा व्यवस्था लागू केली नाही, तर नेरपिंगळाई व परिसरात मोठ्या प्रमाणावर शेतकरी आंदोलन छेडण्यात येईल.

शेतकऱ्यांशी चर्चा करण्यासाठी मोर्शीचे उपविभागीय अभियंता दिनेश भागवत, लेहेगाव सब स्टेशनचे अभियंता कल्पेश देवांग तसेच नेरपिंगळाईचे शाखा अभियंता कोकणे यांची उपस्थिती होती .

यावेळी उप अभियंता दिनेश भागवत यांनी शेतकऱ्यांचे प्रश्न समजावून घेऊन दिवसा विद्युत पुरवठा करण्यासंदर्भामध्ये सुरू असलेल्या उपाययोजनांची माहिती दिली व संपूर्ण मागण्यांच्या संदर्भामध्ये येत्या दोन दिवसात लेखी माहिती आंदोलक शेतकऱ्यांना देण्यात येणार असल्याचे सांगितले .यावेळी महाराष्ट्र राज्य किसान सभेचे राहुल मंगळे, गोपाल श्रीखंडे, बाळू पोटे, मनोज कोकाटे, उमेश कोकाटे, संजय सुने, निखिल वासनकर, अतुल पोटे, अंकुश डेहनकर, प्रमोद शिसट, महेंद्र शिसट, रवी वडनेरकर, अशोक देवळे, प्रभाकर टाकळे सह शेकडो शेतकरी उपस्थित होते.

# भाजप युवा मोर्चा जिल्हा उपाध्यक्षपदी अमोल इंगोले

**नांदगाव खंडेश्वर / प्रतिनिधीः-** भाजप युवा मोर्चा ची नवीन जिल्हा कार्यकारणी भाजप युवा मोर्चाचे जिल्हा अध्यक्ष सचिन इंगळे यांनी नुकतीच जाहीर केली. त्यामध्ये नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील धमक येथील भाजपाचे युवा कार्यकर्ते अमोल इंगोले यांची भाजप युवा मोर्चाच्या जिल्हा उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. यावेळी भाजपाचे जिल्हाध्यक्ष रविराज देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत अमोल इंगोले यांना नियुक्तीपत्र देण्यात आले.



भाजप युवा मोर्चाच्या जिल्हा उपाध्यक्षपदी नियुक्ती झाल्याबद्दल अमोल इंगोले यांचोवर तालुक्यातील भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# बैकुंठ चतुर्दशी निमित्त पाताळेश्वर महादेव मंदिरात अन्नकूट संपन्न

## -जय भोले अन्नकूट परिवाराचे आयोजन

**चांदूर रेल्वे/प्रतिनिधीः-** चांदूर रेल्वे जय भोले अन्नकूट परिवारातर्फे मांजरखेड कसबा येथील पाताळेश्वर मंदिरात सकाळी शिव दुग्ध जल अभिषेक, भजन, आरती, पूजा करण्यात आली. त्यानंतर निमंत्रित भाविकांनी अन्नकूट प्रसादाचा लाभ घेतला.



चांदूर रेल्वे जय भोले अन्नकूट परिवारातर्फे मांजरखेड येथील पाताळेश्वर मंदिरात शिव दुग्ध जल अभिषेक, भजन, आरती पूजेचे आयोजन करण्यात आले होते. नेहमीप्रमाणे यंदाही बैकुंठ चतुर्दशीनिमित्त स्थानिक मांजरखेड कसबा येथील पाताळेश्वर मंदिरात शिव दुग्ध जल अभिषेक, भजन, आरतीसह भव्य दिव्य अन्नकूट प्रसादीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी चांदूर रेल्वे, अमरावती, धामणगाव येथील निमंत्रित भाविक मोठ्या संख्येने अन्नकूटमध्ये सहभागी झाले होते.

प्रसादाचा लाभ जय भोले अन्नकुट परिवारातील सदस्य किशोर मोतीलाल गंगण, विजयकांत रामेश्वर भूत, नारायणदास भारुका, सुनील भूत, सचिन वर्मा, गोकुळ जालान, सुभाष जालान, देवेश वाजपेयी, पत्रकार गुड्डू शर्मा, विनोद अग्रवाल, कन्हैय्यालाल वाधवाणी, पवनेश राव, पंडित राणे, रवींद्र सिंह यांनी घेतला. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी किशोर नारायणदास पनपलिया, मनीष पनपलिया, अजय भूत, बंडू मुंधडा, दीपक गोयनका, अरविंद जैस्वाल, राधेश्याम गांधी यांनी परिश्रम घेतले.

चांदूर रेल्वे शहरात दिवाळी पूजेनंतर शहरात सत्यनारायण मंदिरातून अन्नकुट प्रसादला सुरुवात झाली.यामध्ये माणिकचंद जालान यांनी बालाजी मंदिरात अन्नकुट प्रसादाचे आयोजन केले होते. जगदंबा देवस्थानात सचिन वर्मा यांनी,तर रामदेवबाबा भक्त परिवाराने श्री कृष्ण मंदिर, रामदेव मंदिर अमरावती रोड येथे, मुनगढ गावातील भक्त परिवाराने अन्नकुट प्रसाद आयोजित केला होता.

# धामणा येथे एक करंजी दोन लाडू-अनाथ आदिवासी सोबत नाते जोडू अंतर्गत फराळ वाटप

## दिवाळीचा प्रकाश : संत गाडगेबाबा बालगृहाचा प्रेरणादायी उपक्रम

**दर्यापूर** - दिवाळी सण म्हटले की घरोघरी गोड-धोड पदार्थ, फराळ कुटुबीयांनसाठी कपड्यांची खरेदी आणी हजोरोंची फटाक्यांची आतीषबाजीचा उत्साह असतो. दरवर्षी प्रमाणे यावर्षी सुद्धा दिवाळी सणाचा आनंद घेत असतांना आपणही काही समाजाचे काही देण लागतो ही भावना जोपासत, एक करंजी दोन लाडू अनाथ, दिव्यांग, आदिवासी कुटुंबासोबत नाते जोडूंया उपक्रमाअंतर्गत दर्यापुर येथील श्री संत गाडगे महाराज बाल गृहाच्या वतीने दानशूर व्यक्तींच्या सहकार्याने तालुक्यातील गरजु नागरिकांसाठी दिवाळी फराळ वाटप कार्यक्रम घेण्यात आला

दर्यापूर तालुक्यातील धामोडी ग्राम पंचायत हद्दीतील धामणा पारधी बेड्यावर शनिवार दि.२ नोव्हेंबर रोजी या उपक्रमाला सुरवात झाली आहे. यावेळी वैद्यकीय अधिकारी डॉ.आश्विनी देवके, युवा सामाजिक कार्यकर्ते नितेश वानखडे, माजी जिल्हा परिषद सदस्य मनीराम पवार, गुणवंत हिंगणीकर, संजय चिंचोळकर, शिक्षक बँक संचालक तुळशीदास धांडे, आयोजक गजानन देशमुख, रोहिणी फाऊंडेशन अध्यक्ष किशोर ठाकूर, उपाध्यक्ष संतोष मिसाळ, कोषाध्यक्ष दत्ता कुंभारकर, संत गाडगेबाबा बालगृहाचे रितिका देशमुख, वैभव देशमुख, तोंगलाबाद येथील डॉ?.गोपाल जऊळकार, अरुण चव्हाण, प्रा.धनंजय देशमुख, विकास चव्हाण, रणजीत बिडकर, सुधाकर वाघमारे, सोपान जऊळकार, अमोल अंटबर, धामणा येथील रावसाहेब पवार, मगरसिंग भोसले व अंगणवाडी सेविका आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



धामणा येथे फराळ वाटप प्रसंगी उपस्थित अनाथ, अपंग, आदिवासी व मान्यवर मंडळी

# कौंडण्यपूर येथे आजपासून बौद्ध महोत्सव

**तिवसा/प्रतिनिधीः-** तालुक्यातील कौडण्यपूर येथे कार्तिक पौर्णिमेच्या शुभ पर्वावर दोन दिवसीय बौद्ध महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवामध्ये आज (ता.५) रोजी धम्मदेशना मार्गदर्शन व सामाजिक प्रबोधन, नवीन बुद्धविहाराचे भूमिपूजन समारंभ भदन्त सत्यानंद जी महाथेरो, यांच्या शुभहस्ते, तसेच खासदार बळवंत वानखडे, माजी मंत्री यशोमती ठाकूर, सरपंच प्रेमदास राठोड यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे.

सायंकाळी सात ते दहा वाजता निळ्या नभाचे, भीम बुद्ध गीतांचा बहारदार कार्यक्रम पपीता मनोहरे व संच सादर करणार आहे. ६ तारखेला धम्मदेशना व सामाजिक प्रबोधन आणि दुपारी २ ते ४ दरम्यान दान दाते यांचा सत्कार समारंभ, सायंकाळी सात ते दहा पर्यंत प्रसिद्ध गायक संविधान मनोहरे आणि संच यांचा भीम गीताचा कार्यक्रम होणार आहे.दोन दिवसीय बौद्ध महोत्सवात अनुयायीनी सहभागी व्हावे असे आवाहन प्रज्ञाशील धम्मविहार भीम टेकडी कौंडण्यपूर यांनी केले आहे.

# जिल्हात मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा उपक्रम सुरु होणार- शिक्षणाधिकारी

## सुंदर शाळा बनवा आणि लाखोंचे बक्षिसे जिंका

**अमरावती** - राज्यातील सर्व व्यवस्थापनांच्या आणि सर्व माध्यमांच्या शाळांसाठी राबविण्यात येणाऱ्या मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा' या अभिनव अभियानाच्या तिसऱ्या टप्प्यास शासनाची मान्यता मिळाली आहे. हे अभियान ३ नोव्हेंबर ते ३१ डिसेंबर या कालावधीत राबविण्यात येणार असून, एकूण ७२ कोटी २२ लाख रुपयांची बक्षिसे राज्यातील विजेत्या शाळांना दिली जाणार आहेत. सन २०२५-२६ मध्ये हे स्पर्धात्मक अभियान काही नवीन उपक्रमांसह राबविले जाणार आहे. त्यानुसार, या तिसऱ्या टप्प्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

या अभियानासाठी राज्यातील शाळांची विभागणी दोन गटांमध्ये करण्यात आली आहे. त्यामध्ये शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा, इतर सर्व व्यवस्थापनांच्या शाळा यांचा समावेश राहणार आहे. प्रत्येक स्तरावर या दोन्ही गटांमधून स्वतंत्र विजेते निवडले जाणार असल्याची माहिती अमरावती जिल्हा परिषदचे प्राथमिक शिक्षणाधिकारी सतिश मुगल यांनी दिली आहे. हा तिसरा टप्पा शाळांमधील २ स्पर्धात्मक गुणवत्ता आणि सौंदर्यवर्धन या दोन्ही बाबींना गती देईल असा विश्वास शिक्षण विभागाने व्यक्त केला आहे.

# पुष्पेन्द्र कुलश्रेष्ठ यांचे दर्यापूर येथे व्याख्यान

**दर्यापूर** : प्रखर राष्ट्रवादाचा शंखनाद म्हणून ओळख असलेल्या ज्येष्ठ पत्रकार व प्रभावी वक्ते पुष्पेन्द्र यांचे व्याख्यान दर्यापूर येथे कुलश्रेष्ठ सकल हिंदू समाजाच्या वतीने ६ नोव्हेंबर २०२५ ला संध्याकाळी ६ वाजता जिल्हापरिषद शाळेच्या प्रांगणावर आयोजित करण्यात आलेले आहे. देश, देव आणि धर्म कार्यावरील व्याख्यानासाठी प्रसिद्ध असलेले पुष्पेन्द्र कुलश्रेष्ठ यांचे भारत आणि विदेशात व्याख्याने होत असतात. येथे पहिल्यांदाच होत असलेल्या अशा व्याख्यानाचा लाभ दर्यापूरकरांनी घ्यावा, असे आवाहन सकल हिंदू समाजाच्या वतीने शिवाजी महाराज चौक येथे संपर्क कार्यालयात आयोजित बैठकीत करण्यात आले.

## जाहीर नोटीस

अमरावती येथील विद्यमान जिल्हा व सत्र न्यायाधीश-६, यांचे न्यायालय
किरकोळ दिवाणी अर्ज क.२३८/२०२५ — ने.ता.१७.११.२०२५

**अर्जदार :** १. प्रमोद गंगाराम आंबटकर, वय ६५ वर्षे, व्यवसाय - शेती
रा.कुऱ्हा, ता.तिवसा, जि.अमरावती

-- विरध्द --

**गैरअर्जदार :** निरंक

**मेंटल अॅण्ड हेल्थ कायद्याचे कलम ५३ व ५४ तसेच गार्डीयन अॅण्ड वार्डस् कायदा कलम ८ नुसार अर्ज**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी मानसिक व शारीरिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या व्यक्तिच्या नांवे असलेली खालील वर्णनाची मालमत्ता विकण्याची परवानगी मिळण्याकरीता वि.जिल्हा व सत्र न्यायाधीश-६, अमरावती यांच्या न्यायालयात रितसर अर्ज सादर केला आहे.

**संपत्तीचे विवरण**

**मौजा मुंडे करताराम दामोदर, प्रगणे मंगरुळ दस्तगीर, तालुका धामणगांव रेल्वे, जि.अमरावती येथे शेत सर्व्हे नं.४/२ क्षेत्रफळ ०.४४ हे.आर. व ०.२३ हे.आर असे एकुण ०.६७ हे.आर क्षेत्रफळ**

त्याअर्थी सदर अर्जाविरुध्द कारण दाखविण्यास अगर काही हरकती घ्यावयाची असल्यास अर्जदारांचे सर्व नातलग व हितसंबंधी यांना जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, त्यांनी दिनांक १७.११.२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता वि.जिल्हा व सत्र न्यायाधीश-६, अमरावती यांचे न्यायालयात स्वतः किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर व्हावे. वर नमुद केलेल्या तारखेस जर कोणीही हजर न झाल्यास सदरहू अर्जाची एकतर्फी सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

आज **दिनांक ०३.११.२०२५** रोजी माझे सहीनिशी व कोर्टाचे शिक्क्यानिशी दिला.

आदेशान्वये,
**सहायक अधीक्षक, (न्यायिक विभाग)**
जिल्हा व सत्र न्यायालय,
अमरावती
शिक्का

## जाहीर नोटीस

सर्वत्र लोकांना कळविण्यात येते की, माझे पक्षकार सुनिल सुखदेवराव गणविर, रा.काट आमला, ता.जि.अमरावती यांनी सौरभ विनोद गणविर, रा.शहापुर, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती यांचे विरुध्द मौजे काट आमला, ता.जि.अमरावती येथील गट क्रमांक व उपविभाग क्रमांक ६६/१,एकुण क्षेत्रफळ १ हे.१२ आर.यापैकी १/२ अविभाजीत हिस्साचे शेत जमीनीबाबत विद्यमान दिवाणी न्यायालय, अमरावती येथे दावा दाखल केला असून सदर दाव्याचा क्रमांक नियमित दिवाणी दावा क्र. ३४२/२०२५ असा असुन सदरचा दावा विद्यमान १८ वे सह दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात प्रलंबित आहे.

वर नमुद मिळकती बाबत वाद हा न्यायप्रविष्ठ असल्यामुळे व सदरचा १/२ अविभाजीत हिस्सा हा माझे पक्षकार सुनिल सुखदेवराव गणविर यांचे मालकी हक्काने ताब्यात असल्यामुळे सदरच्या मिळकतीबाबत कोणीही कोणताही व्यवहार कोणासोबतही करु नये, केल्यास तो माझे पक्षकारास बंधनकारक राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

**अमरावती**
**तारीख- ०४/११/२०२५**

**स्वाक्षरी/-**
**पक्षकाराची सही**

**स्वाक्षरी/-**
**अॅड. प्रसाद ह.पिंपळगावकर**
**मो.-९८२३७४८२७०**

जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्रमांक निविदा ०४१७/प्र.क्र.२४७/१७ मोप्र-१ दि.१८/१०/२०२३ चे प्रपत्र
**विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपुर**
(महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत उपक्रम)
**कार्यकारी अभियंता, उर्ध्व वर्धा पाटबंधारे विभाग, अमरावती यांचे कार्यालय,**
**पाटबंधारे वसाहत, शिवाजी नगर, अमरावती**
**दूरध्वनी क्रं - ०७२१- २६६२२८२/८३**
**Email-eedduwpamt@gmail.com**
**ई-निविदा सुचना क्र. १३ सन २०२५-२६**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने **कार्यकारी अभियंता, उर्ध्व वर्धा पाटबंधारे विभाग, अमरावती जलसंपदा विभाग,** महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकारांकडून खालील कामाकरिता ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ **https://mahatenders.gov.in** येथून डाउनलोड करण्यात यावीत. सविस्तर निविदा सुचना व ई-निविदेसोबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सुचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार **कार्यकारी अभियंता, उर्ध्व वर्धा पाटबंधारे विभाग, अमरावती** यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास **Web-http:www.mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

| अ.क्र. | कामाचे नांव | जिल्हा | रक्कम (रु.) |
|---|---|---|---|
| ०१ | राजुरवाडी शाखे अंतर्गत १) हशिमपुर लघु कालवा क्र.२ वरील अंत्य वरील लाभधारकांचे तक्रारीनुसार कालव्याचे टेल वरील संधानकाचे काम. २) उजवा मुख्य कालव्यावरील सा.क्र.७२३७ मी.जवळील नाल्यावरील पाईप पुलाचे लादी मोरी मध्ये बांधकाम करणे. ३) उजव्या मुख्य कालव्यावरील साखळी क्र. ६००० मी.जवळील नाल्यावरील पाईप पुलाचे लादी मोरी मध्ये बांधकाम करणे. | अमरावती | ९३९४२९८/- |

ई-निविदा उपलब्ध कालावधी :- दिनांक **०६/११/२०२५** ते दिनांक **१३/११/२०२५**
ई-निविदा उघडण्याचा :- दिनांक **१७/११/२०२५**

**जा.क्र. ३२२५/उवपावि/नि.लि./जाहिरात/२०२५ दिनांक ०३ नोव्हेबर २०२५**

**सही/ -**
**कार्यकारी अभियंता**
**उर्ध्व वर्धा पाटबंधारे विभाग,**
**अमरावती**

**विमाका-अम/जाहि./६७९/२०२५-२०२६**

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती

वि.श्रीमती एन.सी.सोरटे ६ वे सह दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात

**किरकोळ अर्ज - २४१८/२०२५**
**श्री हुसेन विरुध्द निरंक**
**पुढील तारीख २७.११.२०२५**

### जाहीरनामा/सायटेशन

अर्जदार : **1) Hussain Khan Hasan Khan**
Age 61 yrs., Occu.- Labour,
R/o. Gulista Nagar, Near Masjid,
Amravati, Tq. & Dist. Amravati

-- विरुध्द -

**गैरअर्जदार : -** निरंक

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत हसन खॉ दुले खॉ हे दि.०५/०३/२०१६ रोजी अमरावती, ता.जि.अमरावती येथे मयत झाले. अर्जदार हुसेन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हू मयत यांचे वारसांचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **श्री.हुसेन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबित दिसल्यास त्यांना सदरहू मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दिनांक २८.१०.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशान्वये,
**सहायक अधीक्षक,**
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अमरावती
शिक्का

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
## विद्यमान श्री.एस.बी.कळदाते, सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र.२४५८/२०२५
**ज्ञानेश्वर -वि- निरंक**
पुढील ता.२२.१२.२०२५

### जाहीरनामा/सायटेशन

**अर्जदार :**
१. ज्ञानेश्वर शंकरराव देशमुख, वय ८१ वर्षे, व्यवसाय - निवृत्त
रा.जयंत कॉलनी, दस्तूर न गर, अमरावती
२. स्वप्निल ज्ञानेश्वर देशमुख, वय ४६ वर्षे, व्यवसाय - नोकरी
रा.फ्लॅट नं.१२०१, टॉवर-७ सी ब्रीज टॉवर सेक्टर-१६, ऑफ पाल बीच रोड नेरुल पश्चिम नवी मुंबई ठाणे
३. सौ.श्श्वेता अनिकेत पाटील, वय ४१ वर्षे, व्यवसाय - नोकरी
रा.ए-८०४, द फाईव समिट्स अपार्टमेंट रोड नं.१०, सत्य साई मेडिकल कॉलेज आणि हॉस्पीटल बेंगलुरु कर्नाटक
४. कु.गौरी स्वाती प्रदीप माहोरे, वय २४ वर्षे, व्यवसाय - नोकरी
रा.ज्ञानेश्वर शंकर देशमुख, जयंत कॉलनी, दस्तूर नगर अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत सौ.सरोज ज्ञानेश्वर देशमुख** यांचे दिनांक **१८.०७.२०१९** रोजी **अमरावती** येथे निधन झाले. **अर्जदार ज्ञानेश्वर शंकरराव देशमुख व ईतर** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **ज्ञानेश्वर शंकरराव देशमुख व ईतर** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**३०.१०.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती
शिक्का

**मा.दिवाणी न्यायाधीश, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर,यांचे न्यायालयातील**
किरकोळ (R.M.J.C.) अर्ज क्र.२८४/२०२५ — ने.ता.१०.१२.२०२५

**अर्जदार :**
१. रंजना ओंकार पोटे,
२. शुभम ओंकार पोटे
रा.दोघेही रा.बस स्टॉप जवळ, वार्ड नं.४, हनुमान मंदिराजवळ, लोणी टाकळी, ता.नांदगांव खंडे., जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** निरंक

ज्याअर्थी मयत **ओंकार गोविंदराव पोटे** यांचा मृत्यू दि.**१२.१२.२०२३** रोजी श्रीकृष्ण हॉस्पीटल, अमरावती, ता. जि.अमरावती येथे झाला. मयतांचे अर्जदार नं.१ ही पत्नी व अर्जदार नं.२ हा मुलगा आहे. मयत यांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. करीता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदाराने विद्यमान न्यायालयात **मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परि.२** अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस **सकाळी १०.३०** वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक **२९ ऑक्टोबर २०२५** रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी दिले.

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
मा.दिवाणी न्यायालय
नांदगाव खंडेश्वर
शिक्का

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक ५९**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## शहर काँग्रेस कमिटीच्यावतीने

# महानगरपालिकेवर 'जवाब दो आंदोलन'







## कचरा माफियांवर कारवाई होणार

**अमरावती/का.प्र.**

शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने महानगरपालिकेवर 'जवाब दो आंदोलन' करण्यात आले. काँग्रेसच्या आंदोलनाने प्रशासन झाले जागे झाले आणि कचरा माफियांवर कारवाई करण्याचे आश्वासन मनपा आयुक्तांनी दिले. यावेळी विविध घोषणांनी परिसर दणाणून गेला होता.

'कचरा माफिया हटाव, अमरावती बचाव', 'कचरा माफियांना संरक्षण देणाऱ्या लोकप्रतिनिधींचा निषेध असो', 'जनतेच्या जीवाशी खेळणाऱ्या प्रशासनाचा निषेध असो', 'कचरा माफियांवर कारवाई झालीच पाहिजे' अशा घोषणांनी परिसर दणाणून सोडला. आंदोलनानंतर काँग्रेसच्या शिष्टमंडळाने आयुक्त तथा प्रशासक यांना निवेदन सादर करून कचरा माफियांवर गुन्हे दाखल करण्याबाबत सविस्तर चर्चा केली. लोकप्रतिनिधींचा दबाव झुगारून जनतेचा कचरा माफियांच्या विळख्यातून मुक्त करावा, अशी मागणी करण्यात आली. यावर आयुक्तांनी येत्या काही दिवसांत कचरा माफियांचा योग्य विल्हेवाट लावून गुन्हे दाखल करण्याचे सकारात्मक आश्वासन दिले. अमरावती शहरातील स्वच्छतेसंदर्भात काँग्रेस पक्ष नेहमी अग्रेसर राहील व जनतेच्या हितासाठी हा लढा असाच सुरू राहील, असा विश्वास शहराध्यक्ष बबलू शेखावत यांनी व्यक्त केला.

याकाँग्रेसच्या या यशस्वी आंदोलनामुळे अमरावती शहरातील जनतेला स्वच्छतेच्या संदर्भात मोठा दिलासा मिळणार असून, कचरा माफियांचा काळा व्यवसाय लवकरच संपुष्टात येईल, असा विश्वास व्यक्त होत आहे.

याप्रसंगी प्रामुख्याने अमरावती शहर काँग्रेस कमिटी अध्यक्ष बबलू शेखावत, माजी महापौर विलास इंगोले, माजी महापौर मिलिंद चिमोटे, माजी स्थायी समिती सभापती बाळासाहेब भुयार, माजी नगरसेवक प्रदीप हिवसे, माजी नगरसेवक सलीम बेग, माजी महापौर अशोक डोंगरे, प्रदेश सचिव आसिफ तवक्कल, प्रदेश सचिव नजीर खान बी. के. फिरोज खान, महिला काँग्रेस अध्यक्षा जयश्री वानखडे, युवक काँग्रेस शहर जिल्हाध्यक्ष निलेश गुहे, अब्दुल रफीक पत्रकार, सुजाता झाडे, शोभा रवींद्र शिंदे, वंदना थोरात, अनिला काझी, मैथिली पाटील, रोमिना माँटेरो, सुचिता वणवे, शिल्पा राऊत, संकेत कुलट, नितीन काळे, विक्की वानखडे, सुनील पडोळे, विजय वानखडे, गजानन जाधव, सुनील जावरे, गुड्डू हमीद, अफजल चौधरी, प्रभाकर वळसे, राजीव भेले, गजानन राजगुरे, संजय बोबडे, प्रकाश पहूरकर, सर्वेश खांडे, रफीकभाई चिकुवाले, डॉ. मतीन अहेमद, डॉ. अबिद हुसैन, सादिक शाह, अभिनंदन पेंढारी, दीपक हुंडीकर, अविनाश पांडे, राजू मसराम, मोहम्मद साबीर, सुरेश रत्तावा, रमेश राजोटे, जावेद साबीर, किरण सौरकर, प्रमोद इंगोले, संदेश जैन, सतीश मेटांगे, रोहन चिमोटे, अमर देशकर, विजय बर्वे, किशोर रायबोले, सौरभतायडे, जुबेर भाई, मोहम्मद निजाम, कलाम ठेकेदार, प्रदीप अरबट, श्रीकांत नागरीकर, अरुण जैस्वाल, अजीम ठेकेदार, अनिल तायडे, इस्त्रार आलम, सचिन निकम, संजय मोरे, अरुण आंदोलनात काँग्रेसचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते, सामान्य नागरिक व स्वच्छता प्रेमींनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.

## जिल्हास्तरीय युवा महोत्सव १९ व २० नोव्हेंबरला

**अमरावती/का.प्र.**

युवकांच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्यासह त्यांच्यातील सुप्त गुणांना वाव देण्यासाठी अमरावती येथे जिल्हास्तरीय युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात येणार आहे. जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालया तर्फे विमलाबाई देशमुख सभागृहात १९ ते २० नोव्हेंबर दरम्यान हा महोत्सव होणार आहे.युवा महोत्सव सांस्कृतिक आणि नवोपक्रम या संकल्पनेवर आधारित राहणार आहे. यात शिवाजी विज्ञान उद्यान महाविद्यालयात नवोपक्रम ट्रॅक विज्ञान प्रदर्शन आयोजित करण्यात येईल. या महोत्सवात युवक-युवतींना विविध स्पर्धांमध्ये भाग घेता येईल. सांस्कृतिक स्पर्धेतील लोकगीत आणि लोकनृत्यात १० जणांना सहभाग घेता येईल. युवा महोत्सवात सहभागी होणाऱ्या स्पर्धकांसाठी वयोमर्यादा ही १५ ते २९ वर्षापर्यंत राहणार आहे. स्पर्धेसाठी अर्ज करण्याची अंतिम मुदत १५ नोव्हेंबर आहे. स्पर्धक महाराष्ट्राचा रहिवासी असावा. विहित नमुन्यातील इंग्रजीमध्ये ओळखपत्र, आधार कार्ड जन्म तारखेचा दाखला, ही कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे. प्रत्येक सहभागी स्पर्धकाला माय भारत पोर्टलवर नोंदणी करणे अनिवार्य आहे. महोत्सवात प्रथम क्रमांक पटकावणाऱ्यांची निवड विभागस्तरीय आणि त्यानंतर राज्यस्तरीय युवा महोत्सवासाठी केली जाईल. युवा महोत्सवात युवकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी गणेश जाधव यांनी केले.



## भास्कर आखरे यांचा सेवापुर्ती व सैनिक सन्मान सोहळा

**नेरपिंगळाई/वार्ताहर**

भारतीय सेनेमध्ये उत्कृष्ट सेवा प्रदान केलेल्या वीर जवानांचा सन्मान सोहळा तसेच जि. प. हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय वाढोणा रामनाथ येथून सेवानिवृत्त झालेले माध्यमिक शिक्षक भास्कर आखरे यांचा सेवापुर्ती निमित्त सत्कार सोहळा ५ नोव्हेंबर रोजी दुपारी ११ ते २ पर्यंत स्थानिक विद्या निकेतन इंग्लिश स्कूल मध्ये आयोजित करण्यात आला आहे.

याप्रसंगी, माजी सैनिक प्रकाश भोपळे,अध्यक्ष महाराष्ट्र के. सी. एन. क्लब राष्ट्रीय सेवाभावी संघटना, ॲड. प्रभाकर वानखडे, संस्थापक अध्यक्ष महात्मा फुले लोक विद्यापीठ, अमरावती, शहर काँग्रेस कमिटी शिक्षक सेलचे अध्यक्ष प्रा. प्रदीप शेवतकर तसेच आदी मान्यवर विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहतील. सदर सोहळ्या करिता निमंत्रीत मान्यवर व गावकरी मंडळी यांनी उपस्थित रहावे असे आवाहन आयोजक कोमल व श्याम आखरे यांनी केले आहे.

## नवीन शासन निर्णयानुसार पहिले मूत्रपिंड प्रत्यारोपण यशस्वी

### अमरावती सुपर स्पेशालिटीत नवा अध्याय

**अमरावती/का.प्र.**

येथील विभागीय संदर्भ सेवा रुग्णालयात (सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल) महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजना आणि आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना यांच्या एकत्रित अंमलबजावणीच्या नवीन शासन निर्णयानुसार पहिले मूत्रपिंड प्रत्यारोपण यशस्वीरित्या पूर्ण झाले. हे रुग्णालयातील एकूण ५९ वे मूत्रपिंड प्रत्यारोपण ठरले आहे.

चांदूर बाजार येथील ६३ वर्षीय राजेंद्र माकोडे यांना डॉक्टरांनी मूत्रपिंड प्रत्यारोपणाचा सल्ला दिला होता.पतीच्या भविष्याचा विचार करून त्यांची पत्नी कांता राजेंद्र माकोडे (५५) यांनी स्वतःची एक किडनी दान करण्याचा निर्णय घेतला आणि पतीला नवीन जीवनदान दिले. सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये हे ५९ वे यशस्वी प्रत्यारोपण पार पडले.

## लाडकी बहीण योजनेच्या ई-केवायसीसाठी धावपळ

### १८ नोव्हेंबरपर्यंत प्रक्रिया सुरू

**अमरावती/का.प्र.**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची ई-केवायसी केली नाही. तरी पैसे मिळणार अशी चर्चा सुरू झाल्यामुळे महिलांमध्ये गोंधळ निर्माण झाला आहे. शहरासह जिल्ह्यात सध्या माझी लाडकी बहीण योजनेच्या ई-केवायसी प्रक्रियेसाठी महिलांची सेतू केंद्रांवर गर्दी वाढली आहे. ई-केवायसीची डेडलाईन १८ नोव्हेंबर असल्याने आता पुन्हा धावपळ वाढली आहे.

या योजनेंतर्गत सर्व पात्र महिलांना ई-केवायसी करणे बंधनकारक केले आहे. शासनाने ३० नोव्हेंबर ही अंतिम तारीख निश्चित केली होती. प्रक्रिया जलद पूर्ण करण्याचे निर्देश दिले आहेत. या पार्श्वभूमीवर शासनपातळीवर झालेल्या मंत्रालयातील बैठकीनंतर महिला व बाल कल्याण मंत्री यांनी १८ नोव्हेंबरपर्यंत ई-केवायसीची प्रक्रिया सुरू राहणार असल्याचे स्पष्ट केले आहे. विधवा, घटस्फोटित महिलाबाबत कुठलाही निर्णय घेण्यात आला नाही. त्यामुळे लाडकी बहीण धाकधूक वाढली आहे.

**आता घरबसल्या ई-केवायसी**

ई-केवायसी करण्याची सोपी पद्धत आपल्या, मोबाइलमध्ये गुगल क्रोमवर माझी लाडकी बहीण ई-केवायसी असे




शोधल्यास https://ladkibhayan.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर थेट सुविधा उपलब्ध आहे. यात स्वतःचा आणि पतीचा अथवा वडिलांचा आधार क्रमांक टाकून घरबसल्या ई-केवायसी करता येते.

विधवा, घटस्फोटितांमध्ये वाढली चलबिचल सध्या ई-केवायसी प्रक्रियेसाठी दोन आधारकार्ड आवश्यक असल्याने विधवा आणि घटस्फोटित महिलांसमोर अडचणी उभ्या राहिल्या आहेत. मृत पावलेल्या पतीच्या आधारकार्डशी मोबाइल नंबर लिंक नसल्यामुळे प्रक्रिया रखडलेली आहे.

## महिलेचा विनयभंग

**अमरावती:** शेतात जात असलेल्या महिलेचा अश्लील इशारे करून तसेच शरीराला स्पर्श करून विनयभंग करण्यात आल्याची घटना तालुक्यातील एका गावात घडली. महिलेच्या तक्रारीवरून नांदगाव खंडेश्वर पोलिसांनी ५५ वर्षीय निवृत्ती तुळशीराम पोपळघाटे यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे. फिर्यादीनुसार सदर महिला २ नोव्हेंबररोजी शेतात जात होती.पुढील तपास सुरू आहे.



# नंदुराबाद शिवारात उभ्या सोयाबीन पिकावर चालविला रोटावेटर

### भावघट, कमी उत्पादन आणि जास्त खर्चामुळे शेतकऱ्याचा हृदयद्रावक निर्णय

**चांदुर रेल्वे/वार्ताहर**

शेतकऱ्याच्या घामाने ओथंबलेल्या मातीत उगवलेले सोनेरी सोयाबीन अखेर मातीमोल झाले. सोयाबीनचे यंदा जास्त पावसाने होणारे कमी उत्पन्न, त्यातच घटलेले भाव, वाढलेला मजुरी खर्च आणि शेतमालाला न मिळणारा योग्य दर या संकटाने कंटाळून एका शेतकऱ्याने स्वतःच्या उभ्या पिकावरच रोटावेटर चालवून टाकले. ही घटना सोमवारी सुलतानपूरजवळील नंदुराबाद शिवारातील असून, या घटनेने परिसरातील शेतकरी वर्ग हळहळला आहे.

चांदूर रेल्वे तालुक्यातील घुईखेड येथील शेतकरी धीरज नेवारे यांचे सुमारे चार एकर शेती सुलतानपुर जवळील क्षेत्र नंदुराबाद (ता. नांदगाव खंडेश्वर) शिवारात गट क्रमांक ८७/२ आहे. याच शेतात त्यांनी यंदा मेहनतीने सोयाबीनची लागवड केली होती.पावसाचे योग्य प्रमाण, वेळेवर मशागत आणि कीड नियंत्रण सर्व काही नियोजनबद्ध झाले होते. सततच्या पावसाने पिक अपेक्षेप्रमाणे कमी आले होते. त्यातच बाजारात सोयाबीनच्या दराने कडेलोट झाल्याने, आणि त्यावर मजुरी व काढणीचा खर्च वाढल्याने, शेतकऱ्याने खर्चही निघणार नाही हे लक्षात घेत पिक काढण्याऐवजी नष्ट करण्याचा निर्णय घेतला.सोमवारी सकाळी धीरज नेवारे यांनी आपल्या शेतात रोटावेटर चालवून उभे सोयाबीन पिक मातीमध्ये मिसळले.त्या क्षणी शेताच्या कडेला उभे असलेले काही गावकरीही निशब्द झाले. काहींच्या डोळ्यांत अश्रू तरळले. 'एवढी मेहनत करूनही काही हाती येत नसेल, तर शेतकरी काय करणार? असा प्रश्न त्यांच्या चेहऱ्यावर उमटला होता.

या घटनेने परिसरातील शेतकरी वर्गात संताप आणि हतबलता वाढली आहे. अनेक शेतकऱ्यांचे पिक सध्या उभे आहे; परंतु भाव मिळण्याची खात्री नसल्याने तेही असमंजस अवस्थेत आहेत. शेतकरी नेते - 'शेती ही केवळ व्यवसाय नाही, ती भावना आहे. पिकावर रोटावेटर चालविणे म्हणजे शेतकऱ्याच्या अंतःकरणावर आघात होणे. अशा घटनांनी सरकारने जागे व्हावे आणि खरी शेतकरीहिताची धोरणे आणावीत.'

**धीरज नेवारे यांनी सांगितले, 'दरवर्षी पेरणी पासून काढणीपर्यंत जवळपास तीस ते चाळीस हजार रुपयांचा खर्च येतो. यंदा बाजारात भाव घसरले आहेत. काढणी, मळणी, मजुरीचा खर्च धरला तर काहीच शिल्लक राहत नाही. अशा परिस्थितीत पुढचा हंगाम कसा काढायचा, हा मोठा प्रश्न आहे.'**

# संक्षिप्त

## अखिल भारतीय रिपब्लिकन पक्षाच्या वतीने आढावा बैठक



**शिराळा -** अमरावती येथील जिल्हा परिषद रेस्ट हाऊसमध्ये मिलिंद भाऊ तायडे यांच्या वतीने अखिल भारतीय रिपब्लिकन पक्षाची आढावा बैठक नुकतीच आयोजित करण्यात आली. होणाऱ्या आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकी विषय आपल्या कार्यकर्त्यांना व पदाधिऱ्यांना मार्गदर्शन केले.अखिल भारतीय रिपब्लिकन पक्ष ताकदीने पंचायत समिती व जिल्हा परिषद मैदानात उतरणार असल्याचे त्यांनी या बैठकीला सांगितले. तर संचालन अनिल बादशे यांनी केले. यावेळी कृउबास संचालक मिंलिदभाऊ तायडे, विजयभाऊ गायकवाड संजयराव भालेराव, अनिल बादशे डॉ अवधूत शेंडे, चंदुभाऊ कांबळे गजानन सुखदान, पंजाबराव सुखदान, आकाश रामटेके दिनेश गाडगे रोहित गवई, निखिल वेगने आदी उपस्थित होते.

## उमेद कर्मचाऱ्यांकडून नाविन्यपूर्ण उपक्रम!



**मोर्शी -** मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत मोर्शी तालुक्यातील सर्व ६७ ग्रामपंचायत मध्ये महाराष्ट्र जीवनोन्नती अभियान सर्व उमेद कर्मचाऱ्यांनी गटविकास अधिकारी स्वप्निल मगदूम यांच्या नेतृत्वात एकाच दिवशी ग्रामस्वच्छता अभियान व विविध उपक्रम राबवून अभियानाची जनजागृती केली.यामध्ये गावातील सरपंच,उपसरपंच, सदस्य,ग्रामपंचायत अधिकारी,अंगणवाडी सेविका,आशा वर्कर, उमेद समुदाय संसाधन व्यक्ती,गावातील बचत गटाचे सदस्य,ग्राम रोजगार सेवक, स्वच्छाग्रही ग्रामपंचायत कर्मचारी,पोलीस पाटील,तंटामुक्त समिती अध्यक्ष आणि विविध विभागाच्या कर्मचारी यांच्या संयुक्त सहभागाने अतिशय नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात आला. मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाच्या पार्श्वभूमीवर सदर उपक्रमाची रूपरेषा आखण्यात आली होती.गावकऱ्यांनी या जनजागृती अभियानात उस्फूर्तपणे सहभाग घेऊन स्वच्छता अभियान राबविण्यात आले.यावेळी सहाय्यक गटविकास अधिकारी प्रीर्ती खटिंग, विस्तार अधिकारी सुधाकर भिवगडे, भोजराज पवार,विजय गुल्हाने यासह पंचायत समितीचे सर्व अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

## ॲडिशनल सीईओ ठमकेंनी स्वीकारला पदभार

**अमरावती -** जिल्हा परिषदेचे नवीन अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून विनय ठमके यांनी सोमवारी पदभार स्वीकारला आहे.



ठमके यांच्या काही दिवसांपूर्वी अतिरिक्त सीईओ म्हणून शासनाने बदली केली होती. मात्र मध्यंतरी काही अडचणीमुळे ते रूजू होवू शकले नव्हते. परंतु त्यांनी अतिरिक्त सीईओ पदाचा पदभार प्रकल्प संचालक प्रीती देशमुख यांच्याकडून स्वीकारला. ठमके यांनी काही वर्षांपूर्वी येथे याच पदावर काम केले आहे. पदभार स्वीकारताना सीईओ संजिता महापात्र यांच्यासह डेप्युटी सीईओ श्रीराम कुलकर्णी, बाळासाहेब बायस, बाळासाहेब रायबोले, बांधकाम विभागाने कार्यकारी अभियंता दिनेश गायकवाड, सुनील जाधव, संजय घाणेकर व अन्य अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

## सार्वजनिक ग्रंथालयांची नोंदणी अनिवार्य

**मोर्शी -** शासनाने मोर्शी तालुक्यातील सर्व सार्वजनिक ग्रंथालयांची नोंदणी नॅशनल लायब्ररी पोर्टलवर करणे बंधनकारक केले आहे. या पार्श्वभूमीवर माहितीपर कार्यशाळेचे आयोजन लालबहादूर शास्त्री नगर वाचनालया करण्यात आले.कार्यशाळेत ग्रंथालय संघाचे सक्रिय सदस्य सौरभ मालवीय यांनी मार्गदर्शन करताना नोंदणी प्रक्रियेविषयी सविस्तर माहिती दिली.

त्यांनी आवश्यक कागदपत्रे, अर्ज प्रक्रिया, प्रणालीतील प्रविष्ट्या तसेच तांत्रिक बाबी यांचे स्पष्टीकरण परिपूर्णपणे मांडले.या प्रसंगी लालबहादूर शास्त्री नगर वाचनालयाचे भाग्यश्री राठोड, शंकरराव ठाकरे, श्यामभाऊ आजनकर, अनिल चिखले, सुरेंद्र वानखडे, निलेश तट्टे, गौरव भोंबल, संजय पांडव, सुभाष भोयर, वैभव माहुरे, अनंत फांजे, सद्धानंद मोहोड, उमेश तायडे, प्रशांत कांडलकर आदी उपस्थित होते.

## खल्लार ते शेगाव पायदळ पालखी सोहळ्याचे आयोजन

**खल्लार -** दरवर्षीप्रमाणे याही वर्षी कार्तिक मासानिमित्य खल्लार ते श्री क्षेत्र सोहळ्याचे आयोजन दि ६ नोव्हेंबर ते १४ नोव्हेंबर पर्यंत करण्यात आले आहे.

या पायदळ पालखी सोहळ्याचे १४ वे वर्ष आहे.

या पायदळ पालखी सोहळ्याची सुरुवात ही दि ६ ला खल्लार येथून होणार असून ही पालखी बेंबळा खुर्द,बेंबळा बु,साखरी, घोडसगाव, कापूसतळणी, टाकरखेडा मोरे, अंजनगाव, सातेगाव फाटा, चौसाळा, पणज, अकोली जहागीर, आकोलखेड, आकोली, अकोट. लोहारी, मुंडगाव, रौदळा, पंचगव्हाण, घोडगाव कविठा, उमरी, अंदुरा, लोहारा, या मार्गाने दि १४ नोव्हेंबरला शेगाव येथे पोहचणार आहे. या पालखी सोहळ्यात नागरिकांनी मोठया प्रमाणात उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# दोन दुचाकींचा अपघात, दोघे ठार

## दर्यापूर-अकोला मार्गावर घटना






**मागील ३ दिवसात दर्यापूर तालुक्यात दोन अपघातात चार जणांचा मृत्यू झाला आहे. रविवारी (दि. २) दर्यापूर मूर्तिजापूर मार्गावर झालेल्या अपघातात दोघांचा मृत्यू झाला होता. ती घटना ताजी असतांना आज (दि.४) दुसऱ्या अपघातात पुन्हा दोघांचा मृत्यू झाला आहे.**

**खल्लार/प्रतिनिधीः** दोन दुचाकीच्या भीषण अपघातात दुचाकीस्वार दोघांचा घटनास्थळीच मृत्यू झाल्याची घटना। दर्यापूर-अकोला मार्गावर गोळेगाव फाट्याजवळ मंगळवारी (दि.४) दुपारी १२:३० वाजता दरम्यान घटना घडली आहे. पाडुरंग गणेश राठोड (वय ४६ रा. खोलापुर गेट दर्यापूर ) व मंगेश रामेश्वर जायले (वय ४४, रा.रविनगर, अमरावती) अशी अपघातातील मृतकांची नावे आहेत.

घटनेच्यावेळी अपघातातील पांडुरंग राठोड हे दुचाकी क्रमांक एमएच २७ डी.बी.८९१९ ने आपल्या मुलींची प्रसुती झाल्यामुळे अकोला येथे भेटण्यासाठी जात होते. तर त्याचवेळेस अमरावती येथून मंगेश जायले हे दुचाकी क्रमांक एम.एच.२७डी.जे.१७२७ ने दर्यापूर मार्गे कटचार गावाला सासुरवाडीला जात होते. दरम्यान गोळेगाव फाट्यानजिक दोन्ही दुचाकींचा अपघात झाला. (पान २ वर)

# उमेदवारांना प्रचारासाठी मिळणार फक्त पाच दिवस

## अपक्षांसमोर मतदारापर्यंत पोहोचण्याचे आव्हान

### -नगरपालिका व नगरपंचायत निवडणुक







अमरावती/प्रतिनिधीः- नगरपालिका व नगरपंचायत निवडणुकीची घोषणा करण्यात आली आहे. २ डिसेंबर रोजी निवडणुकीसाठी मतदान होणार आहे तर ३ तारखेला निकाल समोर येणार आहे. निवडणुकीची प्रक्रिया १० नोव्हेंबर पासून सुरु होणार आहे. जनतेमधून नगराध्यक्षाची निवड होणार आहे. निवडणूक प्रक्रियेकडे पाहिल्यावर लक्षात येते की २८ दिवसात ही प्रक्रिया संपुष्टात येत आहे. उमेदवारांना प्रचारासाठी फक्त पाच-सहा दिवस मिळणार आहे. या पाच दिवसात अपक्ष उमेदवारांसमोर मोठे आव्हान आहे.प्रत्येक मतदारापर्यंत पोहोचण्याची कसोटी त्यांच्यासमोर राहणार आहे. मंगळवारपासून निवडणुकीची आदर्श आचारसंहिता लागू झालेली आहे. २१ नोव्हेंबर नामांकन परत घेण्याची अंतिम तारीख आहे. यानंतर २६ नोव्हेंबर रोजी (पान २ वर)

# अपहरण केलेल्या तीन अल्पवयीन मुलांची सुटका, अट्टल आरोपी जेरबंद



वणी/प्रतिनिधीः- जिल्ह्यातील अपहरण आणि हरवलेल्या बालकांचा शोध घेण्यासाठी पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांच्या मार्गदर्शनाखाली १ नोव्हेंबरपासून सुरू करण्यात आलेल्या 'ऑपरेशन शोधा' मोहिमेअंतर्गत स्थानिक गुन्हे शाखा यवतमाळ यांनी मोठी कामगिरी बजावली आहे. या मोहिमेत मारेगाव पोलिस ठाण्यात नोंद असलेल्या तीन अल्पवयीन मुला-मुलींच्या अपहरणप्रकरणी आरोपीला अटक करून बालकांची सुखरूप सुटका करण्यात आली.

सदर घटना मारेगाव पोलीस ठाण्यात अपराध क्र. ३०९/२०२५ कलम १३७(२) भा.दं.वि. अन्वये नोंद होती. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला ३ नोव्हेंबर रोजी गुप्त माहिती मिळाली की, या प्रकरणातील आरोपी देविदास अंगदास वावरे (वय ४४, रा. शिवाजी पुतळा जवळ, पांढरकवडा, मूळगाव किनगाव ता. हिंगणघाट, जि. वर्धा) हा तीन अल्पवयीन बालकांसह वर्धा जिल्ह्यात लपून राहत आहे. ही माहिती खात्रीशीर असल्याचे लक्षात घेऊन गुन्हे शाखेच्या पथकाने वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली तातडीने सापळा रचून आरोपीला किनगाव येथून ताब्यात घेतले. अटक करण्यात आलेल्या आरोपीवर (पान २ वर)

# सिंधी समाजाचा जिल्हाधिकारी कार्यालयावर विशाल निषेध मोर्चा

## झुलेलाल साईसंदर्भात आक्षेपार्ह वक्तव्य केल्याचा निषेध




अमरावती/प्रतिनिधीः- छत्तीसगड येथील के.एस.जे.पी. राजकीय पक्षाचे नेते अमित बघेल यांनी समाज माध्यमांवर सिंधी समाज आणि त्यांच्या देवतांबद्दल आक्षेपार्ह वक्तव्य केल्याच्या निषेधार्थ आज मंगळवार ४ नोव्हेंबर रोजी समस्त सिंधी समाजाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला.

इर्विन चौक आणि रामपुरी कॅम्प परिसरात बघेल यांनी केलेल्या आक्षेपार्ह वक्तव्याचा निषेध नोंदवत समाजाच्या वतीने मोर्चा काढण्यात आला. विविध घोष फलक हातात घेऊन समाज बांधव मोर्चामध्ये सहभागी झाले. जिल्हाधिकारीमार्फत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी ,गृहमंत्री अमित शहा, छत्तीसगडचे मुख्यमंत्री आणि गृहमंत्री यांना निवेदन देऊन बघेल विरुद्ध कठोर कार्यवाही करण्याची मागणी करण्यात आली.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, अमित बघेल यांनी समाज माध्यमांवर सिंधी समाजाबद्दल अपमानकारक विधान केले.यामुळे संपूर्ण सिंधी समाजाच्या धार्मिक आणि सामाजिक भावनांना ठेच पोहोचली आहे. त्यांच्या या वक्तव्यामुळे सामाजिक सलोखा धोक्यात आला असून समाजात तणाव निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यांच्या या (पान २ वर)

# महापालिका क्षेत्रात मालमत्तेच्या क्षेत्रफळ आधारित कर आकारणीचा निर्णय

## आ. सुलभा खोडके यांच्या पाठपुराव्यामुळे मालमत्ताधारकांना मोठा दिलासा



आमदार सुलभा संजय खोडके यांनी सातत्याने बैठका घेऊन चर्चा केली असता आता महापालिकेच्यावतीने कर आकारणी पद्धतीमध्ये सुधारणा करण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे.

**अमरावती/प्रतिनिधी :-** अमरावती शहरामध्ये भाडे कराराने दिलेल्या इमारतीना महानगरपालिकेतर्फे प्रत्यक्ष भाड्यावर कर आकारणी करण्यात येत होती. वर्तमान स्थितीत अमरावती महानगर पालिकेच्या वतीने भाडेकरारा संदर्भात इमारतीपासून भाडे करारानुसार प्राप्त होणाऱ्या उत्पन्नाच्या सुमारे ५० टक्के उत्पन्न मालमत्ता करापोटी महानगरपालिकेस जमा करावे लागत असे. यामध्ये सुधारणा करून शहरातील मालमत्ताधारकांना सारखाच कर आकारणी करण्यासंदर्भात अमरावतीच्या ना.चंद्रशेखर बावनकुळे व मनपा आयुक्त सौम्या शर्मा यांचे आभार मानीत अभिनंदन केले आहे. अमरावती महानगर पालिका क्षेत्रात (पान २ वर)

त्यानुसार आता शहरात मालमत्तेच्या क्षेत्रफळ आधारित कर आकारणी करण्यात येणार असल्याने कमर्शियल टॅक्सधारकांना मोठा दिलासा मिळणार आहे. याबद्दल आ. सुलभा खोडके यांनी पालकमंत्री

# बस स्थानक चौकशीचा फोन बऱ्याच दिवसांपासून बंद - प्रवाशांची गैरसोय

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती एस.टी. स्थानकाचा चौकशीसाठी असलेला दूरध्वनी क्रमांक ०७२१ २६६ ३२२१ हा बऱ्याच दिवसांपासून बंद आहे. या क्रमांकावरून प्रवासी दररोज बसचे वेळापत्रक, आरक्षण तसेच विविध माहितीची चौकशी करत असतात. मात्र फोन सतत बंद असल्याने प्रवाशांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. प्रवाशांमध्ये असा प्रश्न उपस्थित होत आहे की, हा फोन मुद्दाम बंद ठेवण्यात आला आहे काय? एस.टी. स्थानक हे जिल्ह्यातील मुख्य केंद्र असल्याने दररोज हजारो प्रवासी येथे (पान २ वर)

# शेअर मार्केटमध्ये गुंतवणुकीच्या नावावर २३ लाखांनी गंडविले

## शिक्षकाची सायबर ठाण्यात धाव



**अमरावती/प्रतिनिधीः-** शेअर मार्केट मध्ये गुंतवणूक केल्यावर जास्त नफ्याचे आमिष दाखवून शहरातील एका खाजगी शिक्षकाला सायबर गुन्हेगारांनी २३ लाख २५ हजार ९२४ रुपयाने गंडविल्याची घटना ड्रीम्स पार्क परिसरात समोर आली आहे. या संदर्भात शिक्षकाने सायबर ठाण्यात तक्रार दिली आहे.

योगेश श्रीराम जखोटिया (वय ३८, ड्रीम्स पार्क ) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार ते खाजगी शिक्षक आहे. ऑगस्ट महिन्यामध्ये त्यांना विदेशातून फोन आले आणि त्यांना शेअर मार्केटमध्ये ट्रेडिंग करण्यासाठी इच्छुक आहात का असे विचारले. यावर योगेश जाखोटिया यांनी सहमती दर्शविली. यानंतर त्यांना ८८ फेयर प्ले नावाक ग्रुपशी जोडण्यात आले. त्यांनी योगेशला क्रिप्टो करेंसी बाबत माहिती देत यामध्ये गुंतवणुक करून बिटकॉइन मध्ये जास्त नफा मिळवण्याचे आश्वासन दिले. त्यानंतर सुरुवातीला योगेशने पाच हजार, दहा हजार रुपये निवेश करून ट्रेडिंग सुरू केली. त्यांना चांगला नफा मिळाला. यामुळे त्यांचा संबंधितांवर विश्वास बसला.या नंतर त्यांनी ११ सप्टेंबर रोजी मॅक ८८ डॉट कॉम नामक साईटच्या कस्टमर आणि सपोर्ट ग्रुप (पान २ वर)

# अळणगाव घरफोडी प्रकरणाचा पोलिसांनी केला उलगडा

## दोन चोरटे गजाआड, ६८ हजारांचा मुद्देमाल हस्तगत



**नांदगाव पेठ/प्रतिनिधीः-** नांदगाव पेठ पोलीस ठाण्याच्या सतर्क आणि अचूक तपासामुळे अळणगाव पुर्नवसन परिसरात झालेल्या घरफोडी प्रकरणाचा अवघ्या काही दिवसांत उलगडा झाला आहे. या कारवाईत पोलिसांनी दोन सराईत चोरट्यांना अटक करून सुमारे ६८,५०० मुद्देमाल जप्त केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, २६ ऑक्टोबर ते २८ ऑक्टोबर दरम्यान अळणगाव पुर्नवसन येथील पंजाबराव गुलाबराव दुर्गे यांच्या राहत्या घरात अज्ञात चोरट्यांनी घरफोडी केली होती. घरातील ४३,००० रोख रक्कम, ४ ग्रॅम सोन्याचे टॉप्स, ३ ग्रॅम सोन्याची साखळी अंदाजे किंमत २५,००० आणि चांदीचे तोरडे किंमत रु.५०० असा एकूण ६८,५०० किमतीचा ऐवज चोरून नेण्यात आला होता.

या प्रकरणी ३८०/२०२५ कलम ३८०, ४५७ बीएनएस नुसार नांदगाव पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्ह्याच्या तपासासाठी स्वतंत्र पथक तयार करून गोपनीय माहिती,सीसीटीव्ही फूटेज आणि तांत्रिक तपासाच्या आधारे पोलिसांनी गुन्ह्यातील आरोपीचा शोध लावत (पान २ वर)

# शहरातील अवैध दारू विक्रीविरोधात पोलीस आयुक्तालयावर महिलांची धडक



## एम.डी. ड्रग्जप्रमाणे विशेष पथक नेमण्याची केली मागणी

## -प्रहार जनशक्ती पक्षाचे पोलिस आयुक्तांना निवेदन

**अमरावती/ प्रतिनिधीः-** शहरातील विविध भागात खुलेआम सुरू असलेल्या अवैध गावठी व देशी दारूविक्री विरोधात मंगळवारी शेकडो महिला प्रहारच्या नेतृत्वात पोलीस आयुक्त कार्यालयावर धडकल्या. शहरात अवैधरित्या होत असलेल्या दारू विक्री मुळे गुन्हेगारी वाढत असून तरुण पिढी व्यसनाधीन होत असल्याने तात्काळ कारवाईची मागणी प्रहार जनशक्ती पक्षाने केली आहे.पक्षाचे महानगर प्रमुख बंटी रामटेके यांच्या नेतृत्वात (पान २ वर)

# अग्निशमन विभागातील कंत्राटी कर्मचाऱ्यांचे उपोषण

## महापालिका आयुक्तांच्या निर्णयाचा विरोध



**अमरावती/ प्रतिनिधीः-** काही दिवसापूर्वी अग्निशमन विभागातील सहा कंत्राटी कर्मचाऱ्यांना कामावरून कमी करण्यात आले. महापालिका आयुक्त शर्मा यांनी हा निर्णय घेतला. या निर्णयाचा विरोध करत सहा कर्मचाऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरु केले आहे.

उपोषणकर्त्यांच्यानुसार एक महिन्यापूर्वी अग्निशमन विभागातील कर्मचाऱ्यांची बेकादेशीर पद्धतीने संतोष केंद्रे यांच्या सूचनेवरून मनपा आयुक्त यांनी बदली केली होती. आझाद समाज पार्टी कामगार आघाडी यांनी (पान २ वर)

# तंबाखू नियंत्रण कार्यक्रमाला यश!

## ५ हजार ७०० लोकांनी सोडले व्यसन

### ५.८४ लाखांचा दंड वसूल

अमरावती/प्रतिनिधीः- जिल्ह्यामध्ये २०१७ पासून राबविण्यात येत असलेल्या राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमाला (ऊण्ड) मोठे यश मिळाले असून, या कार्यक्रमामुळे तब्बल ५ हजार ७०० लोकांनी तंबाखूचे व्यसन सोडल्याची माहिती जिल्हा प्रशासनाने दिली आहे. जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हा समन्वय समितीमार्फत हा कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्यात येत आहे.

या कार्यक्रमांतर्गत तंबाखूच्या दुष्परिणामांबद्दल ८४६ शाळांमध्ये १ लाख ४८ हजार ५५८ विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले असून, जनजागृतीसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच, तंबाखू सोडण्यास मदत करण्यासाठी (पान २ वर)

# जिल्हा परिषद शाळा व शिक्षक वाचवा अभियान

## -व्यवस्थापन समितीने व्यक्त केली चिंता

## -शासनाला दिला उपोषणाचा इशारा



**अमरावती/प्रतिनिधीः-** भारतीय संविधानानुसार शिक्षण मूलभूत हक्क असून गाव तिथे शाळा हे सरकारी धोरण असताना जिल्हा परिषद प्रायमरी शाळा पटसंख्या, संच मान्यता व इतर कारण पुढे करून गाव तिथं शाळा धोरण संपविण्याची तयारी शासनाच्या वतीने सुरू झालेली आहे. सरकारचा कल शिक्षण खाजगीकरणा कडे अधिक आहे. यामुळे जिल्हा परिषद शाळा व शिक्षक वाचवण्यासाठी शाळा व्यवस्थापन समितीच्या वतीने अभियान सुरू (पान २ वर)